# प्रतिबिम्ब



द्वितीय सत्रांक १९७२-७३

# परशुरामीय

## द्वितीय सत्रांक १९७२-७३

सर परशुरामभाऊ महाविद्यालयाचे कालिक
शिक्षण प्रसारक मंडळाचे
सर परशुरामभाऊ महाविद्यालय;
टिळक पथ,
पुणे ३०.

**अध्यक्ष :** प्राचार्य के. पं. मंगळवेढेकर

**उपाध्यक्ष :** प्रा. डॉ. रा. वि. घाटे
प्रा. डॉ. दि. व. केरूर

**सन्माननीय सल्लागार :**

डॉ. श्री. र. कावळे
प्रा. रा. म. गोखले

**सदस्य :**

प्रा. वि. द. सरलष्कर
प्रा. प्र. आ. पुरोहित
प्रा. स. रा. केणी
प्रा. चंद्रशेखर वर्वे
प्रा. वि. ग. शिरगुरकर
डॉ. अनुराधा पोतदार
प्रा. भ. ना. कुलकर्णी

---

**संपादक मंडळ :**

प्रा. अरुण भागवत
प्रा. ल. प्र. दाते
प्रा. ग. भा. जोशी
प्रा. विजय कारेकर
प्रा. अ. गो. जुमडे
प्रा. श. श्री. पंडित

विद्यार्थी प्रतिनिधी :
श्री. प्रकाश लिमये,
तृ. व. सा.

विद्यार्थिनी प्रतिनिधी :
कु. वासंती पटवर्धन,
प्र. व. सा.

---

कार्यालय सहाय्यक : श्री. शरद गोसावी

---

प्रकाशक : प्राचार्य के. पं. मंगळवेढेकर, सर परशुरामभाऊ महाविद्यालय; पुणे ३०.
मुद्रक : सुजित पटवर्धन, संगम प्रेस लिमिटेड, १७ ब कोथरूड, पुणे २९.

| | | |
|---|---|---|
| संपादकीय | | २ |
| महाविद्यालयाचे दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांना सहाय्य | | ५ |
| आता वाटा छळीत राहतील | योगेश गोगावले | ७ |
| मी पुणेरी बनतो | किरण गोखले | ८ |
| स्मरणशक्तीचे गूढ | राजेंद्र सावले | ११ |
| मूलभूत शास्त्रांचे महत्त्व | सुधीर कुलकर्णी | १३ |
| काळा बाजार | डॉ. दि. ब. केरूर | १६ |
| भारतीय संस्कृती आणि योगी अरविंद | सुलभा साने | १९ |
| **कविता** | लता भिसे | २१ |
| | भारती गोडबोले | २२ |
| | वासंती पटवर्धन | २२ |
| | रेखा पटवर्धन | २३ |
| | कीर्ति साठे | २३ |
| | सतीश इनामदार | २३ |
| | मंजिरी पित्रे | २४ |
| | चंदा मंत्री | २४ |
| Young Friends | Prin. K. P. Mangalvedhekar | २५ |
| Sorrow and Hope | Soudamini Doshi | २६ |
| To Blossoms | R. M. Ainapure | २६ |
| America, the Beautiful | Prof. P. R. Karmarkar | २७ |
| We Are In The Cosip | | २९ |
| Two Novels on India | Abhay Mangalvedhekar | ३१ |
| महाविद्यालयातील काही ठळक घटना | | ३३ |
| विविध विषय विभाग वार्ता | | ३९ |
| प्राध्यापकांची कार्यवृत्ते | | ४२ |
| क्रीडाविभाग | | ४५ |
| माजी विद्यार्थी विभाग | | ५१ |
| विविध पारितोषिके व शिष्यवृत्त्या | | ५४ |

# संपादकीय

अभिवादन !

१९७२–७३ या शैक्षणिक वर्षाच्या दुसऱ्या सत्रातील हा 'परशुरामीय'चा अंक आपल्या हाती देत आहोत. वर्षातून दोन अंक काढण्याची ही कल्पना अद्याप प्रयोगावस्थेत आहे. त्यामागे दोन हेतू आहेत. पहिला असा की विद्यार्थ्यांमधील लेखनगुणांना जास्तीत जास्त वाव मिळावा; आणि दुसरा, महाविद्यालयात घडणाऱ्या शैक्षणिक व अन्य महत्त्वाच्या घटना, तसेच विद्यार्थ्यांचे विविध क्षेत्रातील सुयश इत्यादी वार्ता शक्यतो त्वरित आपल्यापर्यंत पोचाव्यात. पुढच्या वर्षी आणखी दर्जेदार साहित्य लिहून या प्रयोगात सहभागी होण्याचे, तो यशस्वी करण्याचे श्रेय विद्यार्थ्यांनी घ्यावे असे आवाहन या ठिकाणी करीत आहोत.

**दुष्काळनिवारण प्रयत्नास महाविद्यालयाचा हातभार**

गेल्या तीन-चार महिन्यांपासून दुष्काळाची भीषण छाया केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर देशात अनेक ठिकाणी पसरली आहे. ग्रामीण जीवनात अशा प्रसंगी इतकी दुःखे व हालअपेष्टा यांना तोंड द्यावे लागते की शहरी माणसांना त्याची नीट कल्पनाही येणे कठीण ! खेड्यापाड्यांतून शिक्षणासाठी पुण्याला आलेल्या विद्यार्थ्यांच्या मनात आज अभ्यासाच्या ताणाबरोबरच कुटुंबियांची चिंता आणि विशेषतः परीक्षा संपवून घरी जाण्याची ओढही तीव्र आहे. विद्यार्थिवर्गात एक प्रकारची विषण्णता आज थोड्याफार प्रमाणात जाणवत आहे. 'परशुरामीय'-सुद्धा या भावनांपासून मुक्त नाही. साहित्यिक विश्वात मश्गुल होणे वगैरे गोष्टी या काळात न परवडणाऱ्या ऐषआरामासारख्या वाटतात.

वादळी रणात
करावे कोठून
नाजूक भावाचे
लालनपालन ?

पण याचा अर्थ असा निश्चितच नाही की यामुळे विद्यार्थिजग निष्क्रीय बनले आहे. तरुण मनाची उभारीच अशी विलक्षण असते की या विषण्णतेपासूनदेखील ते कृतीसाठी प्रेरणा मिळवू लागते. विद्यार्थिमनाच्या विषण्णतेचा उल्लेख केला तो केवळ फारसे सृजनात्मक किंवा वैचारिक लिखाण करण्याकडे विद्यार्थ्यांची या वेळी ओढ नाही एवढ्याच विधानापुरता. पण प्रत्यक्ष कृतीच्या क्षेत्राकडे नजर टाकली तर उत्साहाचेच वातावरण दिसून येईल. दुष्काळ निवारणाच्या प्रयत्नांना महाविद्यालयात केव्हाच सुरुवात झाली आहे. त्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या निधीला विद्यार्थ्यांकडून मोठ्या प्रमाणावर प्रतिसादही मिळाला आहे. दुष्काळाची झळ पोचलेल्या विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयाने सुरू केलेल्या भोजनगृहात आपुलकीने पडेल ते काम करणारे अनिल रांजेकर, वसंत लांजेकर, प्रदीप चिकटे, श्यामला इनामदार यांसारखे अनेक विद्यार्थी आणि त्यांना मार्गदर्शन करीत त्यांच्या बरोबरीने कामे करणाऱ्या प्राध्यापकवर्गात प्रा. श. द. भागवत, प्रा. वि. रा. शिरगुरकर व प्रा. उ. रा. कोप्पर यांचा आवर्जून उल्लेख करायला हवा. काही दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांची, त्यांच्या परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन वसतिगृहात राहण्याची सोय केलेली असून, काहींना फीमध्येही सवलत देण्यात आलेली आहे. अर्थात या सर्व कार्याची मुख्य प्रेरक शक्ती ही प्राचार्य के. पं. मंगळवेढेकर व उपप्राचार्यद्वय डॉ. रा. वि. घाटे व डॉ. दि. ब. केरूर

यांच्याकडूनच मिळालेली आहे.

२५ आणि २६ जानेवारी रोजी आपले स्नेहसंमेलन अगदी साधेपणाने साजरे झाले. अल्पोपाहारासारखे कार्यक्रम रद्द करून वाचलेली रक्कम महाविद्यालयाच्या दुष्काळ-निवारण निधीला द्यावी असे ठरले आहे. स्नेहसंमेलन साजरे करावयाचे की नाही याबद्दल आधी विद्यार्थ्यांशी चर्चा झाली होती. त्यातून असा विचार पुढे आला की गेली दोन-तीन वर्षे काही ना काही कारणाने स्नेहसंमेलन रद्द होत आले आहे. तेव्हा यंदा अशा स्वरूपाचे स्नेह-संमेलन व्हावे की त्यात अनावश्यक चैन टाळता येईल. पण विद्यार्थ्यांच्या उत्साहाला मात्र योग्य व भरपूर वाव मिळेल. ही जाणीव यंदाच्या स्नेहसंमेलनात प्रामुख्याने व्यक्त झाली हे नमूद करण्यास आनंद वाटतो.

**क्रीडाविभागाचे सुयश**

या वर्षी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी विभागाने सर्व-साधारण अजिंक्यपद लागोपाठ तिसऱ्यांदा जिंकले. या विभागाला जलतरण, कबड्डी, सॉफ्टबॉल या सांघिक खेळात अजिंक्यपद; तर बॅडमिंटन, बॉल-बॅडमिंटन, खो-खो, व्हॉलिबॉल या खेळांत उपविजेतेपद मिळाले आहे. विद्यार्थिनी विभागाच्या या विक्रमात मेधा जोगळेकर हिचा वाटा फार मोठा आहे. जलतरण विभागात तिने अजिंक्यपद मिळवून अनेक उपविभागांत उच्चांक स्थापन केले. आंतरविद्यापीठ सामन्यांतही विशेष चमक दाखवून तिने पुणे विद्यापीठास अजिंक्यपद मिळवून देण्यात मोठा वाटा उचलला. तिने कोलंबो येथे झालेल्या भारत-सीलोन जलतरण सामन्यांत भाग घेऊन एक संस्मरणीय स्थान गाठले आहे. तिच्या या कामगिरीची प्रशंसा म्हणून महाविद्यालयाने तिला विशेष सुवर्णपदक दिले आहे. साधना धारियानेही आंतरविद्यापीठ व आंतरराज्य स्पर्धांत भाग घेऊन प्रत्येक ठिकाणी आपली चुणूक दाखवून दिली आहे. बांगलादेशला जाणाऱ्या महिला कबड्डी संघात तिची निवड झाली आहे.

क्रीडाक्षेत्रात विद्यार्थीही यंदा आपली आघाडी टिकवून आहेत. आंतरमहाविद्यालयीन क्रिकेट सामन्यांत आपला संघ सतत तीन वर्षे अजिंक्य ठरला आहे. राजू भालेकर, विश्वास देशमुख, रमेश बोर्डे, पीटर परमार या क्रीडापटूंची ' पुणे विद्यापीठ संघात ' निवड झाली असून या संघाच्या कप्तानपदाचा मान राजू भालेकरला मिळाला आहे. भालेकर, देशमुख, बोर्डे यांची पश्चिम विभागीय ' विझी करंडका'साठी निवड झाली असून या संघाचेही कप्तानपद भालेकर सांभाळणार आहे. तसेच रविप्रकाश गुर्जर याने पुणे विद्यापीठ व महाराष्ट्र राज्य यांच्या व्हॉलिबॉल संघाचे नेतृत्व केले.

या सर्व खेळाडूंचे अभिनंदन !

**प्री-मेडिकल व प्री-एंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांसाठी मानसशास्त्रीय चाचण्या**

प्री-मेडिकल आणि प्री-एंजीनिअरिंग या शिक्षणक्रमांकडे शास्त्राच्या विद्यार्थ्यांचा साहजिक ओढा असतो. पण ह्या अभ्यासक्रमांची निवड करताना स्वतःचा मानसिक कल अजमावण्यापेक्षा या व्यवसायांना समाजात असलेल्या प्रतिष्ठेचे वलय, त्यातील अर्थप्राप्ती इत्यादी विचारच जास्त प्रभावी ठरण्याची शक्यता असते आणि यामुळे कोणताही शिक्षणक्रम निवडताना ज्या शैक्षणिक व मानसशास्त्रीय कसोटयांचा विचार गंभीरपणे व्हावयास हवा तो फारसा होत नाही. या दृष्टीने विद्यार्थ्यांना मार्ग-दर्शन करण्याच्या हेतूने आपल्या महाविद्यालयाचे मानस-शास्त्र – विभागप्रमुख प्रा. डॉ. प्र. आ. भागवतवार यांनी एक प्रकल्प हाती घेतला आहे. त्याचा उद्देश विशिष्ट अभ्यासक्रमाच्या निवडीतील योगायोगाचा भाग (chance element) शक्यतो संपूर्णपणे टाळण्याला विद्यार्थ्यास प्रवृत्त करून त्याला जाणीवपूर्वक निर्णय घेण्यास मदत करणे हा आहे.

आज पदवीपूर्व शास्त्र उत्तीर्ण झाल्यावर विद्यार्थ्यापुढे १. बी. एससी. (विशेष), २. प्री. प्रोफेशनल मेडिसिन ('बी' ग्रुप) व ३. प्री. प्रोफेशनल एंजीनिअरिंग (' ए ' ग्रुप) असे पर्याय असतात. या पर्यायांत मेडिकल आणि एंजीनिअरिंग या अभ्यासक्रमांसाठी काही विशेष मानसिक कल असणे आवश्यक आहे. त्यांमध्ये जीवशास्त्र, गणित, भौतिकी व रसायनशास्त्र या विषयांतील क्षमतेचे मोज-माप होणे हा एक अपरिहार्य भाग आहे.

प्रा. भागवतवार यांनी विद्यार्थ्यांचा या विषयांतील कल शास्त्रीय पद्धतीने ठरविण्यासाठी काही निकष निश्चित

केलेले आहेत. आपले भवितव्य घडवण्यास उत्सुक असलेल्या शास्त्राच्या विद्यार्थ्यांना या निकषांवर आधारलेल्या चाचण्यांची बरीच मदत होईल अशी खात्री वाटते. ही चाचणी मे अखेर पूर्ण होणार आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी प्रा. डॉ. भागवतवार यांच्याशी संपर्क साधावा.

**'कॉसिप ' योजना –**

विद्यापीठ अनुदान मंडळाने शास्त्र विषयांच्या अध्ययनात विशेष प्रगती घडवून आणण्याच्या उद्देशाने 'कॉसिप (कॉलेज सायन्स इंप्रूव्हमेंट प्रोग्रॅम) ही योजना सुरू केलेली असून त्यासाठी देशातील काही निवडक महाविद्यालयांना ही योजना लागू केली आहे. या योजनेत सामील होण्याचा मान आपल्या महाविद्यालयास मिळाला आहे. या योजनेची दोन उद्दिष्टे आहेत : सामान्य विद्यार्थ्यांची शास्त्रीय पार्श्वभूमी तयार करणे व विशेष पारंगत विद्यार्थ्यांच्या प्रतिभेला प्रोत्साहन देणे. तीन वर्षे मुदतीच्या या योजनेसाठी मंडळाकडून विद्यालयास एकूण तीन लाख रुपये अनुदानाच्या स्वरूपात मिळतील. आपल्या विविध शास्त्रीय विभागांनी योजनांतर्गत स्वतंत्र कार्यक्रम आखले आहेत. त्याची माहिती " We Are In The Cosip" या याच अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखात उपलब्ध आहे.

**महाविद्यालयास कुलगुरूंची भेट**

१४ डिसेंबर १९७२ रोजी पुणे विद्यापीठाचे कुलगुरू रँग्लर ग. स. महाजनी यांनी महाविद्यालयास भेट दिली. त्यांनी प्राध्यापकसभेत Some Educational Reforms Without Tears या विषयावर उद्‌बोधक भाषण दिले व दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांसाठी चालवलेल्या भोजनगृहाची पाहणी करून तेथील चाललेल्या कार्याबद्दल समाधान व्यक्त केले. ●

## 'राष्ट्रीय सेवा योजने 'चे आवाहन

महाराष्ट्रातील दुष्काळाची भीषणता दिवसेंदिवस वाढतच जाणार आहे. विशेषतः मार्च ते जून हे महिने पाण्याच्या तीव्र टंचाईमुळे नगर जिल्ह्यासारख्या काही भागात अतिशय कष्टाचे जातील. या परिसरातील दुष्काळग्रस्त कुटुंबांची सोय शिबिरे उघडून ठिकठिकाणी करावी लागेल. अशा प्रकारच्या शिबिरांतून विविध प्रकारची जबाबदारीची कामे करण्यासाठी सुशिक्षित तरुणांची गरज भासेल.

विद्यार्थ्यांनी आपल्या सुट्टीचा सदुपयोग या शिबिरांच्या कार्यात भाग घेऊन करावा. या संदर्भात प्राचार्य व उपप्राचार्य माहिती देतील व मार्गदर्शन करतील. या समाजोपयोगी कार्यात भाग घेण्यासाठी विद्यार्थी बहुसंख्येने महाविद्यालयाच्या कार्यालयात नावे नोंदवतील असा विश्वास वाटतो.



# महाविद्यालयाचे दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांना सहाय्य

महाराष्ट्रातील बऱ्याच भागांमध्ये लागोपाठ तिसऱ्या वर्षीही दुष्काळ पडला आहे. दुष्काळामुळे बरीच कुटुंबे आपली गावे सोडून दुष्काळी कामाच्या शोधात घराबाहेर पडली आहेत. अशा कुटुंबातील काही विद्यार्थी स. प. महाविद्यालयात शिकत आहेत. त्यांना या आपत्तीची फार मोठी झळ लागली आहे. या दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांच्या भोजनाची व्यवस्था नोव्हेंबर १९७२ अखेर गावाकडून येणाऱ्या जेवणाच्या डब्यांमुळे कशीबशी होत होती. त्यानंतर मात्र कुटुंबांच्या स्थलांतरांमुळे ही व्यवस्था बंद झाली. त्यांच्यावर कोसळलेल्या या आपत्तीची जाणीव होताच मा. प्राचार्य के. पं. मंगळवेढेकर यांनी विद्यार्थ्यांशी संपर्क साधून त्यांना सहाय्य करण्याची योजना आखली. यामध्ये मुख्यत्वे विद्यार्थ्यांच्या परीक्षा संपेपर्यंत त्यांच्या विनामूल्य भोजनाच्या व्यवस्थेचा अंतर्भाव केला. या योजनेची कार्यवाहीदेखील ताबडतोब सुरू केली. शिक्षण प्रसारक मंडळीच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष मा. मो. वि. गवंडी यांनी व्यक्तिशः या योजनेविषयी आत्मीयता दाखवून प्रारंभापासून उत्तेजन दिले.

या योजनेचा लाभ व्हावा म्हणून बऱ्याच विद्यार्थ्यांनी अर्ज केले होते. त्यांपैकी विनामूल्य भोजनगृहासाठी खालील निकष लावून साठ विद्यार्थ्यांची निवड केली :

१. विद्यार्थी दुष्काळग्रस्त भागातून आलेला आहे.
२. पालकांचा निर्वाह केवळ शेतीवरच आहे.
३. विद्यार्थ्याला अन्य मार्गाने मदत मिळत नाही.
४. या व्यवस्थेच्या अभावी विद्यार्थ्यास शिक्षण सोडून द्यावे लागले असते.

१ डिसेंबर १९७२ पासून महाविद्यालयाच्या आवारातच या दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांसाठी विनामूल्य भोजनगृह सुरू केले. भोजनगृहामध्ये विद्यार्थ्यांना रोज दोन्ही वेळा पोळी व भाजी व काही वेळा भात असे साधे पण ताजे अन्न देण्यात येते. भोजनगृहाची सर्व व्यवस्था महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेमधील विद्यार्थी पाहतात. प्रदीप चिकटे, अनिल रांजेकर, श्याम लांजेकर, श्यामला इनामदार, मंगला नारकर, मंदाकिनी आराणके, योगेश गोगावले, अच्युत आठवले व हेरंब अनगळ या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी भोजनगृहाच्या दैनंदिन व्यवस्थेची सर्व जबाबदारी उचलली आहे. त्यांच्याकडून मिळत असलेले हे सहकार्य अमूल्य आहे. भोजन घेणारे विद्यार्थीही पाळीपाळीने वरील विद्यार्थ्यांना मदत करतात. ही सर्व कामे विद्यार्थी अतिशय हौसेने व एकजुटीने करतात. वरील कामात विद्यार्थिनी-वसतिगृह भोजनालयाचे कंत्राटदार श्री. भागवत व जीवशास्त्र विभागातील शिपाई-सेवक श्री. गोखले यांचेही बहुमोल सहाय्य होत आहे.

हे भोजनगृह चालविण्यासाठी दरमहा सुमारे ८ पोती गहू, २ पोती तांदूळ, ३६० किलो भाजी, ४५ किलो तेल, ४० मण सरपण वगैरे सामान मुख्यत्वेकरून लागते. अखिल मंडई मंडळाने आमच्या विनंतीला उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देऊन रोज १२ किलो भाजी विनामूल्य पुरविण्याची जबाबदारी घेतली आहे व त्याप्रमाणे ते रोज भाजी पुरवीत आहेत. या कामी श्री. ज्ञानेश्वर खैरे व श्री. पांडुरंगराव सातव यांनी पुढाकार घेतला. सौ. जयश्रीबाई वैद्य यांच्या नेतृत्वाखाली पुण्यातील काही महिला मंडळांतर्फे २६० किलो गहू विनामूल्य मिळाला. या कामी सौ. चिरमुले, सौ. बेडेकर, सौ. रानडे, सौ. जोग

व श्रीमती बावडेकर यांनी सहकार्य दिले.

महाविद्यालयातील सर्व शिक्षक, विद्यार्थी व शहरातील अनेक प्रतिष्ठित नागरिक यांनी या योजनेबद्दल आत्मीयता दाखवून आर्थिक सहाय्य केले आहे. श्रीमान् बाबूरावजी पारखे व बी. डब्ल्यू गाडगीळ यांच्याकडून एक सहस्र आणि वसंतरावजी वैद्य यांच्याकडून ५०० रुपयांची विशेष उल्लेखनीय मदत आली आहे. नियामक मंडळाचे सदस्य मा. ल. द. भावे यांनी २६ जानेवारी १९७३ पासून भोजनगृहाच्या उपयोगासाठी 'बर्शेन गॅस'ची व्यवस्था विनामूल्य केली आहे.

**स. प. महाविद्यालयातील दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांकरिता चालविलेल्या मोफत भोजनगृहाकरिता मिळालेल्या ठळक आर्थिक मदतीचा तपशील.**

| | रुपये |
|---|---|
| १. स. प. महाविद्यालयातील शिक्षकांकडून दरमहा-(दि. १-१२-७२ ते ३०-४-७३ अखेर) | ६०० |
| २. स. प. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून (दि. ६-१-७३ अखेर) | १९३१ |
| ३. प्राचार्य दांडेकर यांचा एक विद्यार्थी | ५१ |
| ४. प्राचार्य श्री. गो. हुल्याळकर | १०१ |
| ५. श्रीमती विदुला जोशी | ५१ |
| ६. श्रीमती विमलाबाई मुद्देबिहाळकर | ५० |
| ७. श्री. जी. एस. शेटे | १०० |
| ८. श्री. हेमंत गोरे | १०० |
| ९. श्री. व. ह. गोळे | ३०० |
| १०. श्री. बाबुरावजी पारखे-पेपर अॅण्ड पल्प कंपनी | १००० |
| ११. श्री. वसंतराव वैद्य | ५०० |
| १२. शि. प्र. मंडळी कार्यालय | ५५ |
| १३. मेसर्स पिंपळे देशक कॉंट्रॅक्टर सोलापूर | २५० |
| १४. श्री. बी डब्ल्यू. गाडगीळ | १००० |
| १५. नू. म. वि. मुलींची प्रशाला | ५०० |
| १६. पुणे शहर कॉंग्रेस सेवादल | २५१ |
| १७. डॉ. व्हर्जीनिया कोरविन | १५० |
| १८. श्री. धुंडिराजशास्त्री दाते | ५१ |
| १९. श्री. आर. एच. पटवर्धन | ५१ |
| | ७०९२ |

याशिवाय, यापेक्षा अल्प रकमेने आलेल्या देणग्या वेगळ्या आहेत. स. प. महाविद्यालय या सर्वांचे ऋणी आहे. ●

## कुणाचे काम ?

|| ● ||

**एके दिवशी कुणि प्राध्यापक वर्गावर गेले ।**
**पाहुनि तेथे विद्यार्थी की सगळे निजलेले ।।**
**विश्रामालयि परत येउनी सकलां ते वदले ।**
**'तास न तुमचा, नव्हता माझा कुणि हे घडवीले' ।।**

। विकटकवि ।

# आता वाटा छळीत राहतील

। योगेश गोगावले. तृवसा ।

मी आज एका वळणावर येऊन पोचलोय. असं वळण की तिथून पुढं मला दिसताहेत ते सगळे उत्तुंग पर्वत... दुःखांचे...न पार करता येण्यासारखे. मला या वळणावरून पाऊलच पुढं टाकवत नाही. हृदयात माजलेली प्रचंड खळबळ...हे माझं अस्वस्थ मन. खरंच का माणसाचं जीवन फक्त दुःखांचे प्याले रिचवण्यासाठीच असतं? मला कळतच नाही. ही वळणं...हे पर्वत...मला काही सुचतच नाही...

समारोप! माझ्या जीवनातलं महाविद्यालयीन आयुष्य संपलं. किती भुर्रकन उडून गेलं, मला कळलंच नाही. मला वाटत होतं की मी हिरव्यागार...मऊशार हिरवळीवरं बागडतोय. ही अमाप हिरवळ कधी सरणारच नाही असं वाटायचं. किती सुख होतं...आनंद होता... पण...पण असंच मनमुराद बागडताना त्या हिरवळीतला काटा...मला बोचला...तीक्ष्ण...आणि लांब...ती वेदना...ती कळ...सगळंचा असहनीय...भयंकर...ज्या वास्तूत मी वाढलो...ज्या वास्तूच्या सुखदुःखांशी समरस व्हायचा मी अखंड प्रयत्न केला, प्रयत्नच नव्हे...मी त्या सुखदुःखांत मिळून गेलो होतो...ते सगळे माझेच होत. हो माझेच होत. पण छे:! तो भ्रम होता. मला ह्या वास्तूचा निरोप घ्यायचाय, हा निरोप घेताना माझं हृदय भंग पावतंय...माझ्या साऱ्या इच्छांचा चुराडा होणाराय...सगळं काही तुटणाराय...मला कधी वाटलंच नव्हतं की ह्या हिरवळीत कुठं काटाही असेल म्हणून.

तुम्ही हसाल मला...मी किती भावनाप्रधान आहे... असंच वाटत असेल ना तुम्हांला?...पण खरंच जीवनाच्या प्रत्येक वळणावर माणूस बदलतो. वळणापूर्वीची वाट दिसेनाशी होते. विस्मृतीच्या काळदरीत ती पहिली गिर्रेबाज वळणं लोपून जातात. कधीतरी स्मृती उफाळून येतात. मी वळणावर असतो नि समोर असतात न पार करता येण्यासारखे भयाण डोंगर...खरंच माझ्या जीवनातल्या प्रत्येक टप्प्यावर मी कसा होतो? मी काय होतो? मला कोडं पडतं...पण काळ निघून गेलेला असतो,...आणि मीसुद्धा प्रत्येक ठिकाणी बदलतो... कधी कळत...कधी नकळत.

ह्या गेलेल्या वाटेवरच्या सुखद आठवणी बोचणाऱ्या वाऱ्यासारखे शहारे आणतात. माणसाला जीवनात सुखद आठवणीच छळून सतावतात; कारण; तो पुढंच जातो; आणि त्याला सुखावणारी ती मोहक वळणं; ते प्रसंग नाहीसे होतात, पुन्हा न येण्यासाठी! जीवनातले सुखद क्षण अनुभवताना आणि त्या आठवणींच्या सागरात बुडताना वाटणारी त्यांची किंमत, यांत फार तफावत असते.

विश्वास वाटतो की नातं आपलं अतूट आहे...पण ती नियती...निर्घृण...कृतघ्न खाटकाच्या पल्लेदार सुऱ्यासारखा एकच घाव घालते आणि स्वःतच हसते. अरे खुळ्या मना! तुझ्या वल्गना फोल असतात....तुझ्या कल्पना आणि इच्छासुद्धा मृगजळासारख्या असतात. तू मात्र त्याच्या मागे धावतोस...छाती फुटेपर्यंत...

मला मात्र प्रश्न पडतो...की हाच का तो! माणसाच्या भावनांचा चुराडा करून त्या चुऱ्यांचे उंचउंच डोंगर बनवते ती नियती...दुःखांचे...निराशेचे...आणि म्हणते 'कर ते पार!'

अं! हाच की तो? ...भोग...माणसाला नेहमीच भोगावा लागणारा? ●

# मी पुणेरी बनतो

। किरण गोखले. प्रवसा ।

पुणे स्टेशनवर डेक्कन क्वीनमधून उतरलो तेव्हा एकाच गोष्टीबाबत साशंक होतो, ' अस्सल पुणेरी बाणा आपल्याला झेपेल का ? ' कॉलेज-शिक्षण, मुंबई सोडल्याचे दुःख या गोष्टी दुय्यम आहेत हे ठरवूनच मी या विद्येच्या माहेरघरी दाखल झालो.

दुसऱ्याच दिवशी सायंकाळी पुण्याची सुप्रसिद्ध ' सारस ' बाग (अहो ! काश्मीरची ' शालिमार ' फिकी पडते, वाटलं काय ? – एक पुणेरी सर्टिफिकेट) बघण्यासाठी अनेकांच्या सांगण्यावरून बाहेर पडलो. सायकलला समस्त पुणेकर ' गाडी ' या फियाट, ॲम्बेसेडर इत्यादींची आठवण करून देणाऱ्या नामाने संबोधतात, ती सेवेसाठी होतीच. बागेसमोरील भेळवाल्यांच्या गर्दीतून जात असताना एका स्कूटरस्वाराने मागून जोरदार धडक दिल्याची आणि आपण जमिनीवर लोळण घेतली आहे ही जाणीव मला एकदमच झाली ! माझी अजिबात चूक नसताना मी आपटी खाल्लेली बघताच मी संतापलो आणि मुंबईच्या अस्सल शिव्या, नजरेतील ' शत्रुघन् 'टाईप बेदरकारी आणि पब्लिकची सहानुभूती ही राडा (मारामारीला ' मुंबई फेम' शब्द) सामग्री घेऊन भांडण्याच्या पवित्र्यात उभा राहिलो. बरीच बोलाचाली झाली आणि अचानक माझ्या लक्षात आले की या पुणेकराने ' असं कसं राव ? आपल्याला काय घेणं आहे ?' या खानदानी वाक्प्रचारांचा उपयोग करीत मलाच दोषी ठरविले आहे. आजूबाजूला नजर टाकताच जमलेली समस्त पुणेरी जनता माना डोलवीत आपल्या नगरबांधवाला साथ देत असलेली दिसली आणि मी चाटच पडलो. पण मग नाइलाजाने उपहासगर्भ नजरा चुकवीत मी माझी पिचकलेली ' गाडी ' व दुखरा पाय घेऊन सायकल मार्टच्या दिशेने निघालो. येथेच ' पुणेरी जोडयाचा ' पहिला फटका बसला आणि अस्सल पुणेरी बनण्याच्या माझ्या इच्छेने उचल खाल्ली.

एखादा नट ज्याप्रमाणे आपले बोलणे, चालणे, अभिनय, सुधारावा म्हणून कसून मेहनत घेतो त्याप्रमाणे मी अस्सल पुणेरी बनण्याच्या दृष्टीने कसून प्रयत्न सुरू केले. कॉलेज सुरू झाल्यावर काही मित्रमंडळी मिळवली आणि पुणेरी बनण्याचा एक एक धडा मी गिरवू लागलो. एकदा ऑफ पीरियडला पाच-सहा मित्रांबरोबर भटकत असताना (चालू पीरियडला काय हिंमत होत्येय मित्रांची माझ्याबरोबर भटकण्याची !) मी त्यांना ' चला चहा वगैरे पाजतो ' असे सांगून कँटीनमध्ये नेले. कँटीनमध्ये शिरत असताना ' काय घळचा आहे ' अशा अर्थाचे भाव त्यांच्या चेहऱ्यावर झळकले आणि आठवडयाभरातच लक्षात आले की ' पुणेरी चहा पाजायचा नसतो, दुसऱ्याकडून उकळायचा असतो आणि पुणेरी मिसळ खिलवायची नसते; तर खिलवून घ्यायची असते ! ' हे बाळकडू मला वाटते प्रत्येक पुणेरी बाळाला जन्मल्याबरोबर हमखास मिळत असावे.

पुण्याच्या थंडगार हवेत आणि सोज्ज्वळ मित्रमैत्रिणींच्या सान्निध्यात अभ्यासाकडेही लक्ष द्यावेसे वाटू लागले. वडिलांनी पुण्याला एकदा अस्मादिकांच्या खोलीला भेट दिली असता मी एखाद्या पुणेरी विद्यार्थ्याप्रमाणे मन लावून अभ्यास करताना त्यांच्या दृष्टीस पडलो आणि पोरगा सुधारला या आनंदात वडील मुंबईला परत गेले. मुंबईच्या कॉस्मॉपॉलिटन वातावरणात मराठी-हिंदी-इंग्रजी या त्रिभाषाचूर्णाने पोसली गेलेली माझी बोली येथे ' अमृतातेही पैजा जिंकी ' अशा शुद्ध मराठीचे वळण घेऊ लागली. येता जाता ' साला 'चा उद्धार करणारी जीभ ' मूर्ख, नालायक ' या सभ्य शिव्यांची तालीम करू

लागली; आणि त्याबरोबरच जिभेला तिरके. वळणही मिळत गेले. साध्या साध्या शब्दांत मर्मभेदक बोलण्याची स्थानिक कलाही हळूहळू आत्मसात होत गेली. कपडे इस्त्रीची सवय हरवून बसले पण दुसऱ्यांच्या कपडयांचे मात्र मी चोखंदळपणे पुणेरी रसग्रहण करू लागलो.

आतापर्यंत पुण्यनगरीची कीर्ती 'पुणे रिटर्नड्' लोकांकडून ऐकत होतो. लहानपणी सुट्टीत पुण्याला आजीकडे आल्यावर होणाऱ्या 'मरगळलेल्या' पुण्याच्या दर्शनाची अंधुक आठवण मनात होती. 'पुण्यात म्हातारे बरेच दिसतात?' ही बालशंका आजोबांना विचारल्यावर आईच्या हातून खाल्लेला धपाटाही लक्षात होता. त्यामुळे पुण्याबद्दल काही विशिष्ट अपेक्षा आणि कल्पना मनात ठेवूनच मी पुण्यात आलो. या सोज्वळ, सभ्य नगरीत 'च्यायला, साला'चे काय हीदेखील भीती होती. पण पुण्याने आणि पुणेकराने या अपेक्षा-कल्पनांना जबरदस्त हादरा दिला. पुण्याच्या काही 'शुचिर्भूत' मानल्या जाणाऱ्या मासिकांत येणारे इरसाल शिव्यांनी भरलेले लेख पाहून मला गोड धक्का बसला. पुण्यातून वेळोवेळी प्रसिद्ध होणारी 'बुद्धिवाद्यांची' पत्रके आणि S. S. C. बोर्डाच्या पहिल्या तिसांमधील पुणेकरांची गर्दी पाहून भारतातले सारे बुद्धिवादी पुण्यातच ठाण मांडून बसले असावेत असा माझा प्रथम समज होता. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या २५ वर्षांत गरिबी कायम असताना, सुंदर बागांची निर्मिती, महापूजा, देवदर्शन यांचा त्यांना तिटकारा वाटतो असेही कुठेतरी वाचले होते. पण सारसबागेच्या प्रसन्न वातावरणात गणपतिदर्शनासाठी रांगा लावणारा पुणेकर बघितल्यावर 'बुद्धिवादी' हा पुण्यातील 'दुर्बल गट' आहे हे लक्षात आले.

माझे अस्सल पुणेरी बनण्याचे भगीरथ प्रयत्न चालूच होते. पिक्चर्स व क्रिकेटच्या मॅचेस् यांवर पैसा उधळणारा मी पुण्यात व्याख्याने व परिसंवादांत हजेरी लावू लागलो. चित्रपटांबाबतही मी जास्त चोखंदळ झालो व खऱ्या पुणेरी रसिकाप्रमाणे 'ग्रेगरी पेक'पेक्षा 'गणपत पाटलां'चे चित्रपट मोठ्या आवडीने बघू लागलो. इतर पुणेकरांप्रमाणेच मी कोणत्याही विषयावर सकाळ, केसरी इत्यादी पुणेरी कीर्ती लाभलेल्या वर्तमानपत्रांस 'पत्रे' पाठविण्याचा सपाटा सुरू केला; आणि अग्रलेखांपेक्षा आपली पत्रे लोक जास्त उत्सुकतेने वाचतात या आनंदातही मश्गुल होऊ लागलो. एखाद्या अस्सल पुणेकराप्रमाणेच सर्व जगाची अद्ययावत माहिती काय ती आपल्यालाच आहे अशी समजूत करून घेऊन पुण्यातील पेठांमध्ये रुबाबात हिंडू लागलो. 'कॉंग्रेस गवताशी' स्पर्धा करणाऱ्या पुण्यातील गल्लोगल्लीत असणाऱ्या 'अखिल भारतीय संस्थांपैकी' काहींचे सभासदत्वही मिळविले. तसेच लक्ष्मीरोडच्या 'मंडई'तून जोरात सायकल हाणण्याइतपत कौशल्यही आत्मसात केले.

पुण्याचे वर्णन करताना 'अतिशयोक्ती' अलंकाराचा मी सर्रास वापर करू लागलो. 'पुणेरी भट हेच खरे आर्य' ही थिअरी कोणाकडून तरी ऐकली होतीच. आता मीदेखील उघडपणे थापा मारावयास सुरुवात केली. सुटीत मुंबईच्या मित्रांना 'पुणेरी पगडी' चढविण्याचा प्रयत्नही केला. कळसूबाई शिखरानंतर पुण्यातील पर्वतीचाच नंबर लागतो ही लोणकढीही त्यांना पचल्यासारखी वाटली पण मी जेव्हा एखाद्या अस्सल पुणेकराच्या थाटात 'पुण्याची लोकसंख्या जवळजवळ मुंबईएवढीच आहे' असे बेधडक विधान केले तेव्हा मात्र त्यांनी माझी टिंगल करण्यास सुरुवात केली. बाजू आपल्यावर उलटत आहे हे पाहताच माझ्यातला 'कमावलेला' पुणेकर जागा झाला आणि मी मोठ्या खुबीने राजेश खन्नाच्या भावी चित्रपटसंन्यासाचे 'खरे' रहस्य सांगू लागलो आणि चर्चा पुण्यात होणाऱ्या परिसंवादाप्रमाणे लोकसंख्येच्या मूळ विषयापासून दूरवर नेली.

मुंबईत व पुण्यात अस्सल पुणेरी कारवायांची 'Practicals' केल्यानंतर मी आता खरोखरच पुणेकर बनत असल्याची माझी खात्री झाली. पुण्यातील निदान एखादा तरी भामटा भेटावा अशी इच्छा मनात धरून मी सोट्या म्हसोबा, खुन्या मुरलीधर, भांग्या मारुती, ही पुणेकराला संकेतस्थळाची योग्य कल्पना देणारी नावे धारण करणाऱ्या स्थळांनाही वारंवार भेटी दिल्या. देवदर्शनानंतर चपला गायब होण्याचा प्रकार दोन-तीनदा घडल्यावर पुणेरी भामटे न भेटताही त्यांच्या अस्तित्वाची मला खात्री पटली व मीदेखील माझ्या पायात फिट्ट बसणाऱ्या, बऱ्यापैकी चपला त्या पादत्राणांच्या गर्दीतून शोधून काढून परत येऊ लागलो.

परवाच एका मोठ्या वक्त्याच्या सभेला गेलो होतो.

वक्ता ' राणा भीमदेवी ' थाटात बोलत होता. मी खूष होऊन माझ्या मित्राला म्हणालो " काय मस्त बोलतोय " हे ऐकताच शेजारीच बसलेले एक म्हातारबुवा ताडकन् म्हणाले, " माहीत आहे ! अहो हे चक्क पाठांतर आहे लेकाचं ! ! " त्याच क्षणी मनोमन पटले की, ' अस्सल पुणेरी बनायला या पुणेरी मातीतच जन्म घ्यावयास हवा, लुंग्यासुंग्याचे ते काम नोहे ! '

●

## ' एस्. पी. रिव्हयू 'च्या प्रश्नपेटीतून

कॉमनरूमपाशी मंडई का भरते ?
* खुल्लम् खुल्ला भेटण्याचे एकमेव स्थान आहे ते !

एस. पी. चे घड्याळ बंद का ?
* शारदेच्या डोक्याला टक्‌टक्‌ची कटकट नको म्हणून !

एस. पी. रिव्ह्यूमधून ' उषा वहिनींचा सल्ला ' सदर ठेवावे काय ?
* आपण इतक्या अडचणीत आहात काय ?

पती हाच अलंकार असताना स्त्रिया सुवर्णालंकारांची हाव का धरतात?
* टिकाऊपणा कोणाला आवडत नाही ?

गुदगुल्या केल्यावर हसू का येते ?
* नेहमीच हसू येते असे नाही, तर--' त्या ' कोण करते यावर हसू येणे अवलंबून आहे.

ह्या सुधारलेल्या जगात मुलींसाठी ' सेपरेट ' जिना का ?
* सरळ आहे ! अल्पसंख्याकांचे संरक्षण. (अल्पसंख्याक = मुले)

गॉगल ही वस्तू आवश्यक चीज आहे का ?
* ते सर्व गॉगल कोण लावते यावर अवलंबून आहे. खरे ना ?

एस. पी. रिव्ह्यू मासिक आहे म्हणून त्यातही जाहिराती ठेवणार काय ?
* आपला एखादा लघु उद्योग बरा चालत नाही का? अं ?

# स्मरणशक्तीचे गूढ

। राजेंद्र कृ. सावले. पपूशा ।

' लक्ष्यात आहे माझ्या. ' किंवा ' अरेच्च्या, विसरलोच की ! ' असे शब्द आपण रोज कितीतरी वेळा वापरतो. पण आपण एखादी गोष्ट आठवतो किंवा विसरतो तेव्हा खरोखरच काय होते ? जेव्हा एखादी नवीन गोष्ट आपल्याला कळते तेव्हा आपल्या मेंदूत काही फरक होतो काय ? होत असल्यास या फरकाचे स्वरूप काय ? या प्रश्नांची उत्तरे शोधून काढण्याचा बराच प्रयत्न शास्त्रज्ञांनी केला. प. जर्मनीतील गोटिजेन विश्वविद्यालयात प्रा. पॉल ग्लोस आणि त्यांचे विद्यार्थी जे. एस्नर यांनी या बाबतीत सुरस प्रयोग करून पाहिले आहेत व त्यामुळे या जुन्या प्रश्नांची अगदी नवीन व विलक्षण उत्तरे मिळाली आहेत.

आपल्याला येणारा अनुभव मेंदूच्या पेशीत कायमचा साठविला जातो. मेंदूची ग्रहणशक्ती अचाट असते, पण अमर्याद नसते. वास्तविक पाहता आपण काहीच ' विसरू ' शकत नाही. कारण आपल्याला अनुभव व मिळालेले सर्व ज्ञान मेंदूच्या पेशीत कायमचे कोरले गेलेले असते. पण या ' फायलो 'कडे जाण्याचा मार्ग अडला म्हणजे आपण ' विसरतो '. तो मार्ग मोकळा झाला की आपल्याला आठवते.

**स्मरणशक्तीचे हेलकावे** : ग्लोस यांनी प्रयोगांना प्रारंभ केला, तेव्हा डॉ. एकलेस नावाच्या एका ब्रिटिश वैमानिकाने स्मरणशक्तीबद्दल एक आधुनिक सिद्धान्त मांडला आहे. त्याच्या छाननीपासून हा सिद्धान्त हल्ली जवळजवळ सर्वमान्य झाला आहे. डॉ. एकलेस यांचा सिद्धान्त इलेक्ट्रॉनिक गणक-यंत्रा (कॉम्प्यूटर) च्या कार्यपद्धतीवर आधारला असून त्यांचे म्हणणे असे आहे की, इंद्रियांना आलेला अनुभव मेंदूच्या पेशींना उत्तेजित करतो व ही उत्तेजनाची संवेदना मेंदूमध्ये हेलकावत राहते. जोपर्यंत हे हेलकावे उठत राहतात तोपर्यंत हे अनुभव ' स्मृती ' म्हणून कायम राहतात. विद्युत-शास्त्रज्ञांनी तयार केलेल्या इलेक्ट्रॉनिक मेंदूत तशाच पद्धतीने माहिती साठविली जाते. तेव्हा एखादी गोष्ट आठवण्यात येते तेव्हा ती या हेलकाव्यांतून सोडण्यात येते. याचा अर्थ असा की, एकलेसचा सिद्धान्त बरोबर असेल तर शरीरस्थ वीजने निर्माण होणाऱ्या उत्तेजनात स्मरणशक्तीचे मूळ आहे. मेंदूत वाहणाऱ्या विजेच्या प्रवाहात स्मरणशक्ती असते, असे सर्वसाधारण शास्त्रज्ञांचे मत आहे. या प्रवाहांच्या दृश्य निर्देशाला ' इलेक्ट्रो-एन्सेकॅलोग्राम ' (इ. इ. जी) म्हणतात.

**माकडांची आठवण** : एकलेसच्या सिद्धान्ताची परीक्षा पाहण्यासाठी प्रा. ग्लोस यांनी माकडांवर प्रयोग केला. त्या माकडांना काही गोष्टी नीट शिकवण्यात आल्या व शिकवलेली गोष्ट बिनचूक करता येईपर्यंत त्यांची तयारी करून घेण्यात आली. अर्थात ही सर्व कामे ' स्मृती ' म्हणून त्यांच्या मेंदूत साठविण्यात आली. जाग्या व सावध केलेल्या माकडांच्या इ. इ. जी. त बरेच लहान लहान हेलकावे दिसले. पण त्यांना गुंगीचे औषध दिले तेव्हा इ. इ. जी. एकदम बदलला. खूपशा लहान हेलकाव्यांऐवजी थोडेसेच पण मोठे हेलकावे दिसले. शेवटी प्रा. ग्लोस यांनी त्या माकडांच्या रक्ताचे उष्णतामान १८ सें. ग्रे. म्हणजे नेहमीच्या उष्णतामानापेक्षा निम्म्याहून कमी एवढे खाली आणले. शरीर एवढे थंड झाल्यावर, इ. इ. जी. शून्य झाला.

नंतर हळूहळू माकडांना उष्णता देऊन त्यांना पुन्हा जागे करण्यात आले. तेव्हा असे दिसले की ' गोठविण्यापूर्वी '

यांना जी कामे शिकविण्यात आलेली होती ती त्यांना तितकीच चांगली करता येत होती. पण गोठण्याच्या काळात इ. इ. जी. नष्ट झाल्याने हेलकावेही थांबले होते. याचा अर्थ असा की, हेलकावे कायम राहण्यावर स्मरण-शक्ती अवलंबून आहे असे म्हणता येणार नाही. हेलकावे थांबले तरी स्मरणशक्ती कायम होती म्हणून प्रा. ग्लोस यांनी निराळा सिद्धान्त मांडला.

**आठवणींची इमारत :** ग्लोस व त्यांचे सहकारी यांच्या मते मेंदूत स्मरणशक्तीचे एखादे भांडार किंवा गुदाम असले पाहिजे. स्मरणवह्यांच्या चवडी नीट सांभाळून ठेवणारे एकच स्थान आहे, ते म्हणजे 'न्यूरोन्स'. या पेशींत 'निसल' नावाचा एक पदार्थ असतो. या पदार्थाचे काय काम असते याचा शास्त्रज्ञांना आतापर्यंत उलगडा झालेला नव्हता. शास्त्रज्ञांना आता हे कळले आहे की, हा पदार्थ न्यूक्लेइक ॲसिड व प्रोटीन मिळून झालेल्या मिश्रणाचे लहान लहान कण असतात. हे निसल कण अत्यंत लहान असले तरीही एका कणाचे आणखी लहान भाग असतात त्यांना 'रिबोसोम' म्हणतात. या रिबोसोममध्ये 'प्रोटीन' द्रव्य तयार होत असते त्यामुळे प्रोटीन घटक कसे तयार व्हावेत हे रिबोसोमवर अवलंबून असते. म्हणजे प्रोटीनमालिकेत योग्य तो फेरफार करीत राहून रिबोसोम मेंदूला मिळालेल्या माहितीची साठवण करीत असतात.

**स्मरणवहीचे सतत लेखन** : प्रा. ग्लोस यांच्या मते मेंदूला येणाऱ्या कोणत्याही अनुभवाने मेंदूच्या पेशीत इलेक्ट्रॉन परमाणूंचा प्रवाह वाहू लागून पेशींना उत्तेजन मिळते. त्यामुळे पेशींत रासायनिक बदल घडून येतो व काही घटक रिबोसोमपासून निराळे होतात. याचा परिणाम ज्या प्रकारचे उत्तेजन असेल त्याप्रमाणे रिबोसोमच्या स्वरूपात बदल होतो. हा बदल म्हणजेच नवीन ज्ञान, प्रोटीन तयार करण्याचे रिबोसोमचे कार्य चालूच राहते. पण रिबोसोममधील परिवर्तनामुळे तयार होणाऱ्या प्रोटीनमध्येही परिवर्तन होते. म्हणजे नवीन प्रोटीनमध्ये नवीन माहितीचे प्रतिबिंब पडते. पण प्रोटीन द्रव्य शरीराला सारखे लागत असल्याने वापरल्या गेलेल्या 'सूचनाधिकारी' प्रोटीनच्या ऐवजी नवीन प्रोटीन सारखे तयार होत असते. त्यामुळे या विलक्षण सूचना-केंद्रात नष्ट झालेली प्रोटीनरूपी स्मरणवही पुन्हा सर्व लिहिली जाते. ही पद्धत अर्थात मेहनतीची असली तरी प्रोटीन अत्यंत अल्पजीवी असल्याने मिळविलेले ज्ञान कायम टिकविण्याचा हाच एक रामबाण उपाय आहे. अधिक टिकाऊ अशा कागदाऐवजी अगदी तकलादू अशा प्रोटीन-वर आपले टिपण ठेवावे लागत असल्याने बिचारा मेंदू तरी आणखी काय करणार ?

बदललेला रिबोसोम माहिती लिहून काढण्यात गढ-लेला असतो. तेव्हा स्मरणाचे प्रोटीन स्वस्थ असतात. पण बाहेरून 'मागणी' आली की त्यांचे काम सुरू होते. त्यांची एकदम बारीक शकले होतात व ही शकले ॲसेटिक कोलाहन नावाच्या एका द्रव्याला उत्तेजित करतात. या द्रव्यामुळे न्यूरोन्सची एक सबंध मालिका उत्तेजित होते. म्हणजेच स्मरणशक्ती काम करू लागते. न्यूरोन्सवर जी माहिती लिहिलेली असते ती कधीच नष्ट होऊ शकत नाही आणि त्याच्यावर दुसरे नवीन काही लिहिताही येत नाही. मेंदूतील न्यूरोन्सरूपी सर्व फायली माहितीने भरून गेल्या की, अधिक माहिती साठविणे मेंदूला शक्य होत नाही हीच मानवी ज्ञानाची परिसीमा होय. ●

## वय

॥●॥

**'योग्य वर्ष अठरा मतदाना'।**
**स्वाक्षऱ्या करित जे बहु गोळा ॥**
**'मान्य ना' म्हणति त्यां परि कन्या।**
**'जाहले अजुनि ना वय सोळा ? ' ॥**

। विकटकवि ।

# मूलभूत शास्त्रांचे महत्त्व

। सुधीर कुलकर्णी. द्विवशा ।

'शास्त्र' (Science) शब्द तसा आपण नेहमीच वापरतो. या शब्दाची नेमकी व्याख्या काय हा प्रश्न अजूनही विवाद्यच असला, तरीसुद्धा एखाद्या गोष्टीचे व्यवस्थित ज्ञान (Systematized Knowledge) म्हणजे शास्त्र असे सर्वसाधारणतः मानले जाते. असे हे व्यवस्थित ज्ञान किंवा ही शास्त्रे मुख्यत: दोन गटांत विभागली जातात :

(१) मूलभूत (Pure or Basic) शास्त्रे व (२) उपयुक्त (Applied) शास्त्रे. कोणतीही शास्त्रशाखा तिच्या गुणधर्मावरून मूलभूत आहे का उपयुक्त आहे ते ठरविता येते. या विभागणीसाठी कोणते निकष वापरले जातात, हेसुद्धा बऱ्याच अंशी 'मूलभूत' आणि 'उपयुक्त' या संज्ञांवरूनच स्पष्ट होते. एखादे ज्ञान जेव्हा केवळ ज्ञानासाठी ज्ञान म्हणून मिळवले जाते, म्हणजेच त्याचा दररोज व्यवहारात प्रत्यक्ष फारसा उपयोग होत नाही, असे ज्ञान मूलभूत शास्त्रात मोडते व ज्या ज्ञानाचा दैनंदिन जीवनात प्रत्यक्ष उपयोग होतो, त्यास 'उपयुक्त शास्त्र' म्हणतात. परंतु या आधारावरसुद्धा प्रत्येक शास्त्रशाखेचे अगदी नि:संदिग्धपणे वर्गीकरण करता येईलच असे मात्र मुळीच नाही. (तसे करण्याची फारशी आवश्यकताही भासत नाही.) उदाहरणादाखल आपण गणितशास्त्राच्या काही शाखांचा विचार करू. Complex Numbers ही शाखा प्रथम निर्माण झाली, ती केवळ एक तात्त्विक विचार म्हणूनच. परंतु नंतर असे आढळून आले की, अशा संख्यांचे प्रवाही विद्युत्शास्त्रात (Current Electricity) खूप उपयोग आहेत. Matrices हा प्रकारसुद्धा पूर्वी फक्त अंकाच्या रांगा व स्तंभामध्ये मांडणी करण्याइतपतच मर्यादित होता, त्याचेसुद्धा विद्युदभियांत्रिकीमध्ये (Electrical Engineering) बरेच उपयोग आहेत. मूलभूत गणिताची एक महत्त्वाची शाखा म्हणजे अमूर्त बीजगणित, (Abstract Algebra) हेही पुंजयामिकात (Quantum Mechancics) वापरले जाते. परंतु असे जरी असले, तरी ढोबळ मानाने आपल्याला असे म्हणता येईल की, जी शास्त्रे वैद्यकीय, अभियांत्रिकी अशा व्यावसायिक महाविद्यालयांतून शिकवली जातात ती उपयुक्त व शास्त्र-महाविद्यालयांतून शिकवली जाणारी शास्त्रे मूलभूत.

मूलभूत आणि उपयुक्त - अशी दोन्हीही शास्त्रे एकाच शास्त्ररूपी ज्ञानवृक्षाच्या शाखा आहेत, तर आपण त्यांना महत्त्वाच्या दृष्टीने समान लेखण्यास काय हरकत आहे ? तात्त्विक दृष्टचा तरी आपण ही उभय प्रकारची शास्त्रे सारखीच महत्त्वाची आहेत, असे मानले पाहिजे. पण असे आढळून येते की, मूलभूत शास्त्रांना सामान्यतः कनिष्ठ दर्जाचे मानले जाते. शास्त्रमहाविद्यालयांत प्रवेश करणारे बहुतेक सर्व विद्यार्थी वैद्यकीय अथवा अभियांत्रिकी महाविद्यालयांत प्रवेश मिळविण्याचे उद्दिष्ट मनाशी बाळगूनच शास्त्र-महाविद्यालयात प्रवेश करतात. महाविद्यालयांतील निरनिराळ्या विषयांचे प्राध्यापकसुद्धा त्यांच्या या उद्दिष्टांना उचलून धरतात व ते योग्यही आहे. परंतु, असे करताना ते बऱ्याच वेळा मूलभूत शास्त्रांची अवहेलना करतात, या गोष्टीचे फारसे समर्थन करता येणार नाही.

" S. Y. B. Sc. ला येऊ नका, " अथवा " तुमच्या व माझ्या दुर्दैवाने S. Y. B. Sc. ला आलातच, तर..." ही किंवा अशा प्रकारची वाक्ये प्राध्यापकांच्या तोंडून

बऱ्याच विद्यार्थ्यांनी (विशेषत: प्रथम वर्ष शास्त्राच्या विद्यार्थ्यांनी) ऐकली असतील. मूलभूत शास्त्रे शिकविणाऱ्या प्राध्यापकांनाच त्या शास्त्रांचे महत्त्व कळलेले नाही, असे लिहायला कुणाचीही लेखणी कचरावी, पण त्या विधानाला पुष्टिदायक परिस्थिती मात्र दिसून येते. महाविद्यालयांनादेखील आपले अधिकाधिक विद्यार्थी वैद्यकीय अथवा अभियांत्रिकी महाविद्यालयांत जाण्यात जास्त भूषण वाटते. ज्या विद्यार्थ्यांना काही कारणांमुळे अशा महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळत नाही, असेच विद्यार्थी बहुधा द्वितीय वर्ष शास्त्र या वर्गाकडे वळतात. विद्यापीठेसुद्धा पदवीपूर्व व प्रथम वर्ष शास्त्र या विषयांचे अभ्यासक्रम व्यावसायिक (Professional) महाविद्यालयातील पहिल्या काही वर्षांच्या अभ्यासक्रमांना पूरक असेच आखतात. (यामुळे बऱ्याच वेळा शास्त्राध्यापनाचा नैसर्गिक अनुक्रमही बदलावा लागतो.) हे सर्व पाहिल्यावर कुणाच्याही मनात असाच प्रश्न उद्भवेल की खरोखरच मूलभूत शास्त्रे इतकी टाकाऊ व दुर्लक्षणीय आहेत का ? आपण त्यांची एवढी उपेक्षा करतो हे बरोबर आहे का ?

या प्रश्नांची उत्तरे शोधताना आपण एक गोष्ट मुख्यत: ध्यानात ठेवली पाहिजे, ती म्हणजे मूलभूत शास्त्रे हेही एक प्रकारचे ज्ञान आहे. ते मिळवण्यात एक प्रकारचा आनंद आहे व हे ज्ञान ज्ञानासाठी ज्ञान म्हणूनच मिळवले पाहिजे. आपण मिळवलेल्या ज्ञानाचा आपल्याला रोजच्या व्यवहारात उपयोग व्हावा हे तत्त्व म्हणून ठीक आहे; परंतु हा उपयोग ते ज्ञान मिळवीत असतानाच आपल्याला समजला पाहिजे, असा आग्रह नेहमीच धरून चालणार नाही. विशेषत: शास्त्रात तर आजवर असे घडत आले आहे की, एखादी गोष्ट प्रथम अभ्यासली जाते, ती नैसर्गिक कुतूहल म्हणूनच आणि त्यानंतर बऱ्याच दिवसांनी अशा रीतीने मिळालेल्या माहितीचे अत्यंत अनपेक्षित असे उपयोग आढळून येतात. उदाहरणार्थ, न्यूटनने जेव्हा त्याच्या गणितशास्त्रातला तिसरा सिद्धान्त (प्रत्येक क्रियेला एक समान व विरुद्ध प्रतिक्रिया असते) शोधून काढला, तेव्हा त्याला यत्किंचितही कल्पना नव्हती की, त्याच्या या सिद्धान्ताचा विसाव्या शतकात अंतराळयाने, जेट विमाने यांसाठी एवढ्या मोठ्या प्रमाणावर उपयोग होईल. वटवाघूळ या प्राण्याच्या शरीरशास्त्राचा अभ्यास करताना असे आढळून आले की, हा प्राणी स्वत:च्या तोंडातून ध्वनिलहरी (Sound Waves) सोडतो, त्या प्रवास करीत असताना त्यांच्या मार्गात एखादा अडथळा आला, तर त्या अडथळ्यावर आपटून त्या परत येतात व वटवाघुळाच्या कपाळाशी असलेल्या एका विशिष्ट अवयवात पकडल्या जातात. या पकडलेल्या लहरींवरून वटवाघुळास एखाद्या पदार्थाचे अस्तित्व व त्याचे स्वत:पासूनचे अंतर समजते. नेमक्या याच गोष्टींचा उपयोग करून ' रडार ' (Radar) हे उपकरण बनवण्यात आले व त्याचा सध्या किती उपयोग होतो, ते आपण पाहतोच. शास्त्राच्या अभ्यासाला संपूर्णपणे कलाटणी देणारे क्रांतिकारक शोध – मग ते वाफेचे यंत्र, आकाशवाणी असे असोत किंवा सापेक्षतावाद, अनिश्चिततेचे तत्त्व (Uncertainty Principle) अशासारखे तात्त्विक असोत, किंवा अणुबाँब, हैड्रोजन बाँब असे जगाला दिङ्मूढ करणारे असोत – हे सर्वच्या सर्व शोध मूलभूत शास्त्रातील संशोधनामुळे लागलेले आहेत. उपयुक्त शास्त्रातील सर्वच शाखा या मूलभूत शास्त्रे व त्यांतील संशोधन यांची जोड नसेल तर आधारशून्य ठरतील. बैजिक भूमितीतील (Coordinate Geometry) लंबवर्तुळाच्या (Ellipse) अभ्यासाचा उपयोग ग्रहांच्या कक्षा व गती ठरवताना होतो, तर परिवलयाच्या (Parabola) अभ्यासाचा उपयोग निरनिराळ्या प्रकारची व केंद्रांतराची भिंगे तयार करताना होतो. अशा रीतीने मूलभूत शास्त्रे म्हणजे हिऱ्यांच्या खाणी आहेत वरील उदाहरणांवरून कमीत कमी एवढे तरी स्पष्ट होईल की, एखाद्या गोष्टीचा नेहमीसाठी उपयोग दिसून आला नाही, म्हणजे ती खरोखरच संपूर्णपणे निरुपयोगी असते, असे मुळीच नाही.

मूलभूत शास्त्रांकडे आणखी एका वेगळ्या दृष्टिकोनातून पाहिले जाते. आपण ज्या सृष्टीत राहतो, ती सृष्टी काही ठराविक नियमांनुसार चालते. आपल्याला जर व्यवस्थित रीत्या जगायचे असेल, तर या नियमांशी आपण स्वत:ला जुळवून घेतले पाहिजे. यासाठी हे नियम आपल्याला ठाऊक असायला हवेत. ही गोष्ट या सृष्टीच्या सखोल अभ्यासाने म्हणजेच मूलभूत शास्त्रांच्या अभ्यासानेच शक्य होते. या संदर्भात प्रसिद्ध वास्तवशास्त्रज्ञ (Physicist) फाइन्मन् (Feynman) यांनी फारच सुंदर विचार मांडले आहेत. त्यांच्या मते या सर्व चल

वस्तूंनी भरलेले जग-म्हणजे एक बुद्धिबळाचा डाव आहे. हा डाव देव खेळतात व आपण या खेळाचे प्रेक्षक आहोत. आपल्याला या खेळाचे नियम माहीत नाहीत, आपल्याला फक्त या खेळाचे निरीक्षण करण्याचीच परवानगी आहे. अर्थात् आपण बऱ्याच वेळपर्यंत निरीक्षण केल्यास आपल्याला काही नियम समजू शकतील, या नियमांनाच मूलभूत शास्त्रे असे म्हणतात. बुद्धिबळाचे सर्व नियम समजले, म्हणजे आपल्याला चांगली चाल करता येईलच अथवा एखाद्या खेळाडूने विशिष्ट चाल का केली ते समजू शकेल असे मुळीच नाही. पण या गोष्टी साध्य होण्यासाठी सगळे नियम माहीत असणे, ही पुरेशी नसली तरी आवश्यक बाब निश्चितच आहे; याबाबत दुमत होण्याचे काही कारण नाही. मूलभूत शास्त्रे शिकली पाहिजेत ती यासाठीच.

मूलभूत शास्त्रांवर आणखी एक आक्षेप घेतला जातो, तो म्हणजे या शास्त्रांच्या पदवीधरांना सध्या बाहेर फारसा वाव नाही. थोड्याफार प्रमाणात हा आक्षेप खराही आहे. परंतु ही स्थिती काही फक्त मूलभूत शास्त्रांचीच नाही. अभियांत्रिकी पदवीधरांनासुद्धा सध्या प्रचंड प्रमाणात मागणी आहे, असे मुळीच नाही. त्यांच्या तुलनेने वैद्यकीय पदवीधरांची स्थिती थोडीशी चांगली आहे. परंतु या शिक्षणक्रमाकडे वळणाऱ्या विद्यार्थ्यांची दिवसेंदिवस वाढती गर्दी पाहता अजून काही दिवसांनी तेथेसुद्धा मंदी येईल असे दिसते. सध्या सर्वच क्षेत्रांत सुशिक्षितांचा पुरवठा मागणीपेक्षा खूपच अधिक असल्यामुळे सुशिक्षितांची बेकारी वरचेवर वाढत आहे आणि म्हणूनच या गोष्टीला मूलभूत शास्त्रांचे पदवीधरसुद्धा अपवाद नाहीत. असे असले तरी अजूनसुद्धा आपल्या देशात बऱ्याचशा नोकऱ्या अशा आहेत की, ज्यांना 'फक्त पदवी' लागते, ती कोणत्या विषयात आहे त्याला फारसे महत्त्व नसते. अशी ठिकाणे म्हणजे सरकारी नोकऱ्या, लेखनिकी अथवा प्रशासकीय कामे, बँका वगैरे

पदवीपरीक्षेनंतरसुद्धा काही तांत्रिक, निमतांत्रिक शिक्षणक्रम पूर्ण करणाऱ्यांना त्याप्रमाणे थोडीफार मागणीही असते. अशा शिक्षणक्रमांची माहिती असणे मात्र आवश्यक आहे. तसेच सध्या रासायनिक उद्योग सतत वाढत असल्यामुळे रसायनशास्त्राच्या पदवीधरांनाही मागणी असते. मूलभूत शास्त्रांमध्ये आपल्या देशात खूप महत्त्वाचे विपुल संशोधन होते असे मात्र दिसून येत नाही. याला जी बरीच कारणे आहेत, त्यांतील एक म्हणजे मूलभूत शास्त्रांचे बरेचसे विद्यार्थी नाइलाज म्हणूनच ती शास्त्रे शिकत असतात. ही परिस्थिती बदलायला हवी. विद्यार्थ्यांनी मूलभूत शास्त्रे आवड म्हणून स्वेच्छेने शिकले पाहिजे. विद्यापीठांनीही आपले जुनाट व परंपरागत अभ्यासक्रम बदलून आधुनिक व प्रगत ज्ञान विद्यार्थ्यांना दिले पाहिजे. याची जाणीव उशिरा का होईना, पण बऱ्याच विद्यापीठांना झाली आहे ही आनंदाची गोष्ट आहे. महाविद्यालये व त्यांतील प्राध्यापक यांनीसुद्धा मूलभूत शास्त्रांच्या विद्यार्थ्यांना ती शास्त्रे व त्यांना बाहेर असलेला वाव यांसंबंधी योग्य ते मार्गदर्शन केले पाहिजे. यासंबंधीची मात्र सध्याची स्थिती अत्यंत असमाधानकारक आहे, असे म्हटले पाहिजे. विशेषतः वैद्यकीय महाविद्यालयांत प्रवेश न मिळाल्यामुळे जे विद्यार्थी द्वितीय वर्ष शास्त्राला येतात (अशा विद्यार्थ्यांची संख्या दर वर्षी खूपच मोठी असते.) त्यांनी पुढे काय करावयाचे या बाबतीत त्यांना योग्य ते मार्गदर्शन मिळू शकत नाही, असे आढळून येते. एकंदरीत पाहता मूलभूत शास्त्रांचे विद्यार्थी, प्राध्यापक, महाविद्यालये, विद्यापीठे व शासन या प्रत्येक घटकाने मूलभूत शास्त्रांच्या उत्थानासाठी मनापासून प्रयत्न केले, तरच मूलभूत शास्त्रांना सध्या जी एक प्रकारची मरगळ आलेली आहे, ती बऱ्याच प्रमाणात कमी होईल. ●

# काळा बाजार

। डॉ. दि. ब. केरूर।

बाजारपेठ एक सुपरिचित गोष्ट आहे. ग्राहक-विक्रेत्यांची गर्दी, नानाविध वस्तूंच्या राशी, किमतीविषयी देवाण-घेवाण आणि क्रयविक्रय हे बाजारपेठेचे स्वरूप.

कोणाही उत्पादकाने यावे, आपली वस्तू विकावी, कोणाही ग्राहकाने यावे व हवी ती वस्तू खरीदावी असा मुक्त व्यवहार असेल, विक्रेते आणि ग्राहक उभय पक्ष दक्ष असतील तर त्या साऱ्या बाजारपेठेमध्ये वस्तूची एकच किमत स्थिरावण्याची प्रवृत्ती राहते. अशा मुक्त, खुल्या बाजारपेठेत व्यवहारास उतरणारे विक्रेते वा ग्राहक दोघेही समान बाजारभाव गृहीत धरूनच व्यवहार करण्यास प्रवृत्त होतात.

विक्रेता अधिकाधिक किंमत आकारू पाहतो तर ग्राहक कमीत कमी किंमत देण्यास उत्सुक असतो. हे सत्य असले तरी उभय पक्षांतील मुक्त स्पर्धेमुळे बाजारपेठे-मध्ये एका वस्तूची एकच किंमत स्थिर होऊ पाहते. अशी बाजारपेठ मुक्त किंवा खुली बाजारपेठ होय. यामुळेच एक वस्तू, एक किंमत हे बाजारपेठेचे व्यवच्छे-दक लक्षण म्हणून अर्थशास्त्राने मानले आहे.

व्यवहारात बाजारपेठेचे हे लक्षण नित्य अनुभवास येईल असे घडत नाही. वस्तूचा पुरवठा एकाच व्यक्तीच्या किंवा उत्पादक संस्थेच्या हाती केंद्रित असतो. अशा मक्ते-दारीमध्ये ग्राहकवर्ग अगतिक होतो आणि मक्तेदार या अगतिकतेचा – वेगवेगळ्या किंमती आकारून – लाभ घेतो. रेल्वे, विद्युतपुरवठा, विशेषज्ञ, डॉक्टर्स, तंत्रज्ञ यांच्या व्यवहारात हा अनुभव येतो.

**युद्ध आणि नियंत्रित बाजार**

बाजारपेठेच्या संदर्भात खुली बाजारपेठ व मक्तेदारी बाजारपेठ अशा दोन बाजारपेठा आजवर सुपरिचित होत्या. दुसरे महायुद्ध झाले आणि बाजारपेठांना रंग चढला. काळाबाजार हा त्यातलाच एक अवतार आहे. मुळात सर्वच वस्तू कमी-अधिक दुर्मिळ असतात. वाढत्या गरजांच्या संदर्भात ही दुर्मिळता वाढत जाते, युद्धकाळात ती विशेषत्वाने जाणवते. वाढती मागणी व अपुरा पुर-वठा या ओढाताणीत वस्तूंच्या किंमती चढत गेल्या तर आश्चर्य नव्हे. अशा स्थितीत वस्तूंच्या किंमती आणि वस्तूंचे प्रत्यक्ष वाटप नियंत्रित करणे जनहिताच्या दृष्टीने आवश्यक ठरते. असे झाले म्हणजे नियंत्रित बाजारपेठ अस्तित्वात येते.

नियंत्रित बाजारपेठेमुळे सामान्य जनांचे हित साध्य होण्याची शक्यता असली तरी धनिक ग्राहकांची अडव-णूक होते. जवळ पैसा असूनही पुरेशी वस्तू मिळत नाही. कारण वाटप नियंत्रित असते. ग्राहकवर्ग अधिक किंमत देण्यास उत्सुक असूनही विक्रेत्यास लाभ होत नाही. कारण किंमत नियंत्रित आहे–आणि मग **उत्सुक धनिक ग्राहक आणि लोभी विक्रेते परस्परांची सोय पाहू लाग-तात आणि विख्यात काळा बाजार निर्माण होतो.**

नियंत्रित बाजारपेठेची कक्षा कायद्याच्या लक्ष्मणरेषेने रेखित असते, तर काळा बाजार या रेषेच्या पलीकडे राहतो. कायद्याच्या कक्षेबाहेर रूढ झालेला हा काळा बाजार आजच्या आर्थिक जीवनाचे मोठे शल्य ठरला आहे. बेकायदेशीर व विधिबाह्य असूनही अगतिक

रूढीचा प्रचंड आधार लाभून काळा बाजार आजच्या अर्थव्यवस्थेत स्थिरावलेला दिसतो. काळा बाजार ही घटना मक्तेदारीहून भयावह असते. अंधारात चालू असलेला हा उघडा व्यवहार असतो.

एखाद्या क्षेत्रात काळा बाजार रूढ झाला म्हणजे त्याचा प्रभाव केवळ त्या क्षेत्रापुरता मर्यादित राहत नाही— अल्पावधीत आर्थिक जीवनाची सारीच क्षेत्रे ग्रासली जातात.

या काळ्या बाजाराची थोडी अधिक मूलग्राही मीमांसा आवश्यक आहे. चढत्या भडकत्या अनियंत्रित किंमती हे काळ्या बाजाराचे व्यवच्छेदक लक्षण मानण्यास प्रत्यवाय नाही.

श्रमविभाग आणि खाजगी मालमत्ता यांवर अधिष्ठित असणाऱ्या अर्थव्यवस्थेत वस्तूंचा क्रय–विक्रय, विनिमय साधणारी किमतयंत्रणा अनिवार्य राहते. किंमत दिल्याने ग्राहकास वस्तू उपलब्ध होते आणि किंमत मिळाल्याने विक्रेता वस्तू विकण्यास उत्सुक असतो. अशा रीतीने मागणी आणि पुरवठा यांचा समन्वय किमतयंत्रणा साधते. यामुळेच किमतयंत्रणा आजच्या अर्थव्यवस्थेची नियंत्रक मानली गेली आहे.

किंमत द्यावी आणि वस्तू मिळवावी. असे स्वातंत्र्य ग्राहकास असले तरी मुळात किंमत देण्यासाठी लागणारा पैसा म्हणजे क्रयशक्ती असावी लागते. किंमत देण्याइतकी पुरेशी प्राप्ती नसेल तर ग्राहकाला वस्तूशिवाय राहावे लागते. आजच्या आर्थिक जीवनातील हीच मुख्य आपत्ती होय. याउलट ज्यांची प्राप्ती अधिक असते अशा धनिक ग्राहकांना प्रसंगी वाढती किंमत देऊन वस्तू मोठ्या प्रमाणात खरीदण्याची संधी उपलब्ध असते आणि विक्रेतेही या धनिक ग्राहकासच वस्तू विकण्यास उत्सुक असतात. रूढ अर्थव्यवस्थेमध्ये हे योग्यच ठरते.

वाढत्या गरजांच्या संदर्भात मूळच्या दुर्मिळ वस्तू अधिक दुर्मिळ होतात. त्याच्या किंमती वाढत जातात. परिणामतः अल्प आणि मध्यम प्राप्तीच्या ग्राहकांची कोंडी होत जाते. या वस्तुस्थितीचा नीट अभ्यास केला तर **प्राप्तीची विषमता हे या संकटाचे मूळ असल्याचे ध्यानात येईल. जोवर समाजामध्ये आर्थिक विषमत-आहे, तोवर बाजारपेठ आणि किंमतयंत्रणा धनिकांना अधिक अनुकूल राहून गरीब व मध्यमवर्गीयांची कोंडी होत राहील यात शंका नाही.**

समाजातील या सामान्य जनांमध्ये असंतोष निर्माण होऊ नये यासाठीच जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती नियंत्रित ठेवण्याचा बुद्धिपुरस्सर यत्न केला जातो. युद्ध किंवा तत्सम काळातील किंमतनियंत्रणाचे (Price Control) युक्तत्व यामध्ये सापडते.

किंमतनियंत्रणाचे युक्तत्व मान्य केले तरी किंमतीची पातळी कोणती असावी हा प्रश्न कठीण ठरतो. सामान्य ग्राहकांच्या क्रयशक्तीच्या मर्यादेमध्ये ही पातळी असावी हा उद्देश स्पष्ट असतो. तथापि विक्रेत्याच्या दृष्टीने ही पातळी फारच खाली असेल तर उत्पादक विक्रेता असंतुष्ट राहातो.

**काळ्या बाजाराचा मूलाधार : धनिक ग्राहक**

मुक्त बाजारपेठ असती तर जी किंमत सहज उपलब्ध झाली असती त्या संदर्भात नियंत्रित किंमत भलतीच कमी असल्याने विक्रेतावर्ग असंतुष्ट राहील यात आश्चर्य नाही.

नियंत्रित किंमत खुल्या किंमतीहून कमी असल्याने धनिकांना आता अल्पश्रमात विपुल प्रमाणात खरेदी करण्याची संधी उपलब्ध होते आणि गरीब वर्ग पुन्हा वस्तूपासून वंचित होतो. यातून मार्ग काढण्यासाठी किंमत नियंत्रणाबरोबरच वस्तूवाटपाही नियंत्रित करणे आवश्यक ठरते. हीच शिधापद्धती किंवा rationing होय.

किंमत आणि वाटपनियंत्रण यांमुळे गरीब वर्गाचा प्रश्न सुटत असला तरी विक्रेते आणि धनिक ग्राहक उभयता मात्र असंतुष्ट राहतात. यातूनच काळा बाजार उद्भवू लागतो. उत्पादक — विक्रेते वस्तूंचा साठा करून बाजारपेठेत वस्तूंची टंचाई निर्माण करतात. वस्तूंची दुर्मिळता आणि टंचाई यांतील भेद नीट ध्यानात घ्यावा लागेल. **वर्धिष्णू गरजांच्या संदर्भात वस्तू मुळात दुर्मिळ असते. तथापि मर्यादित वस्तूंचा साठा करून** बाजारपेठेत अपुरा **पुरवठा ठेवल्याने टंचाई उद्भवते.**

**किंमत आणि वाटप-नियंत्रणामुळे नियंत्रित बाजारपेठेतून बाजूस गेलेला वस्तूंचा साठा आता विधिबाह्य मार्गांनी धनिक ग्राहकांना वाढत्या अनियंत्रित किंमतीत विकला जातो. हाच काळा बाजार होय.**

हे विश्लेषण नीट जाणले तर काळ्या बाजाराचा मुख्य आधार धनिक ग्राहक होय, हे स्पष्ट होईल. काही अन्य मार्गांनी व्यक्तीच्या प्राप्तीवर आणि मालमत्तेवर काही नियंत्रण लादले आणि धनिकांची क्रयशक्ती मर्यादित केली तर काळ्या बाजाराचे मूळ नाहीसे होण्याची शक्यता राहते आणि येथेच काळ्या बाजाराचे सामर्थ्य ध्यानात येईल. वाढती चढती किंमत देण्याची धनिकांची तयारी वाढत्या अमाप नफ्याचा विक्रेत्याला असणारा लोभ यांतून काळा बाजार सुखेनेव पुष्ट होत जातो.

काळा बाजार बेकायदेशीर असल्याने त्यातील धोका उघड आहे. धनिक ग्राहकांना, नफेबाज विक्रेत्यांना, हे एक आव्हान ठरते. त्यातील धाडस त्यांना एक पराक्रम वाटतो. त्यातील यश अपूर्व आर्थिक कौशल्य मानले जाते. काळ्या बाजारातील कर्तबगारी आर्थिक यशाची निर्णायक निकष ठरू पाहते आणि उत्तरोत्तर काळ्या बाजाराचा रंग खुलत जातो.

**आक्रमक काळा पैसा**

काळ्या बाजारात विक्रेत्याला मिळालेला पैसा काळा पैसा असतो. त्याचा कायदेशीर हिशेब ठेवणे, हिशेब देणे, सगळ्याच गोष्टी अवघड असतात आणि त्या टाळल्याही जातात. काळा पैसा काही झाले तरी पैसा असतो. ती क्रयशक्ती असते. तिचा विनियोग करण्याचा मोह स्वाभाविक असतो आणि एका काळ्या बाजारात उपलब्ध झालेला काळा पैसा अन्य बाजारपेठांमध्ये जातो. विशेष दुर्मिळ वस्तूंच्या बाजारपेठा अल्पावधीतच काळ्या पैशाच्या कक्षेत येतात. जमीन, घर, यांसारखे स्थावर व्यवहार; सोने, चांदी, जडजवाहीर यांसारख्या मौल्यवान वस्तूंच्या पेठा, सिनेमासारखे विलासी क्षेत्र– या सर्व क्षेत्रांमध्ये काळा पैसा अनिर्बंध संचार करू लागतो. राजकारण, शिक्षण, धर्म ही क्षेत्रेही यातून मुक्त राहत नाहीत.

आर्थिक विषमता काळ्या बाजाराचे मूळ कारण होय. ही विषमता विद्यमान अर्थव्यवस्थेचे एक अंगभूत लक्षण मानले जाते आणि या अर्थव्यवस्थेची अर्थनीति, – विशेषतः चलननीती – या विषमतेस पोषकच ठरू पाहत आहे. आज चलनविस्तार, चलनवृद्धी अपरिहार्य मानली जाते. चलनवृद्धी आपला प्रस्तुत विषय नाही. तथापि चलनवृद्धीमुळे किंमतवाढ, प्राप्तिवाढ, पुन्हा किंमतवाढ असे दुष्टचक्र उद्‌भवते. या प्रक्रियेत धनिक अधिक धनिक होतात आणि गरीब अधिक गरीब होतात. चलनवृद्धीचा हा दुष्परिणाम ध्यानात घ्यावयास हरकत नसावी.

–चलनवृद्धीमुळे मूळची विषमता अति दुष्ट स्वरूप धारण करते यात शंका नाही. अशा स्थितीत तथाकथित बेकायदेशीर काळा बाजार रूढ व सुप्रतिष्ठित बाजार न ठरल्यासच नवल.

**काळाबाजार चलनाधिष्ठित अर्थव्यवस्थेस जडणारा कर्करोग होय. केवळ काही कायदे करून, नियंत्रण ठेवून या रोगातून मुक्त होणे सर्वथैव अशक्य. कायदे करणारा शासक व कायद्याची कार्यवाही करणारा शासनाचा सेवक, हाही लोभ-मोहादिकांना बळी पडणारा माणूसच असतो. थोड्या धाडसाने विनासायास मिळणारा काळा पैसा कुणाला नको असतो ? समाज आणि अर्थव्यवस्था यांचे काही परिवर्तन, काही मूलभूत पुनर्रचना झाली तर काही सुस्थितीची आशा धरावी.**

समाजहितबुद्धी, धर्मप्रवृत्ती, यांना कोणी आवाहन करील. परंतु या आवाहनाचे सामर्थ्य आता क्षीण झाले आहे.

(आकाशवाणी, पुणे यांच्या सौजन्याने)

# भारतीय संस्कृती आणि योगी अरविंद

। सुलभा साने. द्विवसा ।

भारतीय संस्कृती हृदय आणि बुद्धी यांची पूजा करणारी आहे. तिला सत्यं शिवं सुन्दरंची फार ओढ आहे. कर्म-ज्ञान-भक्तीचा हा जिवंत महिमा आहे. ही संस्कृती म्हणजे सहानुभूती, विशालता आणि सत्याचे प्रयोग. नुसता स्थाणू न रहाता सत्याचा मागोवा घेत राहणे हे तर वैशिष्टय. हा पाठलाग ज्ञानाचा आहे. सत्यं शिवं सुन्दरंची पूजा करणारी ही संस्कृती संग्राहक वृत्तीची आहे. 'भारतीय संस्कृती' असे नुसते शब्द जरी उच्चारले तरी सागर आणि आकाश समोर येतात. समुद्राची अथांगता आणि आकाशाची व्यापकता यांना कवटाळणारी ही संस्कृती आहे.

पण खरेच विचार केला तर 'भारतीय संस्कृती' या शब्दात हे सामर्थ्य आहे का? शब्दाचे सामर्थ्य शब्दपणात नसून शब्दामागे दडलेल्या अर्थात असते. भारतीय संस्कृती या शब्दांना ज्ञानाची फार मोठी परंपरा लाभली आहे. मध्ययुगीन कालखंडात भारतीय संस्कृतीचे स्वरूप अवास्तव कर्मकांडांनी तेजोहीन झाले; पण विवेकानंद, बाबू अरविंद यांसारख्यांनी या तेजाला लागलेले ग्रहण दूर करण्याचा प्रयत्न केला. प्रस्तुत ठिकाणी भारतीय संस्कृती आणि योगी अरविंद असा विषय आहे. भारतीय संस्कृतीशी अरविंदांचे असलेले नाते या दृष्टिकोनातून हा विचार करावा लागतो. म्हणजेच अरविंदांचे भारतीय संस्कृतीविषयक विचार असा भाग आहे. अरविंद महर्षी आहेत. साहजिकच त्यांना भारतीय संस्कृती निकटची आहे. संस्कृती म्हणजे संपूर्ण समाजजीवनाला व्यापून राहणारी शक्ती. संपूर्ण जीवन म्हणजे त्यात तत्त्वज्ञान, साहित्य, कला या गोष्टी प्रामुख्याने येतात.

अरविंद या भारतीय संस्कृतीबाबत बोलताना म्हणतात, "भारतीय संस्कृती स्वतःसिद्ध, स्वयंप्रभ आहे. सांताकडून अनंताकडे जाण्याची तिला ओढ आहे. भेदातून अभेदात, विचारातून विवेकात शिरण्याचा तिचा स्वभाव आहे." मानवी संस्कृतीच्या उत्क्रांतीसाठी पूर्वापार चालत आलेल्या भूमिकेवरून पुनःस्थापना हा मानववंशाच्या नवीन महान उदात्त जीवनाचा दिव्य आविष्कार आहे. अखिल मानवजात अध्यात्ममय होण्यासाठी एक प्रयत्न आहे. त्या वेळी अरविंदांनी फार पूर्वीपासूनच्या अद्वैताचाच उद्घोष केला. त्यांच्या मते भारतीय संस्कृती म्हणजे आधिभौतिकता आणि बाह्य गौरवाच्या विरुद्ध मानवतेच्या आध्यात्मिक आणि अंतर्गत उत्क्रांतीचा निदर्शक आविष्कार आहे.

संस्कृतीचा विचार करताना प्रथम साहित्याकडे वळावे लागते. संस्कृतीचा विकास किंवा तिची शक्ती तिच्या साहित्यातून उमटणाऱ्या पडसादावरून ठरवता येते. संस्कृत भाषेइतकी संपन्न अन्य भाषा आहे काय? महाभारत या महाकाव्याशी जगातील एका तरी काव्याची तुलना होऊ शकेल काय? त्यामागचे सत्य हे की हिंदू मनाने भौतिक जगताकडे कधीच पाठ फिरवली नाही. अरविंदांचाच या संदर्भात विचार करायचा म्हटले तर त्यांनी पुष्कळ कविता लिहिल्या पण तरीही केवळ स्वप्नसृष्टीत वावरणारे कवी ते झाले नाहीत. ते उत्क्रांतिवादी विचारवंत होते, गूढ आध्यात्मिक संशोधक होते, नवयुगाचे प्रेषित होते, मानवतेचे उद्गाते होते.

Life Divine हे त्यांचे पुस्तक म्हणजे दिव्य जीवनाची, जीवनाच्या उत्क्रांतीची संपूर्ण प्रक्रिया आहे. Synthesis of Yoga मधून योगसाधनेचे पर्यायाने पूर्ण योगाचे विवेचन आले आहे. On the Veda मध्ये इतिहासाचे

स्मरण होते. Human Cycle मध्य सामाजिक राजकीय दृष्टिकोन आहे. Essays on Geeta मध्ये संपूर्ण निष्काम कर्मयोगाचे Divine yoga चे विवेचन आहे. 'सावित्री' हे तर अप्रतिम महाकाव्य ! त्यामध्ये जुन्या वैदिक तत्त्वांना नवा वैश्विक साज चढवला आहे. त्या सर्वांत अव्यक्ताची ओढ आहे. मातीची मृण्मयता संपवून अमृतत्वाकडे जायचे आहे. हीच गोष्ट भारतीय संस्कृतीने केली आहे. जाणिवेच्या पातळीवरून नेणिवेच्या पातळीवर जाऊन तेथेही एक अतीतता अनुभवण्यासाठी भारतीय संस्कृतीची भूमिका अरविंदांच्या साहित्यामागे आहे.

काव्यविषयक दृष्टिकोन मांडताना ते म्हणतात, " कविता म्हणजे केवळ निसर्गाचे वास्तवाच्या दृष्टिकोनातून केलेले अनुकरण नाही. कवीचे व्यक्तित्व दुहेरी असले पाहिजे. दैनंदिन जीवनातला माणूस ही एक बाजू आणि जीवनाच्या अंतर्भागातील गूढ शोधण्याची दृष्टी असलेला माणूस ही दुसरी बाजू. कवीची निरीक्षणशक्ती आणि अंतर्मुख वृत्ती एकत्र झाल्याखेरीज कवितेला पूर्णता येत नाही.

अरविंदांचे सौंदर्यशास्त्र सृजनशक्तीची गहन रमणीयता आहे. त्यांच्या मते प्रत्येक सृजनात परमात्म्याची रमणीयता आहे. या सौंदर्यशास्त्राच्या भूमिकेच्या मुळाशी वेद, उपनिषदे आहेत. उपनिषदांची निर्मिती पहाडांच्या वृक्षांच्या सान्निध्यात झाली. एक नैसर्गिक शांती, अनामयत्व हे या वेद, उपनिषदांचे वैशिष्टय. या वैशिष्टयाचाच स्रोत अरविंदांनी पुढे नेला आहे. सावित्री या महाकाव्यात एक वैदिक प्रतीक घेऊन महाकाव्य रचले आहे. वेदातील पहाट उचलून, महाभारताच्या कथेची जोड देऊन तिला चिंतनाचे नवीन तत्त्वज्ञानाचे लेणे चढवून साजिरे रूप दिले. थोडक्यात, तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने अरविंद प्लेटो, कँट, हेगेल यांच्या तोडीचे; तर काव्यदृष्टीने अरविंद दान्ते, मिल्टन, गटे यांना जवळचे वाटतात. अरविंदांना याच धरतीत घट्ट पाय रोवून उभा असलेला आणि आकाशाला हात भिडवू इच्छिणारा माणूस निर्माण करायचा आहे.

Love must not cease to live upon the earth
For love is the bright link and 'twixt earth heaven.

Love is the far transcendent's angle here
Love is man's lien on the Absolute.

भारतीय कलेचा विचार करताना अरविंद म्हणतात :

Indian art is an intuitive and spiritual art and must be seen with the intuitive and spiritual eye.


त्यांच्या मते भारतीय कलाकृतीत एकात्म कलात्मकतेचा अभाव तर मुळीच नाही; पण समग्र एकात्मतेचे अस्तित्व आगळे आहे. कोणतीही वस्तू, तिच्यातले सौंदर्य भूतल व आकाश यांच्याच संदर्भात पाहिले पाहिजे. या दृष्टीमुळे कालीच्या मुद्रेवरील भयानकतेचा आविर्भाव म्हणजे तिच्या विश्वकनवाळूपणाचा वेगळा आविष्कार. त्यांना बुद्धाच्या सुंदर मौनातले बोलके भाव दिसतात. कला नाजूक नखरेल असल्यामुळे माणसाचे मन बनवते. त्यामुळेच ती सनातन सत्यांचा आविष्कार करते.

अरविंदांना भारतीय परंपरेचे ऋषी किंवा द्रष्टे म्हणणे अधिक सयुक्तिक वाटते. त्यांनी दोनही संस्कृत्या जवळून पाहिल्या, अभ्यासिल्या पण तरीही दोन्हींतील विरोध वा विसंगती यांच्या वादात न पडता पूर्व व पश्चिम, जड आणि चैतन्य, विज्ञान आणि वेदान्त यांचा समन्वय घडवून आणला. त्यामुळेच त्याला एक वास्तवता, भरीवपणा, तीव्रता इ. गुण प्राप्त झाले आहेत. त्यांना व्यक्तीचा मोक्ष आकर्षक वाटत नाही. मानवी जीवनाचेच नव्हे तर ज्या घटकांचा तो बनला आहे त्या जड घटकांचेसुद्धा दैवीकरण करणे आहे. मानसिक प्राणमय आणि भौतिक अशा सर्वांचे रूपांतर सूक्ष्म, सुंदर व शिव पदार्थांत जर घडवून आणता आले तर मानवप्राण्याचे अवघे जीवन अशा काही उच्च अवस्थेप्रत जाईल की तेथ शुद्ध ज्ञान, अविच्छिन्न सुसंगती व दिव्यानंद यांचा संगम असेल.

मग हेच भारतीय संस्कृतीचे साध्य नव्हे काय ? ●

# कविता

। लता भिसे. द्विवसा ।



॥ १ ॥

विझू लागलेत जीवनाचे डोळे...
आता सरणावर ठेवलीच पाहिजेत
साकळलेली वस्त्रं !
कोंडलेल्या राजरस्त्यानं आकाश येऊ पहातंय !
तुझ्या दिठीची मिठी अनावर होतेय रे !
ओठावरच्या तुळशीपत्रात साठवू का हुंदके ?
ज्वालेच्या वाऱ्यानं दूर उडून जाऊ देत
तुळशीपत्रं दबलेली...अर्धीमुर्धी जळलेली
कण कण विरू देत त्यातला तप्त नी दग्ध
तेवढेच गंधित श्वास आलिंगतील ना तुला
तुझ्या नकळत...
माझ्या कळत...

॥ २ ॥

कित्येक रात्रीच्या डोळयांनी
झोपेतच निरखले
गर्भात अंधार घेऊन जळणारे
लामणदिवे...
सोसाटयाचा वारा आला नी गेला ही...
पण नकोय रे सुसाट...पिसाट...अफाट...बेफाट
कारण माझीच राख होऊ लागलीय...
तुझी फक्त अर्धीच फुंकर पुरेशी आहे
जळणारे, एकाच डोळयाने रडणारे
लामणदिवे विझवायला
आणि
पेटता अंगार घडवायला...

॥ ३ ॥

कितीतरी वाटा तुडवीत आज अशी धावत आलेय
कितीतरी नभे चुरगळीत आज अशी मोकाट झालेय.
दुःखाचा आलेख काढताना वेडयावाकडया झाल्यात रे
रेषा
आणि भिजल्या मातीत पावलांचा फिसकटलेला ठसा.
साऱ्या घनतम रातींना मी ओरडून बोलावले
आणि स्मशानातल्या विस्तवाने वाळवंटी चार दिवे लावले.
त्या रात्रींनी कुजबुजताना मीच ऐकलंय...माझ्या
कानांनी...माझ्या देखत
" वाळवंटातल्या मृगजळासारखे ते चार इवलुसे दिवेसुद्धा
फसवे आहेत."

॥ ४ ॥

पायऱ्या चढून दार ठोठावण्यापूर्वी
तू दातात दाबलेलं तुझं बोट
बुटाखालची सिगरेट
आणि केसावरून फिरवलेला बेफिकीर हात
मी केव्हाच पाहिला होता (तू तुझ्या घरून निघण्यापूर्वी)
क्षणांच्या सैरभैर वाटा पळत
तू कसा आलास कोणास ठाऊक ?
पण तुझी थाप पडण्यापूर्वी
माझ्या हातातल्या वादळी पिसाटानं दार उघडलं
आणि मग वरच्या घरट्यातली चिमणी गाऊ लागली
" चिमणी, चिमणी सुखी रमणी. "

## पाखरं

। भारती गोडबोले. प्रवसा ।

॥ १ ॥

दोन खुळी पाखरं भिरभिरत असतात
कुणी येणार नसतं. तरी आतुरतेनं वाट पाहतात.
त्यांची आर्तलेली चोच, व्याकुळलेली नजर
आणखी पुष्कळ काही...सांगता न येण्यासारखं
उजळलेलं विश्व काजळू लागतं
गळ्यात दाटलेली ती मुकी हाक
पंख मिटून घरट्यात परतलेली पाखरं
अजूनही निरखत असतात
ती चिमुकली निर्जीव वाट

॥ २ ॥

आकाश मानलं तुला
रुपेरी मेघांच्या कडा
कधी दिसल्याच नाहीत
इवल्याशा पंखांनी पोकळीपर्यंत
पोहोचता येणार नाही
हे ध्यानी कधी आलंच नाही
ईश्वर मानलं तुला
उभारलेल्या पूजेचा स्वीकार
कधी झालाच नाही.
कुब्जा होऊ पाहताना
रुक्मिणीचं अस्तित्व
कधी जाणवलंच नाही
सागर मानते तुला
दूरवरून, तुझ्या नकळत...
सागर-सरितेची
दृष्ट काढता येईल मला !
कधी अशुभ दर्शन झालंच
तर या सिकतेला
क्षमा कर – क्षमा कर.

। कु. वासंती पटवर्धन. प्रवसा ।

॥ १ ॥

बिचारं दुःख एकटंच फिरत होतं
स्वतःभोवती,
तेव्हा खूप खूप सुखी होतं रे... ।
पण भेटलं वाटेत सुखाला
झेप घेतली वेड्यानं
अनिवार ओढीनं
आणि......
गरगरतंय सुखाच्या कक्षेत
जन्माचंच दुःखी होऊन !

॥ २ ॥

प्रत्येकच क्षणात काहीतरी शोधायचं नसतं
कशासाठी तरी जगलं पाहिजे,
कबूल...
पण प्रत्येक क्षण त्याच्यासाठी वेचलाच पाहिजे ?
एखादा तरी असा जाऊ दे ना,
ओघळलेल्या दवाच्या थेंबासारखा;
ज्याला काहीच किंमत नसते,
पण जो स्वतः स्वतःचाच असतो.

## हक्क

। रेखा पटवर्धन. तृवंशा ।

निळ्या आभाळाच्या इवल्याशा तुकड्याची
पदर पसरून मी भीक मागावी
अशी वेळ माझ्यावर का यावी ?
न मागताच मिळाले होते सर्वस्व
अथांग आभाळाचे निळे दान
पण स्वीकारण्याचेच तेव्हा उरले नव्हते भान
नको होते तेव्हा आकाशाचे लेणे
द्यायचेच नव्हते उरले काही नक्षत्रांचे देणे
पण आता उरले फक्त दीन अश्रू ढाळणे
सारें मिळूनही मी घेतले नाही
आता तर मागण्याचा हक्कही उरला नाही !

## ॥ १ ॥

। कीर्ती साठे. तृवंशा ।

तसे ते वेगळेच.
कोणी रक्तानं लिहितात,
कोणी भावनांनी,
ते मात्र खणखणीत वाजणाऱ्या
व्यवहारी शब्दांचे निर्माते.
कोणी डोळ्यांनी बोलतात,
कोणी स्पर्शानं गातात,
विकारांच्या काठांवरून चालणारे
ते जितेंद्रिय व्याख्याते –
त्यांना समाज म्हणतात.

या क्षणी
त्यात तू नाहीस, मीही नाही.
फक्त आपल्या उगारलेल्या मुठी
काही वर्षांपूर्वी
ते आपल्यापैकीच एक होते,
काही वर्षांनंतर
आपण त्यांच्यापैकीच होणार आहोत.
म्हणूनच
काळाच्या या सरकत्या पुलावर
उगं अट्टाहासानं विरोध खणू नकोस.
कारण, मनात नसलं तरी
सरकायचंच आहे,
तुला, मला, त्यांना, त्यांनाही –

## ॥ २ ॥

माझ्या चंदनी वाड्यात
सूर्य गेला सुनासुना
पायघड्या सोनसळी
वाडा वाड्यात पाहुणा

माझ्या चंदनी वाड्यात
सांज जिवाची झालेली
साऱ्या ज्योती मंदावल्या
कशी काजळी दाटली

माझ्या चंदनी दारांची
नाही सय कोणा आली
राजा थिट्या पायऱ्यांची
का रे पूजा अव्हेरिली

तुझ्या दूर मुलुखात
मोठा प्रासाद बांधिला
माझी पायरी केलीसा,
राजा प्रसाद सांडिला –

## लोचनांचे मीन

। सतीश इनामदार. प्रवसा ।

उनाडले उनाडले
खुळे लोचनांचे मीन
दावतात वेडावण
निळ्या नेत्रजळातून
हिंडतात चोहीकडे
आवेगात बेहोशीत
मात्र रात्री स्वप्नामध्ये
येती तुझ्याच कुशीत !

|| १ ||

। मंजिरी पित्रे. पपूसा।

आज सूर सूख गए
राह तेरी देखते देखते......
सोचा था जीवनभर
गाती रहूँगी तेरा गान,
बन के मदहोष मीरा
नाचती रहूँगी तेरे ही द्वार,
तूने तो दिया मौन का दान
जिससे आज
मैं भी हो गयी हूँ मुझसे अन्जान ।
ऐसेमें क्या तुझे बुलाऊँ
या मुझको जगाऊँ
कैसे नाचूँ ? कैसे गाऊँ ?
कैसे गाऊँ ? कैसे नाचूँ ?
कैसे ?......कैसे ?

|| २ ||

उस आत्मा को कैसे सम्हालूँ
जिसे न अबतक जाना है......
पहचाना है ।
मैं कौन हूँ ?
हूँ एक शापित शरीर ।
जो अपने को
मानता है विवेकशाली मानव !
.........................
मैं अन्धी आँखों से देखती हूँ ।
लूले कदमों से चलती हूँ ।
चली जा रही हूँ...उस पथ से
चला जहाँ से
एक धर्मराज पांडव ! !


|| १ ||

। चंदा मंत्री. प्रवसा ।


मृत्यु !
तुमही मेरे खेवय्या हो !
कारण......
कहीं खेवय्या है तो
नैय्या नहीं !
कहीं नैय्या, तो
खेवय्या नहीं !
मृत्यु !
तुम ही मेरे प्रियतम हो !
कारण......
जो 'प्रियतम' हैं
वे मेरे नहीं ।
जो मेरे हैं
वे प्रियतम नहीं !

|| २ ||

शान्ती को
लोग खोज रहे हैं
मंदिर-मस्जिद, गिरजे, इबादत गाहों में
पर्वत-नदियाँ, सागर और झरनों में
लेकिन......
शान्ति भी वहाँ क्या रहे
जहाँ उनके चाहनेवाले ही
आपस में उलझ रहे !
रहना पसन्द करती ह अब
स्वयंही वह एकान्त में
इसीलिए......
जा छिपी है शायद श्मशान में !




सुमती जेजुरीकर
आंतरविद्यापीठ
बास्केट बॉल



सुनंदा तेलंग
आंतरविद्यापीठ
व्हॉलिबॉल



सरोज परांजपे
पुणे विद्यापीठ
व्हॉलिबॉल



रविप्रकाश गुर्जर
पुणे विद्यापीठ व महाराष्ट्र
राज्य व्हॉलिबॉल संघनायक



नीला जोशी
आंतरविद्यापीठ व
राष्ट्रीय खो-खो स्पर्धेत
प्रतिनिधित्व



अरुणा जोशी
आंतरविद्यापीठ
पोहणे स्पर्धा
तिसरा क्रमांक



रंजना सोमण
आंतरमहाविद्यालयीन
जलतरणस्पर्धेत
संघनायिका




मेधा जोगळेकर
भारत-सिलोन
जलतरणस्पर्धेत भाग



साधना धारिया
आंतरविद्यापीठ व
राष्ट्रीय कबड्डी
सामन्यात निवड




शालिनी आफळे
आंतरविद्यापीठ
कबड्डी सामन्यात निवड



मंजिरी कुलकर्णी
आंतरविद्यापीठ
कबड्डी सामन्यात निवड



सुप्रभा सावंत
आंतरविद्यापीठ कबड्डी
सामन्यात संघनायिका



योगेनकुमार अशर
राष्ट्रीय सॉफ्टबॉल
सामन्यात निवड




अरुणा दीक्षित
आंतरविद्यापीठ बॉल-
बॅडमिंटनस्पर्धेत निवड



अलका नातू
आंतरविद्यापीठ
बॅडमिंटन



शैला खिवसरा
आंतरविद्यापीठ
बॉलबॅडमिंटन




रमा शर्मा
राष्ट्रीय सॉफ्टबॉल-
सामन्यात निवड




कल्पना परोपकारी
राष्ट्रीय सॉफ्टबॉल-
सामन्यासाठी निवड




सुलभा गोडबोले
सॉफ्टबॉल राष्ट्रीय
सामन्यासाठी निवड




अनिल गोडबोले
राष्ट्रीय सॉफ्टबॉल
सामन्यात प्रतिनिधित्व




राजू भालेकर
पुणे विद्यापीठ क्रिकेट संघाचे
संघनायक, रणजी ट्रॉफी
स्पर्धेत प्रतिनिधित्व







विश्वास देशमुख
विद्यापीठ-पश्चिम विभाग
क्रिकेट



हेमंत तळवलकर
आंतरविद्यापीठ क्रिकेट
सामन्यात प्रतिनिधित्व



रमेश बोर्डे
आंतरमहाविद्यालयीन
क्रिकेट सामन्यात
प्रतिनिधित्व








हेरंब अनगळ
हिमालयातील फ्रेंडशिप
शिखर पादाक्रांत

नरेंद्र कुलकर्णी
पुणे ते कन्याकुमारी
सायकल प्रवास

अशोक भोई
आंतरविद्यापीठ
मुष्टियुद्ध दुसरा क्रमांक



गोपाळ म्हस्के
पुणे विभागीय संघाचे
संघनायक







श्यामला इनामदार
प्रदीप चिकटे
अनिल रांजेकर
अनंत लांजेकर

[दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांसाठी चालविलेल्या मोफत भोजनगृहाची व्यवस्था पाहणारे विद्यार्थी]



पीटर परमार
आंतरविद्यापीठ
क्रिकेटसामन्यात निवड

नीलिमा रांजेकर
ज्योति जगताप
दिल्ली येथील प्रजासत्ताक दिन संचलनासाठी निवड

प्रकाश इंदलकर
सर्वोत्तम अंडर ऑफिसर










रंजना सावला
आंतरविद्यापीठ हॉकी

संजीवनी कापशीकर
आंतरविद्यापीठ हॉकी

शुभांगी कोद्रे
आंतरविद्यापीठ हॉकी

नीलिमा खासनीस
आंतरविद्यापीठ हॉकी









आशा नगरकर
राष्ट्रीय खो-खोसाठी
निवड

लीना गोसावी
आंतरविद्यापीठ
खो-खो स्पर्धेत
प्रतिनिधित्व

आशा कुलकर्णी
आंतरविद्यापीठ
खो-खो स्पर्धेत
प्रतिनिधित्व

शोभा देसाई
आंतरविद्यापीठ व
राष्ट्रीय खो-खो स्पर्धेत
प्रतिनिधित्व



जिमखाना– आंतरमहाविद्यालयीन नैपुण्य व आंतरविद्यापीठ राष्ट्रीय सामन्यांसाठी निवड १९७२–७३




जिमखाना– शारीरिक शिक्षण विभाग गट-प्रमुख १९७२–७३




जिमखाना– आंतरमहाविद्यालयीन जलतरण विजेता संघ (मुली) १९७२–७३




जिमखाना– आंतरमहाविद्यालयीन सॉफ्टबॉल विजेता संघ १९७२–७३




जिमखाना– आंतरमहाविद्यालयीन क्रिकेट विजेता संघ १९७२–७३




जिमखाना– आंतरमहाविद्यालयीन कबड्डी विजेता संघ (विद्यार्थिनी) १९७२–७३



अभिरूप लोकसभा




३६ महाराष्ट्र बटालियन एन्. सी. सी. १९७२–७३.




जिमखाना पारितोषिक वितरण समारंभ



मेजर रं. ना. गायधनी
एन्. सी. सी.तून सेवानिवृत्त




प्रकाश कुऱ्हाडे ‘परशुरामीय श्री’



विठ्ठल चाबूकस्वार
दिवाणबहादुर गोडबोले
शिष्यवृत्ती

जनरल जी. सी. बेवूर यांचे महाविद्यालयातर्फे अभिनंदन





वासंती पटवर्धन
परशुरामीय वक्ती

# Young Friends,

You are living in turbulent times. We, too, in our young days, have had our share of turbulent times. But it was turbulence of a different kind. Words like non-co-operation, civil disobedience, satyagraha, were in the air. Mahatma Gandhi was the Pied Piper, at whose call thousands came out of their homes and schools and courts and hospitals to the prison-houses and the hanging-ropes. The whole country was astir. It was the labour of a new birth—the birth of India's Independence. Those were the days of great ideas, great ideals and great men. Gandhiji's war-cry " Quit India " sent a thrill through the students. They came, they fought, they fell. But they have left behind a glory which time will never dim.

As I turn from these memories of my days of college to what is passing in and around and about us now, I pause and think. My mind misgives. I look in vain for anything that reminds me of those great times.

You, too, are living in turbulent times. Boycott, Gherao, Strikes are the order of the day. But the turbulence is of a different nature. Persons and places have lost their respect. There is some virus in the air. Strange echoes of foot-steps sometimes assail our ears.

You have to be awake and aware. I have infinite faith in the new generation of boys and girls. But I feel deep down, you have to stand up and face the challenges of the coming times. It may not all be smooth sailing. But it is adventure which will try your mettle. But for this, you will have to stand apart, alone by yourself and think intensely, think quietly : " Whither am I to go ? What is the road to be taken ? What is the road *not* to be taken ? " May-be in this deep meditation, in this intense talking to yourself, a gleam and a light will shine. It will be a gleam that shall light your way.

Perhaps you do not like what I say. That does not matter. Perhaps what I say is not right. That, too, does not matter. But my faith in you, and my hopes about you make me repeat again and again, " Believe in yourself; believe in your own inner worth. " And once every day, spare a couple of minutes to retire into a quiet corner to look inside your heart. There will you find a light, burning steady and clear. Let that light lead you. However hard the road, you will not go wrong.

Yours forever,

K. P. Mangalvedhekar

## SORROW AND HOPE

Soudamini A. Doshi
T.Y. B.A.

*Heavy the sarrow that bows its head*
*When love is alive and hope is dead;*
*Heavy's the grief of a sorrowful heart,*
*Where love does tread, but hopes depart.*

*Sweet sorrow, kind sorrow,*
*Can I bid you good morrow ?*
*How can I leave you far behind,*
*You are my only hope, a friend very kind.*
*You shelter me from the tempest of hope,*
*Where love is alive, but life has no scope.*

*Oh Sorrow, my friend dearest !*
*The kindest and the best;*
*Teach me to live without zeal and zest,*
*Man was made to mourn and you*
*Are the test for the unhappy to endure*
*If you don't jest.*


*Dear sorrow, my very part !*
*How can I from thy kingdom depart ?*
*When hopes' a dupe and love a dream;*
*And fancy a cheat, a flowing stream,*
*Where emotions lie buried deep,*
*Waiting for an eternal sleep.*

## TO BLOSSOMS

R. M. Ainapure
T. Y. B.SC.

*O lovely, beautiful blossoms !*
*Why don't you stay for a season ?*
*It is just your youth's prime*
*Is 'to give joy' a crime ?*

*Your sweet aroma will refresh us,*
*Your bewitching sight will delight us*
*Your short life will remind us*
*For ever of the diamond-dew glories*



# America, The Beautiful

Prof. P. R. Karmarkar

I had an occasion to visit the United States and Canada along with my wife last summer. We were fortunate to be there at the beginning of the summer which is considered as the best season climatewise. Till we came back to India we travelled over 27000 miles ,mostly by air and only about 2000 miles by car or bus.

The jumbo-jet by which we travelled to the United States and back was a marvel in itself. What struck me most was the efficient service of the air-hostesses while catering to the needs of passengers of different nationalities. Apart from the food and other basic amenities, the jumbo travel has become the most enjoyable and absorbing with the advent of movies being shown in the aircraft, the pointing out of the various landmarks by the flight commander as we were cruising at an altitude of 30,000 feet and over. The picturesque airports at London, Paris and Rome afforded a good opportunity to meet people of various nationalities and they were quite friendly. The Beirut airport had stiff security precautions in view of the Arab-Israel conflict.

We visited New York, Las Vegas - the gambling city of the world, Los Angeles, Disneyland and San Francisco on the West Coast as well as the Grand Canyon in Arizona, Detroit, Washington and Cleveland in the United States. There is so much diversity in scenery, environment and people in different parts of the U. S. A. that I was reminded of our own country. The fantastic Disneyland covering an area of 110 acres is a storehouse of fun and scientific achievements of the United states. In sumner on a Sunday more than 90,000 people visit Disneyland. The sub-marine ride, the jungle cruise and the Mark Twain boat rides are the most popular, attractions. Las Vegas, the gambling city of the world thrives on tourist industry, and people visit it during week-ends to do a spot of gambling. Various gambling games are provided in the Hotel lobbies and on week-ends the lobbies are full with habitual gamblers and first-timers like us. Los Angeles on the west coast has a charm of its own. The Hollywood atmosphere is just seen to be believed. However, the city itself is a virtual mad-house with fantastic buildings, efficient high-way systems and people, people every-where. San Francisco on the other hand is quiet and the most beautiful in the whole of the United States according to me. Washington, the Capital, is almost like New Delhi with huge parks, monuments, government buildings etc. A part of the White House, the official residence of the President, is shown to the visitors every day. The Washington monument, the National Archives, the National Art Gallery, the

Natural History Museum and the Lincoln memorial are the favourite spots of the tourists. The Grand Canyon, a one-mile-deep valley carved by the Colorado river in the State of Arizona is picturesque and somewhat resembles Mahabaleshwar. The bus ride to Grand Canyon allows us a view of the Hoover dam, the largest in United States. New York Metropolitan city has a population of over one and half crores and has the best and the worst localities. The Fifth Avenue with its skycrapers and the Harlem ghetto district of the Negroes show the contrasts. The Empire State Building over 1000 ft. high, the Statue of Liberty and the New York harbour are the star attractions. New York is known as the skyscraper jungle with its lofty buildings crammed together. The Ford Motors factory in Detroit gives us an idea of the achievements of the American automobile industry. The assembly line rolls out one car every sixty-five seconds. Every day 880 cars are manufactured at the Dearborn plant, ready for sale. Cleveland, with a 55% Negro population where we stayed for most part of our time, is a comparatively quiet city with its steel mills and other industries. Situated on the Lake Erie it handles the iron ore coming from the Mesabi Range mountains. the Lake Erie is so much polluted now that fishing is practically impossible there. Pittsburg located on the Ohio river is the centre of the iron and steel industry of the United States.

We also visited the famous Niagara Falls and Toronto city in Canada. The Niagara river is the boundary between the United States and Canada. There are two falls, one on the American Side and the other on the Canadian side. The Niagara Falls proper is in Canada. The Falls are beautified in the night by throwing upon them multi-coloured searchlights. Toronto is a typical city in Canada.The British influence is evident here. On the way to Toronto apple-gardens can be observed which remind us of the grape-vines in India.

The memories of the parks of Washington and the national monuments, the breath-taking panorama of Grand Canyon, the fishermen's wharf and the cablecars of SanFrancisco, the fun and fare at Disneyland, the highways and freeways as well as the Beverley hills, the fashionable houses of Los Angeles, the New York skyscrapers and many other things go a long way in acknowledging America as Beautiful.

# We Are In The 'COSIP'

We are one of the few eminent Colleges selected by the University Grants Commission in the College Science Improvement Programme (COSIP). The purpose of this scheme is to improve the standard of Science teaching at the under-graduate level in Colleges. It is envisaged that this programme will be used to improve the general scientific background of the majority of the students and also encourage more gifted students to develop their talents. The University Grants Commission is going to finance this programme for a period of three years. Our College will receive a total grant of Rs. 3,00,000/— during this period. The Science departments have formulated a number of schemes for implementing the COSIP. These Schemes have been approved by the U. G. C. The salient features of these Schemes have been outlined below :

**Mathematics and Statistics :**

(i) The students will be encouraged to prepare charts and models which will help them to aquire better understanding of the subject.

(ii) They will be provided with instructional material in the form of challenging problems and notes, from standard reference works.

(iii) Students studying Statistics will be given opportunities to conduct model surveys under the guidance of teachers.

**Physics :**

(i) Students will be encouraged to study advanced topics in Classical Mechanics, Solid state Physics, Physical Statistics and Electronics.

(ii) Students will be encouraged to work on optical bench, G. M. Counter, Cathode Ray Oscillograph etc.

(iii) Eminent physicists will be invited to deliver lectures to the students.

(iv) Scientific films will be screened periodically.

(v) Students will be encouraged to participate in seminars and group discussions.

**Chemistry :**

Chemistry Department has formulated special courses in Analytical Chemistry, Industrial Chemistry, Biochemical Methods, Theoretical Chemistry, and a course in relation to specific industries. It is hoped that these courses will equip our students better for jobs in research and industries. These courses will also give them adequate orientation in pursuing higher studies. In addition to the special courses, a number of small projects will be worked out by students which will initiate them into research methodology.

**Biology :**

In a special programme framed for gifted students, students will, work out projects in Floristics, Cytology, Mycology, work Embryology etc. The students will be encouraged to pursue hobbies connected with biological sciences, such as collection and preservation of plants and animals. They will be provided with ample instructional material in the form of models, charts, slides etc. A very extensive use of audio-visual equipment will be made in teaching.

**Geography :**


The Geography Department has selected a project on " Ground Water Resources in Poona Metropolitan Region " under this project following aspects will be covered :

a ) Occurence of ground water,
b ) Movement of ground water,
c ) Climate and ground water rechange,
d ) Cyclic Ground water,
e ) Pollution,
f ) Management of Ground Water.

**Hobby Wok-shop :**

We have decided to set up a common Hobby Work-shop for the use of all Science Departments. The workshop facilities will be used for fabricating scientific equipment, model making etc.

Our Science Departments will be intensely active in implementing this programme for a period of three years to come. A modest beginning has already been made in this direction. We are sure that this programme will go a long way in our aim to nurture the science talent in the student world. Our students are extremely fortunate in getttng a very unique opportunity of participating in an inspiring academic activity. We hope that enthusiastic science students of College will exploit this opportunity to the fullest.



# Two Novels on India

Abhay Mangalvedhekar
**S. Y. B. A.**


Although ' A Passage to India ' and ' Kim ' are the novels written on Indian life, the approach of the two novelists is quite different. ' A Passage to India ' raises a question as to whether friendship between the rulers and the ruled is possible. We see that the friendship of Aziz and Fielding is deep but not lasting. There are forces that pull them apart. Aziz suspects that there is some purpose of Fielding in persuading him not to claim the compensation for defamation from Adela. The arrogance of Ronny is also noticed in his behaviour with the natives. When the ' car incident ' happens, Aziz comes to believe that he invited disaster because ' he had challenged the spirit of the Indian earth, which tries to keep men in compartments. ' Aziz thinks that one day India will be free. But Fielding mocks at Aziz's claim and Aziz himself knows in his heart that the gulf between the Hindus and the Muslims is wide. One of the subtlest achievements of the novel is the author's success in conveying to the reader a sense of unbridgeable gulf between him and Prof. Godbole. Although both are educated Indians, their norms, values and traditions are far apart. A critic points out that Prof. Godbole is an enigma. A heavy veil hangs between the Brahmin's personality and its expression. Aziz, on being met at the station at Chandrapore by the Police Inspector impulsively tries to run away and then breaks down in despair. Prof Godbole fails to understand the situation.

If we compare the songs sung by Prof. Godbole and Dr. Aziz in his bedroom we see the difference between those characters. Godbole's song lacks the tenderness and pathos of Aziz's. Shrikrishna is invoked but does not come.

When we turn to ' Kim ' we see that Kipling is not interested in characterization but in atmosphere. He has the inventive faculty, a romantic taste for adventurous and the supernatural, and an apparently careless, very colloquial style, which ensured for his work a popular reception. One of his critics, Hughes, says, ' He knew India as well perhaps as an alien can know it. ' Kipling spent many of his years in India and therefore he is at his best in representing the native colour and atmosphere of India in ' Kim '. He reveals it in the sights and sounds and even smells. Although in ' Kim ' he is interested in presenting the conflict between cultures of the East and the West, Kipling never asserts that Western values are superior to Eastern values. The oriental people, Mahbub Ali and the Babu can outwit practically any sahib in India. The natives speak in colourful, proverb-strewn language far more

flexible and attractive than the stiff correct English at St. Xavier's. So 'Kim' is the combination of the East and the West. The character of Lama is typically oriental. The Lama's saintliness, his obssession with the Buddhist world and its symbolism is depicted with sympathy and irony. His quest for the River of Healing is lit from time to time by the humour of Mahbub Ali and the Sahiba; whose motherly concern for the Lama and Kim, brings the story back to the earth. She is a parable of the body as the Lama is that of Spirit. There are also figures who stand for the religion of East. Mahbub Ali is the Muslim with his reflex, " God's curse on all unbelievers. " Above all there is the Hurre babu, the vast bulk of a man with his socks and patent leather shoes; tough, resourceful; everything that the Bengali babu traditionally is not. One critic has suggested that he stands for the East in transition.

There are superb descriptions of the Himalayas, in which Kipling's emotions seem wholly involved. Kim's own mind is a change from boyhood to responsibility. This transition is portrayed with sympathy and insight.



# महाविद्यालयातील काही ठळक घटना

**१. शि. प्र. मंडळीचे नियामक मंडळ व स. प. महाविद्यालयाचा प्राध्यापकवर्ग यांचा परस्परपरिचय**

शिक्षण प्रसारक मंडळीच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष माननीय मोहनराव गवंडी व इतर सन्माननीय सदस्यांचा आणि महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांचा परस्पर-परिचय करून देण्याचा कार्यक्रम रविवार दि. १५ ऑक्टोबर १९७२ ला आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी मा. प्राचार्य के. पं. मंगळवेढेकर यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले आणि परस्परांचा परिचय करून दिला. यानंतर मा. मोहनराव गवंडी यांनी आपल्या भाषणात स. प. महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा घेऊन प्राचार्य, प्राध्यापक, सेवक यांच्या कार्यांचा गौरव केला.

**२. पुणे विद्यापीठाचे कुलगुरू माननीय रँग्लर ग. स. महाजनी यांची महाविद्यालयास भेट व प्राध्यापक सभेत "Some Educational Reforms Without Tears" या विषयावर भाषण.**

१४ डिसेंबर १९७२ ला मा. कुलगुरूंनी आपल्या महाविद्यालयाला भेट दिली. प्राध्यापक सभेत मा. प्राचार्य के. पं. मंगळवेढेकर यांनी कुलगुरूंच्या यशस्वी जीवनाचा धावता आढावा घेतला आणि कुलगुरू म्हणून त्यांच्या यशस्वी कारकीर्दीचा गौरवपूर्ण भाषेत उल्लेख केला.

उपकुलगुरूंनी आपल्या भाषणात प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणाची चिकित्सा केली. शिक्षणाचा विकास प्राय: शिक्षण आणि विद्यार्थी यांच्या सहकार्यावर श्रमावर अवलंबून असतो याबद्दल विवेचन करून विद्यार्थी जीवनातील शिस्त निर्माण करताना वर्गातील कमीतकमी विद्यार्थीसंख्या, जबाबदारीची जाणीव, नियमितपणा, गृहपाठलेखन, चारित्र्य व नीतिमत्ता यांची महती, ज्ञानलालसा इत्यादी मूलभूत प्रश्नांचा सांगोपांग विचार मांडला.

परीक्षापद्धतीत आमूलाग्र बदल करण्याची आवश्यकता प्रतिपादन करून त्यांनी निरनिराळ्या शैक्षणिक समित्यांचे याबद्दलचे अहवाल कोणते मार्ग सुचवितात याची माहिती दिली.

शिक्षकांची कर्तव्ये, विद्यार्थीनेतृत्व, शैक्षणिक जीवनातील असंतोष याही प्रश्नांचा उल्लेख त्यांनी आपल्या भाषणात केला. उच्च शिक्षणातील भाषेचा, माध्यमाचा प्रश्न वेगवेगळ्या पद्धतींनी कशा सोडविता येईल याची सोदाहरण चर्चा केली.

शेवटी त्यांनी विद्यार्थ्यांना द्यावयाचे सामाजिक सेवेचे शिक्षण व त्याचे महत्त्व यांवर आपले विचार व्यक्त केले. आभारप्रदर्शन प्रा. डॉ. लीला गोळे यांनी केले.

**३. प्रजासत्ताक दिन**

सकाळी ७-३० ला महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर मा. प्राचार्य के. पं. मंगळवेढेकर यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. त्यानंतर N. C. C. तील विद्यार्थ्यांना प्राविण्य संपादन केल्याबद्दल त्यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली.

त्यानंतरच्या आपल्या भाषणात प्राचार्यांनी भारतीय

लोकशाहीच्या प्रगतीचा गौरव केला. गल्या काही वर्षांतील ठळक घटनांचा आढावा घेऊन त्यांनी विद्यार्थ्यांना सामाजिक सेवेचे, राष्ट्रनिष्ठेचे आवाहन केले.

## राष्ट्रीय सेवा योजना

प्रमुख : प्रा. वि. रा. शिरगुरकर
विद्यार्थीप्रमुख : श्री. प्रदीप चिकटे
श्री. श्याम लांजेकर
श्री. अनिल रांजेकर
श्री. हेरंब अनगळ
कु. श्यामला इनामदार
कु. मंगला नारकर

**ससून हॉस्पिटल सफाई** : राष्ट्रीय सेवा योजनेच्या दुसऱ्या सत्रातील कार्याची सुरुवात २ ऑक्टोबर १९७२ या दिवशी झाली. गांधी जयंतीच्या निमित्ताने मा. महापौरांनी शहरातून स्वच्छता मोहीम हाती घेऊन या कामी सहकार्य करण्याचे आवाहन सर्व शैक्षणिक संस्थांना केले होते. राष्ट्रीय सेवा योजनेतील एका पथकाने श्री. श्याम लांजेकर यांच्या नेतृत्वाखाली ससून हॉस्पिटलमध्ये सफाईचे काम करून या आवाहनास प्रतिसाद दिला.

**महाविद्यालय-आवार सफाई** : दि. २४–९–७२ ला योजनेतील ५० विद्यार्थ्यांनी लेडी रमाबाई हॉलच्या परिसरातील आवार साफ केले.

**रिमांड होममधील कार्य** : डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यांत योजनेमधील ५० विद्यार्थ्यांच्या एका पथकाने मुलांच्या रिमांड होम-परिसरातील सर्व इमारतींना रंग देण्याचे कार्य पुण्यातील इतर महाविद्यालयांच्या सहकार्याने पूर्ण केले. या कामी प्रा. जुमडे यांनी मुलांना संघटित करण्याची सर्व जबाबदारी उचलली होती.

**दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांसाठी भोजनालय** : स. प. महाविद्यालयातील दुष्काळग्रस्त प्रदेशातून येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या भोजनाची व्यवस्था विनामूल्य करण्याचा निर्णय प्राचार्यांनी घेतला. हे भोजनगृह चालविण्याची सर्व जबाबदारी राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांनी १–१२–७२ पासून उचलली. हे भोजनगृह विद्यार्थ्यांच्या परीक्षा संपेपर्यंत चालविण्यात येणार आहे. या कामी योजनेतील सर्व विद्यार्थी भाग घेतात.

**शालेय प्रकल्प** : महमदवाडी येथील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी, त्यांचे खेळ घेण्यासाठी, समूहगीते बसवून घेण्यासाठी, योजनेतील विद्यार्थ्यांचे गट दुसऱ्या सत्रातील प्रत्येक आठवड्यातून दोन दिवस सातत्याने जात होते.

**रक्तदान** : दि. २६–९–१९७२ व दि. १२–१२–७२ या दिवशी रेडक्रॉस संघटनेतर्फे योजनेतील विद्यार्थ्यांनी रक्तदान मोहीम हाती घेतली. या योजनेस महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान करून उत्तम प्रतिसाद दिला व सुमारे १०० बाटल्या रक्तदान केले.

**क्रांतिवीर भगतसिंग जयंती** : २८ सप्टेंबर १९७२ ला योजनेतील विद्यार्थ्यांनी क्रांतिवीर भगतसिंगांची जयंती साजरी केली. प्रा. ग. भा. जोशी यांच्या अध्यक्षतेखाली श्री. मुकुंदराव तेलीचरी यांनी भगत सिंगांच्या चरित्रावर आधारित कथाकथन केले.

**हडपसर प्रकल्प–शिबिरे** : हडपसर प्रकल्पातील विविध कार्ये पार पाडण्यासाठी या सत्रात एकूण तीन शिबिरे आयोजित केली होती. दि. २, ३ डिसेंबर १९७२ या दिवशी व दि. १६, १७ डिसेंबर या दिवशी दोन शिबिरे घेण्यात येऊन त्या वेळी महमदवाडी येथील पाझर तलावावरील बंधाऱ्याचे काम हाती घेतले.

तीन दिवसांचे मोठे शिबिर २६, २७, २८ जानेवारी १९७३ या दिवशी घेण्यात आले. शिबिरास दहा विद्यार्थिनी व सत्तर विद्यार्थी उपस्थित होते. या शिबिरात महमदवाडी येथील विहिरीजवळच्या रस्त्याचे काम श्रमदानाने पूर्ण करण्यात आले. चर्चा-सत्रातून पुढील वर्षी योजनेतर्फे हाती घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमपत्रिकेवर सर्व विद्यार्थ्यांनी गटवार चर्चा केली. तसेच संबंधित नऊ खेडेगावांतील सर्व शिक्षकांचा मेळावाही दि. २८–१–७३ ला भरविला होता. या गावांतून राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे जे विद्यार्थी विकास-कार्य व शिक्षण कार्य करीत आहेत, त्यांना या सर्व शिक्षकांचे सहकार्य मिळवून देण्याच्या दृष्टिकोनातून हा मेळावा आयोजित

केला होता. या मेळाव्यास परिषद शिक्षणाधिकारी श्री. सुरेश साळगावकर व भागाधिकारी श्रीमती छल्लारे मार्गदर्शक विवेचन करण्यासाठी उपस्थित होते. या तीन दिवसांच्या श्रम-शिबिराचा समारोप यशवंत सहकारी साखर कारखान्याचे (थेऊर) संचालक आमदार श्री. अण्णासाहेब मगर यांच्या अध्यक्षतेखाली उपप्राचार्य डॉ. दि. ब. केरूर यांच्या उपस्थितीत झाला.

शिबिर संयोजन प्रा. शरद शंकर जोशी यांनी केले. त्या कामी त्यांनी प्रा. जुमडे, प्रा. देवकुळे, प्रा. कोप्पर व गटप्रमुख श्री. प्रदीप चिकटे, श्री श्याम लांजेकर कु. श्यामला इनामदार, श्री. योगेश गोगावले, श्री. हेरंब अनगळ व श्री. गजानन बखले यांचे अमूल्य सहकार्य लाभले.

१९७२–७३ या वर्षातील राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व कार्यक्रम प्राचार्य के. पं मंगळवेढेकर यांच्या प्रोत्साहनामुळे सल्लागार समितीच्या मार्गदर्शनामुळे व कार्यकारी समितीच्या सहकार्यामुळेच यशस्वी होऊ शकले.

## वादसभा

कार्याध्यक्ष : प्रा. द. वि. कुलकर्णी.
उपकार्याध्यक्ष : प्रा. ग. भा. जोशी,
प्रा. सौ. विद्या साठे.
कार्यवाह : श्री. सतीश टोणपी, तृवशा.

दि. १२ सप्टेंबर रोजी झालेल्या 'सिमला करार भारतास हितावह आहे का?' ह्या विषयावर प्राध्यापकांचा परिसंवाद झाला. न्या. रानडे वक्तृत्व स्पर्धेसाठी आपल्या महाविद्यालयातर्फे अंजली करमरकर (पपूसा) व श्रीधर दीक्षित (प्रवसा) ह्यांची निवड झाली. कु. करमरकरने ५ वा क्रमांक मिळवला तर दीक्षितला उत्तेजनार्थ बक्षीस मिळाले आणि न्या. रानडे स्पर्धेत आपले महाविद्यालय उपविजेते ठरले व आपल्याला रौप्यचषक मिळाला.

मुंबई येथे साहित्य संघातर्फे झालेल्या कथाकथन स्पर्धेत आपल्या महाविद्यालयातर्फे सतीश टोणपी व कांचन गोळे यांनी भाग घेतला.

म. फुले वक्तृत्व-स्पर्धेत आपल्या अनेक स्पर्धकांनी भाग घेतला. त्यात वासंती पटवर्धन (प्रवसा) हिला दुसरा क्रमांक, अंजली करमरकर (पपूसा) हिला तिसरा क्रमांक आणि नंदकुमार सेठिया (तृवशा) यास प्रशस्तिपत्रक मिळाले.

ठाणे येथे झालेल्या न. गो. पंडित वक्तृत्व-स्पर्धेत श्रीधर दीक्षितला 'ललित वाङ्मयाकडून माझ्या अपेक्षा' ह्या विषयावर तसेच आयत्या वेळच्या विषयावर उत्तेजनार्थ बक्षीस मिळाले.

'फोरम ऑफ फ्री एंटरप्राईज' यांच्या वतीने झालेल्या-स्पर्धेत 'पाचवी पंचवार्षिक योजना' ह्या विषयावर धनंजय जोगळेकर (द्विवशा) याला उत्तेजनार्थ पारितोषिक व प्रशस्तिपत्रक मिळाले.

पुणे विद्यापीठातर्फे घेण्यात येणाऱ्या जयकर करंडक स्पर्धा यंदा इंग्रजीतून होत्या; त्यात मंजिरी वाटवे (व्यवसायपूर्व शास्त्र) हिने द्वितीय क्रमांक पटकावला. तिला रु. १५।– रोख पारितोषिक व प्रशस्तिपत्रक मिळाले.

आपल्या महाविद्यालयाचे वैशिष्टच असलेली अभिरूप लोकसभा ३१ जानेवारी १९७३ ला आयोजित करण्यात आली. त्यासाठी 'गरिबी हटवण्यात सरकार अयशस्वी झाले आहे' असा विरोधी पक्षातर्फे ठराव मांडण्यात आला. सत्तारूढ पक्षातर्फे अंजली करमरकर, श्रीधर दीक्षित, वाघ (प्रवसा), भट (पपूसा), सेठिया (तृवशा) व सतीश टोणपी (तृवशा) यांनी भाग घेतला तर विरोधी पक्षातर्फे वासंती पटवर्धन, किरण गोखले (प्रवसा), जोगळेकर (द्विवशा), भुनकर (प्रवसा), हिरेमठ (पपूसा) आणि सुरेश भागवत (तृवशा) या वक्त्यांनी भाग घेतला. सभापती म्हणून प्रा. जी. बी. जोशींनी कार्य केले. या समारंभाचे प्रमुख पाहुणे मा. मोहनराव गवंडी होते. या लोकसभेत कु. वासंती पटवर्धन व श्रीधर दीक्षित यांना प्रत्येकी रु. ४० चे पारितोषिक मिळाले. प्राचार्य के. पं. मंगळवेढेकर यांनी कु. अंजली करमरकर व सुरेश भागवत यांना महाविद्यालयातर्फे उत्तेजनार्थ प्रत्येकी रु. २०चे पारितोषिक दिले.

ह्या वर्षी 'जिमखाना समिती' तर्फे सर्व विजयी व उप-

विजयी वक्त्यांना रौप्य व ब्रॉंझ पदके देण्यात आली. वादसभेतर्फे पुढील चौघांना ब्रॉंझ पदके देण्याल आली. श्रीधर दीक्षित; अंजली करमरकर; वासंती पटवर्धन; आणि मंजिरी वाटवे.

**लो. टिळक स्मारक ग्रंथालय**

या मोफत ग्रंथालयाचा सुमारे दीड हजार विद्यार्थ्यांनी फायदा घेतला. विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार यंदा सुमारे दीडशे रुपयांची पुस्तके खरीदण्यात आली. ही सर्व पुस्तके लक्षात घेता ह्या ग्रंथालयात लो. टिळकांच्या आवडीच्या विषयांवरील सुमारे २५०० पुस्तके आहेत.

**ऋणनिर्देश**

मा. प्राचार्य के. पं. मंगळवेढेकर, उपप्राचार्य डॉ. दि. ब. केरूर, प्रा. प्र. र. करमरकर, प्रा. भ. रा. जोशी, प्रा. वि. प्र. देव, प्रा. सौ. कविता नरवणे प्रा. ग. भा. जोशी, प्रा. सोमण, प्रा. आर. एम. गोखले इ. प्राध्यापकांच्या बहुमोल मदतीमुळेच वादसभा यशस्वी वाटचाल करू शकली. त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार ! तसेच विद्याधर चितळे, सतीश पुरंदरे, एम. टी. पाटील शैलजा सरदेसाई व उज्ज्वला कोल्हटकर ह्या विद्यार्थिमित्रांचीही वेळोवेळी वादसभेस बहुमोल मदत होते. त्या सर्वांना मनःपूर्वक धन्यवाद !

## नाट्यमंडळ

नाट्यमंडळाच्या वतीने खालील कार्यक्रमात आपल्या महाविद्यालयाच्या विद्यार्थी कलाकारांनी भाग घेतला.

१. अमेरिकेतील निरनिराळ्या विद्यापीठांच्या डीन्ससाठी मनोरंजनाचा कार्यक्रम. दि. १६ डिसें. १९७२

२. नाट्यगीतस्पर्धा. (नेस वाडिया कॉलेज पुणे)

३. कालिदास संगीत स्पर्धा. (अ. भा. विद्यार्थि-परिषद)

४. नाट्यमंडळाचे कलाकार श्री. मोहन गोखले व चंद्रकांत काळे यांची प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशनतर्फे राज्य नाट्यस्पर्धेसाठी निवड झाली.

द्वितीय सत्रातील कार्यक्रमात, स्पर्धात विशेष कामगिरी करणारे नाट्यमंडळाचे विद्यार्थी-सभासद :

१. रोहिणी कुलकर्णी, २. श्याम महाडिक, ३. अरुण आपटे, ४. चंद्रकांत पोटे, ५. विजय देशपांडे.

## " एस. पी. रिव्ह्यू "

शिक्षक-प्रतिनिधी : प्रा. ल. प्र. दाते.

विद्यार्थी-प्रतिनिधी : श्री. प्रकाश लिमये. (तृवसा)

एस. पी. रिव्ह्यूचे हे नववे वर्ष. विद्यार्थ्यांत ह्या नियतकालिकाची लोकप्रियता वाढलेली आहे. संपादन, सजावट, लेखन, छायाचित्रे ह्या बाबतीत भाग घेणाऱ्यांची संख्या वाढत आहे.

यंदा विशेषांक काढण्याचा मान संस्कृत-प्रेमी विद्यार्थ्यांनी मिळविला. कु. सुलभा साने (द्विवसा) ह्यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली संस्कृतचा खास अंक निघाला. त्यातील हास्यचित्रे हे त्या अंकाचे एक वेगळे आकर्षण मानावे लागेल. एक पूर्ण अंक संस्कृत भाषेत निघतो, ह्या उपक्रमाचे अनुकरण इतर भाषाप्रेमी विद्यार्थ्यांनाही पुढच्या वर्षी करता येईल.

उल्लेखनीय संपादनात कु. शैला सरदेसाई (तृवसा), कु. सुलभा साने (द्विवसा), कु. कल्पना वापट (तृवसा), कु. कांचन गोळे (तृवसा) व श्री. श्रीधर दीक्षित (प्रवसा) यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल.

सजावट-विभागात कु. आशा देशपांडे (पपूसा), कु. जयश्री आठवले (तृवसा), कु. कांचन गोळे (तृवसा), कु. शिरीष पिटके (द्विवसा), कु. नीलिमा दाते (तृवसा) व कु. लता भिसे (द्विवसा) ह्यांतील प्रत्येकाने आपल्या चित्रकला-नैपुण्याचे वेगळेपण दाखवले.

उत्तम हस्ताक्षरासाठी श्री. एच. डी. कोडोलीकर (पपूसा) श्री. सतीश इनामदार (प्रवसा), श्री. मोहन खांबे (प्रवसा) व श्री. माधव परांजपे (प्रवसा) ह्यांचा उल्लेख आवर्जून करावयास हवा.

कु. वासंती पटवर्धन, कु. जयश्री आर; श्री. देवदूत जाधव, श्री. सतीश इनामदार, कु. सुलभा साने, कु. माधुरी भावे, श्री. चंद्रकांत काळे, कु. आशा देशपांडे. कु उषा देशपांडे, कु. जयश्री आठवले व कु. भारती गोडबोले ह्यांच्या काव्यपंक्तींनी अंक सजलेले होते.

" उद्धरेदात्मनात्मानम् " हा श्री माधव परांजपे यांचा लेख भारतीय स्वातंत्र्याच्या रजत महोत्सवाच्या निमित्ताने काढलेल्या अंकात वैशिष्टचपूर्ण ठरला.

यंदाचे एस. पी. रिव्हयूचे वैशिष्टच म्हणजे प्राचार्य व दोन्ही उपप्राचार्य ह्यांनी आम्हा विद्यार्थिवर्गाशी " संपादकीय " द्वारा हितगुज केले.

## वसतिगृह विभाग

### विद्यार्थी वसतिगृह

दि. ४–९–१९७२ ला विद्यार्थिवसतिगृहात तेथील शिपाईसेवकांनी 'श्रीसत्यनारायणाची महापूजा' आयोजित केली होती.

दि. ११–९–१९७२ व दि. १२–९–१९७२ ह्या दिवशी विद्यार्थिवसतिगृहात गणेशोत्सव साजरा करण्यात आला. त्यानिमित्त खेळाच्या स्पर्धा घेण्यात आल्या. विजेत्या संघांना सौ. शांता कावळे ह्यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. दि. १२–९–१९७२ ला रात्री 'शेलापागोटे' कार्यक्रम झाला.

विजयादशमीनिमित्त दि. १७–१०–१९७२ ला वसतिगृह-प्रमुखांच्या हस्ते विद्यार्थिवसतिगृहात सरस्वतीपूजन करण्यात आले.

मकरसंक्रातिनिमित्त दि. १४–१–१९७३ ला विद्यार्थिवसतिगृहात रात्री ९–३० वाजता 'तिळगुळ समारंभ' साजरा करण्यात आला.

दि. ३०–१–७३ ला वसतिगृहातील विद्यार्थिविद्यार्थिनींसमोर श्री. बारोट ह्यांनी कागदाची कलाकुसर याविषयी प्रात्यक्षिक करून दाखवले.

### पाडगावकर स्मृति-दिन

विद्यार्थिनी वसतिगृहात दि. १५–९–१९७२ या दिवशी पाडगावकर स्मृति-दिन साजरा करण्यात आला.

### उपक्रम

दि. ३०–११–१९७२ ला मा. प्राचार्यांनी वसतिगृह विद्यार्थिप्रतिनिधी सभेत केलेल्या आवाहनानुसार दुष्काळग्रस्तांना मदत करण्यासाठी दोन्ही वसतिगृहांतून चांगलाच प्रतिसाद मिळाला.

विद्यार्थिवसतिगृह :– रु. १३६–३०
विद्यार्थिनीवसतिगृह :– रु. १०२–००
इतकी रक्कम महाविद्यालयाच्या दुष्काळ निवारण निधीस देण्यात आली.

### वसतिगृहदिन

शनिवार दि. ३–२–१९७३ व रविवार दि. ४–२–१९७३ ला संयुक्त वसतिगृहदिन अत्यंत साध्या रीतीने साजरा झाला 'गंमत-जंमत' चे उद्घाटन सौ. शांताबाई मालेगावकर यांनी केले. तसेच 'पालवी' या हस्तलिखिताचे प्रकाशन प्राचार्य के. पं. मंगळवेढेकर यांच्या हस्ते झाले.

विद्यापीठ आरोग्य योजनेतर्फे वसतिगृहातील गरजू, अशक्त व लायक अशा ७५ विद्यार्थि-विद्यार्थिनींना प्रोटिन्यूल्स, शार्कोफेरॉल ही शक्तिवर्धक औषधे देण्यात आली. याबद्दल डॉ. एम. के. गोडबोले, सेक्रेटरी, विद्यापीठ आरोग्य योजना, पुणे विद्यापीठ ह्यांचे सहकार्य लाभले.

पुणे विद्यापीठाचे आम्ही आभारी आहोत.

## ग्रंथालय विभाग

ग्रंथालयप्रमुख : प्रा. वि. द. सरलष्कर
ग्रंथपाल : श्री. म. भि. कोण्णूर

पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रथम सत्रात देण्यात येत असलेल्या सुविधा द्वितीय सत्रात चालू ठेवण्यात आलेल्या आहेत. तसेच विविध इंग्रजी, मराठी साप्ताहिकांचे मागील आठवड्यांचे अंक वसतिगृहातील विद्यार्थ्यांकरिता वसतिगृहात वाचनासाठी ठेवण्याची पद्धत दुसऱ्या सत्रातही चालू ठेवण्यात आली आहे.

अहवालाच्या या मुदतीत (११ ऑगस्ट १९७२ ते ३१ जानेवारी १९७३) ग्रंथालयाला ४७ पुस्तके देणगीदाखल मिळाली आहेत. सर्व देणगीदारांचे आम्ही आभारी

आहोत. ब्रिटिश कौन्सिल लायब्ररी, पुणे यांनी आमच्या ग्रंथालयाला इंग्रजी साहित्यातील ३७ पुस्तके देणगीदाखल दिली आहेत हे नमूद करण्यास आम्हांला आनंद होतो.

याशिवाय विद्यापीठ अनुदान मंडळाच्या कॉसिप (COSIP) योजनेखाली शास्त्रशाखेकडील निरनिराळ्या विषयांची पुस्तके खरेदी करण्यात आली.

## प्राध्यापक वादसभा

मा. चिटणीस : प्रा. डॉ. लीला द. गोळे.

१९७२–७३ या शैक्षणिक वर्षांत स. प. महाविद्यालयातील प्राध्यापक-वाद-सभेच्या वतीने पुढील व्याख्याने आयोजित करण्यात आली. प्रत्येक सभेला माननीय प्राचार्य मंगळवेढेकर किंवा उपप्राचार्य डॉ. केरूर यांनी स्वतः उपस्थित राहून अध्यक्षस्थान भूषविले व पंचवीस-तीस प्राध्यापक बंधु - भगिनींनी सभेस अगत्य उपस्थित राहून चर्चेत भाग घेतला.

१. ' निबंधकार केळकर ' प्रा. चंद्रशेखर बर्वे
(शुक्रवार, दि. ८–९–७२)
२. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतील क्रांतिपर्व
– प्रा. ग. भा. जोशी (दि. मंगळवार, ३–१०–७२)
३. सम एज्युकेशनल रिफॉर्म्स विदाउट टिअर्स
– कुलगुरू रँगलर ग. स. महाजनी
(शनिवार, दि. १६–१२–७२)
४. ' एस्थेटिक सेन्सिबिलिटी ' – श्री. प्रभाकर पाध्ये
(गुरुवार, दि. ४–१–७३)

## स्वातंत्र्यमहोत्सव समिती

प्रमुख : डॉ. दि. ब. केरूर.

सदस्य : डॉ. व. के. मांडके
प्रा. पां. ना. कुलकर्णी
प्रा. ग. भा. जोशी
प्रा. वि. प्र. देव

१. पहिल्या सहामाहीत निश्चित केल्याप्रमाणे " स्वातंत्र्योत्तर कालातील विद्यार्थ्यांच्या जीवननिष्ठा " या विषयावर निबंधस्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत कु. प्रतिभा गुजर (तृवसा) व चंद्रशेखर हिरेमठ (पपूसा) यांना अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक मिळाले.

२. प्रा. ग. भा. जोशी यांनी विद्यार्थ्यांच्या अधिक माहितीसाठी,
१. इंग्रजांचे आगमन.
२. क्रांतिवीर वासुदेव बळवंत
३. हिंदी राष्ट्रवादाचा उदय व १८८५ ते १९०५ या काळातील काँग्रेसचे कार्य.
४. काही उल्लेखनीय क्रांतिवीर.
५. लो. टिळकयुगाचे समालोचन.
हे निबंध प्रसिद्ध केले.

३. महाराष्ट्रातील काही मान्यवर नेत्यांची व्याख्याने आयोजित केली होती; पण दुष्काळग्रस्त परिस्थितीमुळे व परीक्षा लवकर आल्यामुळे घेता आली नाहीत.

स्वातंत्र्यमहोत्सव – वर्षातच म्हणजे १५ ऑगस्ट १९७३ पर्यंत राहिलेली व्याख्याने घेण्यात येतील. ●

## १९८३ ?

॥ ● ॥

**छात्र हिंडत ढिल्या कपड्यात ।**
**कन्यका इरकली लुगड्यात ॥**
**थोर तंग कपडे करतात ।**
**कारटी बिघडली म्हणतात ॥**

। विकटकवि ।

# विविध विषय विभाग-वार्ता

**इंग्रजी वाङ्मय मंडळ :**

स्टाफ-इन-चार्ज : प्रा. भ. ना. कुलकर्णी
विद्यार्थिप्रतिनिधी : कु. सौदामिनी दोशी
श्री. जोब.

उद्घाटनानंतर मंडळाच्या आतापर्यंत नऊ बैठकी झाल्या. या सर्व शुक्रवारी संध्याकाळी घेण्यात येतात. प्रत्येक सभेत बहुधा एक विद्यार्थी वीस मिनिटे ठरलेल्या विषयावर टिपण वाचतो. नंतर त्या टिपणावर प्राध्यापक-विद्यार्थ्यांत मनमोकळेपणाने चर्चा होते.

मंडळाने आणखी दोन सभा आयोजित केल्या आहेत. त्यानंतर नेहमीप्रमाणे तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांसाठी निरोपसमारंभ करण्यात येईल.

**मराठी वाङ्मय मंडळ :**

विभागप्रमुख : डॉ. सौ. अनुराधा पोतदार
मराठी वाङ्मय मंडळाचे दुसऱ्या सत्राचे कार्यक्रम खालील प्रमाणे झाले.

१. ३ फेब्रुवारीला प्रा. श्री. गोविंद जोशी यांचे द्विवसा.-साठी ' जिप्सी 'वर व्याख्यान झाले.
मराठी वाङ्मय मंडळाचा समारोप फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यात झाला.

**हिंदी वर्गसंघटना :**

वर्गसंघटक : डॉ. स. रा. केणी
विद्यार्थिप्रतिनिधी : १. कु. कल्पना बापट
२. श्री. सुभाष तळेकर
३. कु. मंगला वैद्य
४. श्री. सुभाष ससाणे

या सत्रातील पहिला कार्यक्रम म्हणजे अलिगढ विद्यापीठातील हिंदी विभागाचे अध्यक्ष प्रा. डॉ. अंबाप्रसाद सुमन यांचे ' अर्थ और अनर्थ ' या विषयावरचे विद्यार्थ्यांना उपयुक्त, विचारपूर्ण असे भाषण. दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांनाही संघटनेने आपल्या परीने मदत केली. वर्षातील शेवटचा निरोपसमारंभ व वर्गसंघटनेच्या समारोपाचा कार्यक्रम ३ फेब्रुवारीला डॉ. सिंधू भिंगारकर, अध्यक्ष हिंदी विभाग, वाडिया कॉलेज यांच्या अध्यक्षतेखाली झाला.

## नियोजन चर्चा मंडळ

**अर्थशास्त्र विभाग**

अध्यक्ष : डॉ. दि. ब. केरूर.
कार्यकारी प्राध्यापक : प्रा. कु. देहाडराय.
प्रा. आनंद मोडक.
विद्यार्थिप्रतिनिधी : श्री. प्रमोद विपट. (तृवसा)
श्री. विजय देशपांडे. (तृवसा)
कु. भारती ओक. (तृवसा)
कु. भावे. (तृवसा)

दुसऱ्या सत्रात अमेरिकेतील न्यूयॉर्क विद्यापीठातील प्राध्यापक डॉ. दामोदरदास नारायणदास गुजराती यांचे ' अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेचे आजचे प्रश्न ' या विषयावर अत्यंत उद्बोधक व्याख्यान झाले. या व्याख्यानास विद्यापीठाच्या कॉमर्स फॅकल्टीचे भूतपूर्व डीन डॉ. ढेकणे उप-

स्थित होते. व्याख्यानानंतर झालेल्या प्रश्नोत्तरात प्राध्यापक आणि विद्यार्थिवर्ग यांनी भाग घेतला. श्री. गुजराती नू. म. वि. चे माजी विद्यार्थी आहेत.

पदव्युत्तर विभागाच्या कार्याचा विशेष भाग म्हणून काही चर्चा पत्रे आयोजित करण्यान आली. विभाग १ व ५ मधील विद्यार्थ्यांच्या प्रत्येक पेपरासाठी स्वतंत्र चर्चा पत्रे आयोजित केली होती.

गया येथे 'अखिल भारतीय आर्थिक परिषद' या वर्षी भरली होती. या परिषदेस महाराष्ट्र विभागाचे प्रतिनिधी म्हणून डॉ. केरूर उपस्थित होते. परिषदेत झालेल्या चर्चेची माहिती अर्थशास्त्र विभागाच्या बैठकीत डॉ. केरूर यांनी सादर केली.

तिसरा संकल्पित कार्यक्रम 'जुळी मुंबई' या विषयावर आहे. या कार्यक्रमास स्थापत्य महाविद्यालयामधील नगररचना विभागाचे प्रमुख श्री. कान्हेरे यांनी अध्यक्षस्थान स्वीकारण्याचे मान्य केले आहे. या विषयावर श्री. महाडिक; श्री. देव; कु. भावे आणि कु. निर्मल यांनी निबंध लिहिले आहेत.

**तत्त्वज्ञान विभाग**

विभागप्रमुख – डॉ. श्री. र. कावळे

१२ जानेवारी ७२ या दिवशी अमेरिकेतील नॉर्देम्प्टन, (मॅसेच्युसेट्स्) येथील स्मिथ कॉलेजमधील प्रा. डॉ. व्हर्जिनिआ कॉर्विन यांनी 'Some Reflections on Philosophy and Religion' यावर व्याख्यान देऊन विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली.

'भारतीय संस्कृती आणि श्री. अरविंद' या विषयावर साळवेकर निबंधस्पर्धा आयोजित केली होती. निबंधांचे परीक्षण डॉ. कावळे यांनी केले. २० जानेवारी ७२ ला डॉ. प्रा. ग. ना. जोशी – फर्ग्युसन कॉलेज – यांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. या स्पर्धेत पहिले पारितोषिक श्री. बेदरकर (द्विवसा) व दुसरे पारितोषिक कु. मंगला मराठे व कु. सुलभा मराठे यांना विभागून देण्यात आले. ह्या प्रसंगी डॉ. ग. ना. जोशी यांनी श्री अरविंदांच्या आश्रमातील अनुभवांचे सुंदर निवेदन केले.

२२ जानेवारीला आयोजित केलेल्या तिळगुळ समारंभात डॉ. श्री. र. कावळे, डॉ. लीला गोळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर विचार मांडले.

वर्षअखेरीस तृतीय वर्षातील तत्त्वज्ञान विद्यार्थ्यांना निरोप देण्याचा समारंभ संकल्पित आहे.

**भूगोल विभाग**

विभागप्रमुख : डॉ. दि. मु. वाघ

१. यंदा या विभागात एक नवीन उपक्रम सुरू करण्यात आला. विभागातील प्राध्यापकांसाठीच एक व्याख्यान व चर्चासत्र सुरू केले होते. या कार्यक्रमानुसार सबंध वर्षात निरनिराळ्या विषयांवर सात व्याख्याने झाली. ही सर्व व्याख्याने व त्यांवर झालेली चर्चा विभागातर्फे या वर्षाच्या शेवटी एका पत्रिकेत प्रसिद्ध होणार आहेत.

२. विभागातर्फे विद्यार्थ्यांना निरनिराळ्या भौगोलिक विषयावरील लघुपट दाखविण्यात आले.

३. तृतीय वर्ष साहित्य विद्यार्थ्यांसाठी एक शैक्षणिक सहल राजस्थानात काढली होती.

४. द्वितीय वर्ष व तृतीय वर्ष शास्त्र या वर्गातील विद्यार्थ्यांनी COSIP योजनेच्या अंतर्गत निरनिराळ्या खेड्यांतील भूमि-योजनांचा अभ्यास केला.

**इतिहास चर्चा मंडळ**

कार्याध्यक्ष : प्रा. सौ. कविता नरवणे.

विद्यार्थिप्रतिनिधी : चंद्रकांत शिंदे,
मीरा भालेराव,
शोभना पुराणिक,
चारुशीला भगत,
विवेक प्रधान,
निजाम मोडक.

१. दि. १–१२–७२ रोजी बहाई धर्माच्या उपदेशकाबरोबर चर्चा झाली. त्यानिमित्त आलेल्या पाहुण्यांनी बहाई धर्माबरोबर इतर जागतिक धर्मकार्याचा आढावा घेतला. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना पाहुण्यांनी समाधानकारक उत्तरे दिली.

मा. प्राचार्य के. पं. मंगळवेढेकर या कार्यक्रमाला उपस्थित होते.

२. दि. १६–१२–७२ ला प्रा. देशपांडे यांचे एकोणिसाव्या शतकातील भारतातील सामाजिक प्रेरणा या विषयावर माहितीपूर्ण व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी प्रा. कविता नरवणे होत्या. चंद्रकांत शिंदे यांनी आभार मानले.

३. दि. २७–१–७३ ला कु. शोभना पुराणिक यांनी 'क्रांतिवीर वासुदेव बळवंत' यांच्यावरचा निबंध वाचला. या वेळी प्रश्नोत्तरेही झाली. तसेच विवेक प्रधान व शेटचे यांनीही आपले निबंध वाचले.

४. इतिहास चर्चा मंडळाचा समारोप ख्यातनाम लेखक, दिग्दर्शक, वक्ते प्रा. भालबा केळकर यांच्या अध्यक्षतेखाली साजरा झाला. 'इतिहास आणि मराठी रंगभूमी' या विषयावर रसाळ व उद्बोधक व्याख्यान झाले.

५. मंडळातर्फे, दुष्काळग्रस्तांसाठी १०१ रुपये देणगी-रूपाने देण्यात आले.

**गणित व संख्याशास्त्र विभाग**

विभागप्रमुख : प्रा. म. कृ. केळकर

या सत्रात प्रा. म. रा. राईलकर यांनी Lp — spaces या विषयावर गणिताचे विद्यार्थी व शिक्षक यांसाठी १२ व्याख्याने दिली.

**रसायनविभाग**

कार्याध्यक्ष : प्रा वि. द. सरलष्कर

**पदव्युत्तर रसायन विभाग :** प्रथम व तृतीय सेमेस्टरचे निकाल समाधानकारक लागले. चौथ्या सेमेस्टरमधील अंतर्भूत 'रासायनिक संशोधनात्मक' निबंधांचे काम विशेषत्वाने चालू आहे.

**'COSIP' कार्यक्रम :** या कार्यक्रमात 'सर्वसाधारण COSIP कार्यक्रम' व 'विशेष COSIP' कार्यक्रम असे दोन विभाग केले आहेत.

'सर्वसाधारण COSIP' कार्यक्रमात चार रसायनशास्त्र-विषयक Films दाखविण्यात आल्या व दोन व्याख्याने आयोजित करण्यात आली आहेत.

'विशेष COSIP' कार्यक्रमात तृतीय वर्ष शास्त्र वर्गातील २४ मुलांची निवड मुलाखती घेऊन करण्यात आली. त्यातील ८ विद्यार्थी औद्योगिक सेंद्रिय रसायनशास्त्र, ८ विद्यार्थी विश्लेषणात्मक रसायनशास्त्र व ८ विद्यार्थी जीव रसायनशास्त्र या उपशाखांसाठी घेण्यात आले. त्यांच्याकरिता आखलेला कार्यक्रम व्यवस्थित सुरू आहे.

**Physics Association**

**Chairman :** Prof. K. R. Kulkarni
**Professor - in - Charge :** Dr. V. K. Mandke
**Secretary :** Mr. Meher

On behalf of 'Physics Association', following programmes were arranged in the second term of 1972–73

1. **Film Show :**

   'Dairy Industry in Denmark'
   6th December 1972

2. Shri. Agashe P. V. – T. Y. B. Sc. Physics
   A talk on 'Emergency Light Machine'
   15th December 1972.

3. Dr. Bhiday M. R. — M. Sc. Ph. D.
   Head of the University Department of Physics.

   A talk on 'Field Ion Microscopy'
   29th January 1973.

4. Shri. Kelkar R. S. — F. Y. B. Sc.
   A talk on 'Computers'
   31st January 1973.

# प्राध्यापकांची कार्यवृत्ते

**प्रा. रा. म. गोखले**
विभाग–अर्थशास्त्र, राजशास्त्र.

१. दोन व्याख्याने, व्याख्यान विषय : भारताच्या आर्थिक समस्या. व्याख्यान स्थल : नांदगाव. व्याख्यान दिन : २ व ३ एप्रिल ७२.

२. तीन व्याख्याने. वासंतिक वर्ग : 'भारतातील श्रमिक संघटनेचा विकास. सिन्नर. १९, २० व २१ एप्रिल ७२.

३. दोन व्याख्याने–ज्ञानप्रसार सप्ताह 'भारताच्या राज्यघटनेचे स्थूल स्वरूप' लोहगाव–वसमाने ३ व ४ मे ७२.

४. बारा व्याख्याने 'ग्रामीण भारताच्या आर्थिक समस्या' साळवे ३१ मे ते १० जून ७२.

५. नियोजन चर्चा मंडळातर्फे 'समाजवादी समाजरचना' कर्जत कॉलेज, कर्जत २ सप्टें ७२.

६. बार्शी कॉलेज, प्लॅनिंग फोरमतर्फे 'समाजवादी समाजरचना' बार्शी १० सप्टें ७२.

७. लेबर इन्स्टिटयूट, पुणेतर्फे भरलेल्या कुटंब–नियोजन परिषदेत 'लोकसंख्या, रोजगार व राहणीमान' पुणे २९ सप्टें ७२.

८. बहि:शाल शिक्षण मंडळातर्फे दोन व्याख्याने 'वाढती महागाई : कारणे व उपाय योजना' भिवंडी २५ व २६ नोव्हें ७२.

९. लोकशाही अभ्यासमंडळ 'लोकसंख्या, रोजगार व राहणीमान' पुणे ७ जाने ७३.

१०. मॉडर्न कॉलेज प्लॅनिंग फोरम व वाणिज्य मंडळातर्फे 'सोशॅलिस्टिक पॅटर्न ऑफ सोसायटी' पुणे २ जाने ७३.

**प्रा. डॉ. अनुराधा पोतदार**
विभाग–मराठी
लेख : 'कुसुमावती देशपांडे : वाङ्मय आणि जीवन' सत्यकथा १९७२–दोन लेखांक.
कविता : सत्यकथा, युगवाणी, सह्याद्री, पैंजण, राजस-दिवाळी अंक १९७२
व्याख्याने : नाशिक, कऱ्हाड, ओगलेवाडी येथे वाङ्मयीन विषयांवर व्याख्याने.
अधिकारमंडळावर नेमणुका :

१. लोकसाहित्याची प्रश्नपत्रिका एम. ए. साठी नेमावी काय याच्या विचारासाठी नेमलेल्या समितीवर नेमणूक. पुणे विद्यापीठ पदव्युत्तर अध्यापनासाठी निवड–समितीवर नेमणूक–पुणे विद्यापीठ

**प्रा. चंद्रशेखर शंकर बर्वे**
विभाग मराठी.
लेख : (१) 'निबंधकार केळकर' केळकर ऑगस्ट ७२
(२) केळकर : 'वाङ्मयीन शोभादर्शक–केळकर' स्मरणिका उज्जैन–ऑगस्ट ७२
(३) 'श्री. अरविंद यांची साक्षात्कारी समीक्षा' केसरी ऑग. सप्टें–७२
व्यख्याने : १. 'नवी आव्हानं नवी तत्त्वज्ञानं' अकोला ऑक्टो. ७२
२. 'निबंधकार केळकर' नगर–ऑक्टो. ७२
३. 'राजकीय झालं, सामाजिकाचं काय ?' सासवड–सप्टें. ७२
४. केळकर जन्मशताब्दीनिमित्ताने 'केसरी' कार्यालयात झालेल्या दोन परिसंवादात (मार्च–ऑगस्ट ७२) उपस्थिती. स्वतः निबंधवाचन व इतरांच्या निबंधावर चर्चा

इतर कार्य : ' सेंटर फॉर इंडियन रायटस ' च्या वतीने केळकर जन्मशताब्दी समारोहात सहकार्य.

**प्रा. डॉ. सज्जन राम केणी**
विभाग–हिन्दी.
व्याख्याने : ' तुलसी–विशेष कवी ' एस. एन. डी. टी. कॉलेज–२५ ते २९ ऑक्टो. ७२.
नेमणूक : पुणे विद्यापीठाच्या ' बोर्ड ऑफ स्टडीज इन् म्यूझिक ' या समितीवर नेमणूक.

**प्रा. डॉ. लीला द. गोळे**
विभाग–तत्त्वज्ञान.
लेख : ' प्रा. हुल्याळकर एक विद्यार्थिप्रेमी प्राध्यापक '. रविवार सकाळ–१७-९-७२
' Religious Views of Mahatma Gandhi ' Proceedings of the Seminar on M. Gandhi. University of Poona Press 1972.
व्याख्याने : ' १ विवेकानंदांची ईश्वरविषयक कल्पना ' दे. ऋ. ब्रा. शिक्षणोत्तेजक संस्था–१७-८-७२.
२. ' द्रौपदी–एक तेजस्विनी '-दे ऋ. संस्था महिलामंडळ २०-१०-७२
३. 'गॉड अॅज द सुप्रीम व्हॅल्यू' पुणे नभोवाणी १४ सप्टें.७२
अन्य कार्य :
१. यू. जी. सी. समितीने पीएच्. डी. साठी सादर केलेला प्रबंध पुस्तकरूपाने प्रकाशित करण्यासाठी निवड केली असून पुणे विद्यापीठास त्यासाठी लागणारी ग्रँट दिली आहे.
२. प्रा. हुल्याळकर षष्ट्यब्दपूर्ती समारंभाच्या सत्कार समितीमध्ये सहचिटणीस, माजी–विद्यार्थी मेळावा संयोजक व प्रा. हुल्याळकर स्मरणिका समिती सदस्य म्हणून कार्य केले.
३. अमेरिकेतील प्राध्यापक डॉ. व्हर्जीनिया कॉबिन यांना त्यांच्या पुणे येथील वास्तव्यात संशोधनकार्यासाठी मदत व सहकार्य.

**प्रा. प्रभाकर रघुनाथ करमरकर**
विभाग–भूगोल.
व्याख्यान : ' नैसर्गिक विभाग ' पुणे भगोल शिक्षक संघ.
नेमणूक : पुणे विद्यापीठ क्रिकेट निवड समितीवर नेमणूक.
अन्य कार्य :
१. पुण्यातील इराणी करंडक क्रिकेट सामन्यासाठी कॉमेंटेटर म्हणून काम केले.
२. दिल्ली येथे दुलीप करंडक सामन्यासाठी पंच.

**प्रा. दिनकर मुकुंद वाघ**
विभाग–भूगोल.
व्याख्याने : १. जिऑग्रफी अँड पोल्यूशन – अहमदनगर १ ऑक्टो. ७२.
२. लँड अँड वॉटर – पुणे १५ नोव्हें. ७२
परिषदांत उपस्थित : Seminar on Twin City of Bombay स. प. महाविद्यालय, पुणे. ऑगस्ट ७२.

**प्रा. पंडित शशिकांत श्रीपादराव**
विषय – वास्तवशास्त्र.
महाविद्यालयातील अध्यापनेतर कार्य :
राष्ट्रीय छात्रसेना (Naval Unit)
परिषदा :
' समर इन्स्टिटयूट इन फिजिक्स ' पुणे विद्यापीठाच्या वास्तवशास्त्र विभागातर्फे परिषदेत उपस्थित. मे–जून ७२.

**प्रा. भास्कर गणेश जोशी**
विभाग : जीवशास्त्र
व्याख्यान : ' नाग व साप ' स्काऊट ग्राऊंड.

**प्रा. म. रा. राईलकर**
विभाग : गणित.
ग्रंथलेखन : ' गणिती तर्कशास्त्र ' – ऑक्टो. ७२
' संचविज्ञान ' फेब्रु. ७३ – द्वितीयावृत्ती.
व्याख्याने : Lp–Sapces – स. प. महाविद्यालयात
गतवर्षी महाराष्ट्र राज्य शिक्षण संचालनालयाची रु. १५०० ची संशोधन शिष्यवृत्ती.
बारा व्याख्याने.

**प्रा. विजय प्रल्हाद देव**
विभाग : राज्यशास्त्र.
ग्रंथलेखन : गीताधर्म मंडळ–' प्राचीन भारतीय राजकीय विचार व संस्था ' याचे लेखन सुरू.
व्याख्याने : १. ' राज्यशास्त्राचा अभ्यास का व कसा ?' पुणे आकाशवाणी ११ ऑक्टो. ७२.
२. ' भारतीय संविधान के–प्रमुख विशेष,' ज्ञानप्रबोधिनी पुणे १५ डिसें. ७२

३. ' समाजपरिवर्तनाच्या दिशा. '
शिवाजीमंदिर पुणे. १३ सप्टें. ७२.

**प्रा. ग. भा. जोशी**

लेख :

१. ' स्वातंत्र्य महोत्सव समितितर्फे ' आयोजित केलेल्या ' स्वातंत्र्याची वाटचाल ' या लेखमालेत पाच निबंध-लेखन.

२. ' समानधर्मा ' या कथासंग्रहाचे केसरीत परीक्षण.

व्याख्याने :

३. ' मानवी हक्क दिनानिमित्त ' अध्यापक महाविद्यालयात प्रमुख पाहुणे म्हणून व्याख्यान.

४. प्राध्यापक वादसभेत ' स्वातंत्र्य चळवळीतील क्रांति-पर्व ' या विषयावर व्याख्याने.

इतर :

५. ' भारतीय संस्कृती परिचय माला ' या ग्रंथमालेचे कार्यवाह.

**प्रा. र. ना. चाफेकर**

जर्मन भाषा, विभाग – प्रमुख,

जर्मन भाषेच्या अभ्यासकांना व जर्मन साहित्याच्या आस्वादकांना उपयुक्त ठरतील अशा मौलिक ग्रंथांची प्रा. र. ना. चाफेकर यांनी निर्मिती केली आहे.

१. ' मखमलीवरील वाटचाल ' (जर्मन लघुकथांचा मराठी अनुवाद)

२. ' जर्मन अभिजात साहित्य ' (मध्ययुगापासून अर्वाचीन काळापर्यंत अनुवाद)

३. जर्मन वाङ्मयेतिहासाची रूपरेषा (अनुवाद)

४. जर्मन व्हर्स – [ जर्मन कवितांचा सटीक संग्रह– ले. बी. बी. कुलकर्णी आणि र. ना. चाफेकर].

प्रा. चाफेकर हे अनेक विद्यापीठांच्या जर्मन विभागांचे सदस्य आहेत. १९५०–५२, १९६४ आणि १९६७–६८ या वर्षांत ते अध्ययनासाठी जर्मनीला गेले होते. जर्मन वाङ्मय व वाङ्मय विचाराची त्यांनी महाराष्ट्राला करून दिलेली ओळख हे त्यांचे कार्य मौल्यवान आहे.

**प्राध्यापक : प्र. आ. भागवतवार**

मानसशास्त्र विभाग-प्रमुख

कम्युनिटी डेव्हलपमेंट प्रोग्राम - ए सायकॉलॉजिकल स्टडी हा प्रबंध पुस्तकरूपाने प्रसिद्ध. हा मुळशी व पुरंदर तालुक्यांच्या कम्युनिटी डेव्हलपमेंट कार्यक्रमाचा मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून केलेला तौलनिक अभ्यास आहे.

●

## अश्मयुग

|| ● ||

**परवा कोणी मिरवणुकीवर दगडफेक केली ।**
**काल मुलांनी (दगडांनी ?) शाळाच नष्ट केली ।।**
**आज सभेमधि वक्त्यांना दगडांनी झोडपले ।**
**काय आज की इथे अश्मयुग पुन्हा सुरू झाले ।।**

। विकटकवि ।

# क्रीडाविभाग

**विद्यार्थिनी विभाग :**

कार्याध्यक्ष : प्रा. प्र. र. करमरकर

आपल्या महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी-विभागाचे यंदाचे आंतर – महाविद्यालयीन सामने आपल्या कर्तबगारीने गाजवून गेली तीन वर्षे सतत सर्वसाधारण अजिंक्यपद (जनरल चँपियनशिप) टिकवून धरले, याबद्दल सर्व संबंधितांचे हार्दिक अभिनंदन. आपल्या महाविद्यालयातील बऱ्याच विद्यार्थिनींनी विशेष परिश्रम करून बुद्धिबळे, बॅडमिंटन, बॉल बॅडमिंटन ४ × १०० मी. रीले, खोखो, व्हॉलिबॉल या खेळांत उपविजेतेपद मिळवले तर सॉफ्टबॉल, कबड्डी, जलतरण या स्पर्धांत विजेतेपद मिळविले. जलतरण विभागाने अजिंक्यपद सतत चार वर्षे टिकविले. कबड्डीने तर अकराव्या वर्षाची मजल मारली. अशा अनेक गुणांची जमवाजमव करता करता वर्षअखेर एकूण १३६ गुणांची भर टाकली.

आंतर - महाविद्यालयीन बुद्धिबळ–स्पर्धांत कु. सुहासिनी आपटे व कु. ललिता नाझरे या नवोदित स्पर्धिका रौप्यपदकाच्या मानकरी ठरल्या. तसेच अनेक वर्षांनंतर आपण बॅडमिंटनचे उपविजेतेपद मिळवले. यात प्रामुख्याने कु. अलका नातूच्या उत्तम खेळाचा उल्लेख करणे उचित ठरेल. बॅडमिंटन इंम्प्रूव्हर्स ग्रुप व पी. वाय. सी. तर्फे झालेल्या सामन्यातही तिच्या शानदार खेळाने आपल्या महाविद्यालयाला नाव मिळवून दिले.

सॉफ्टबॉलच्या आंतर – महाविद्यालयातील अंतिम सामन्यात विरोधी संघाचा १ डाव आठ धावांनी दणदणित पराभव करून आपल्या संघाने अजिंक्यपद मिळवले. यामध्ये कु. रमा शर्मा व कु. कल्पना परोपकारी यांचा वाटा मोठा आहे. १९७२ मध्ये हैद्राबाद येथे झालेल्या राष्ट्रीय सामन्यासाठी खेळणाऱ्या खेळाडूंमध्ये कु. शर्मा हिला 'बेस्ट पिचर' व कु. परोपकारी हिला 'बेस्ट कॅचर' अशी पारितोषिके मिळाली. यंदाच्या आंतर-महाविद्यालयीन व्हॉलिबॉल सामन्यांत मात्र विजेतेपदाचा सतत सात वर्षे मिळणारा मान सोडावा लागून आपल्याला उपविजेतेपदावरच समाधान मानावे लागले. बॉलबॅडमिंटन व बुद्धिबळे हे खेळ तर नव्यानेच सुरू केले असूनसुद्धा या विभागातही आपल्या विद्यार्थिनींनी बरीच प्रगती केली. मैदानी स्पर्धांमध्ये कु. शालिनी आफळे व विजया पांगारे यांनी अनुक्रमे थाळीफेक व गोळाफेक यांत तिसरा क्रमांक मिळवला.

जलतरण विभागाने तर चौथ्यांदा अजिंक्यपद मिळवले. या संघाने आपले कौशल्य पणाला लावून ६५ गुणांची भागीदारी केली. आपल्याला आंतर-विद्यापीठीय स्पर्धांत पुणे विद्यापीठास दुसऱ्यांदा अजिंक्यपद ५१ गुणांनी मिळाले. कु. अरुणा जोशी हिचा १०० मी. ब्रेस्टस्ट्रोकमध्ये तिसरा क्रमांक आला तर कु. मेघा जोगळेकर हिचा १०० मी. बटरफ्लायमध्ये दुसरा क्रमांक आला. १०० मी., २०० मी., ४०० मी., फ्री-स्टाईल, १०० व २०० मी. बॅकस्ट्रोक व रीले यात तिचा प्रथम क्रमांक आला. अशी एकूण सात सुवर्णपदके तिने मिळविली. इतकेच नव्हे तर वैयक्तिक अजिंक्यपदाचा मानही तिने भूषविला. या सर्वांवर कळस म्हणजे पुणे विद्यापीठाला लागोपाठ दुसऱ्या वर्षी विद्यार्थिनींचे सांघिक विजेतेपद आपल्या जलतरण विभागाने मिळवून दिले. या यशाबद्दल पुणे महानगरपालिकेने महापौर मा. निळूभाऊ

लिमये यांचे हस्ते १५ ऑगस्ट, १९७२ या स्वातंत्र्यदिनी कु. मेघा जोगळेकरचा सत्कार केला. मद्रास येथे झालेल्या अखिल भारतीय जलतरण स्पर्धेत कु. मेघा जोगळेकर व कु. अरुणा जोशी या दोघी सुवर्णपदाच्या मानकरी ठरल्या. कु. मेघा जोगळेकरने तेथे २०० मी. फ्री-स्ट्राईलला तिसरा व १०० मी. बॅकस्ट्रोकला दुसरा क्रमांक पटकावला. कोलंबो येथे झालेल्या भारत-सिलोन जलतरण स्पर्धेतसुद्धा कु. मेघा जोगळेकर हिची निवड झाली. अशा तऱ्हेने गेली ४ वर्षे जलतरण विभागाच्या अजिंक्यपदाचा मान आपल्या महाविद्यालयाकडे येत आहे व म्हणूनच मुलींचे सर्वसाधारण अजिंक्यपद आपण ओळीने गेली तीन वर्षे टिकवू शकलो. यामध्ये कु. मेघा जोगळेकरच्या कर्तृत्वाचा फार मोठा वाटा आहे. या विद्यार्थिनीचा गौरव करावा तितका थोडाच ठरेल. तिच्या कर्तृत्वाचे पारितोषिक म्हणून आपल्या महाविद्यालयाच्या जिमखाना विभागाने तिला खास सुवर्णपदक दिले आहे.

भारतीय खेळातसुद्धा आपल्या विद्यार्थिनींची कामगिरी अभिमानास्पद आहे. विद्यार्थिनींच्या कबड्डीच्या संघाने विभागीय तसेच विद्यापीठीय सामन्यांचे यशही कु. सुप्रभा सावंतच्या नेतृत्वाखाली मिळवले. कु. साधना धारिया हिची महाराष्ट्राच्या कबड्डी प्रातिनिधिक संघात लागोपाठ चौथ्यांदा निवड झाली. कु. साधना धारिया व कु. मंजिरी कुलकर्णी या दोघींचा कबड्डी संघातील यशातील कर्तृत्वाचा वाटा महत्त्वाचा आहे. ऑक्टोबरमध्ये मुंबई येथे झालेल्या, शकुंतला भोईर ट्रॉफी, (आंतर-महाविद्यालयीन, विद्यार्थिनी) स्पर्धेत आपल्या महाविद्यालयाचा संघ उपविजयी ठरला. बांगला देश येथे जाणाऱ्या भारताच्या महिला संघाच्या (कबड्डी) निवडीसाठी मुंबई येथे गोल्ड कप स्पर्धा झाल्या. त्यामध्ये ठरलेल्या साधना क्रीडामंडळास आपल्या पाच विद्यार्थिनी, (१) साधना धारिया, (२) सुप्रभा सावंत, (३) मंजिरी कुलकर्णी, (४) सुनंदा पळशीकर व (५) नंदिनी कदम होत्या.

सन्मित्र संघाने भरवलेल्या खोखोच्या साखळी स्पर्धेत आपण उपविजेतेपद मिळवले. त्यात कु. शोभा देसाईला उत्कृष्ट पाठलागाबद्दल व कु. आशा कुलकर्णीला उत्तेजनार्थ परितोषिक मिळाले. नवमहाराष्ट्र संघाने भरविलेल्या साखळी स्पर्धेत आपला संघ विजयी झाला. कु. आशा कुलकर्णीला उत्कृष्ट पळतीचे व कु. आशा नगरकरला उत्कृष्ट पाठलागाचे बक्षीस मिळाले. आंतर-महाविद्यालयीन सामन्यात मात्र आपल्याला उपविजेतेपद मिळाले. राणाप्रताप संघातर्फे झालेल्या अखिल भारतीय पातळीवरील खोखोस्पर्धेत कु. नीला जोशी हिला उत्कृष्ट खेळाडू म्हणून पारितोषिक मिळाले. आपल्या महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी कु. शीला दळवी आंतरराज्य खोखोस्पर्धेच्या वेळी महाराष्ट्र राज्यातर्फे संघनायिका म्हणून निवडली गेली.

एकूण सर्व खेळांत विद्यार्थिनींची बरीच प्रगती दिसून येते. एकूण दहा खेळांमध्ये आपल्या महाविद्यालयाच्या २१ विद्यार्थिनी पुणे विभागातर्फे, २२ विद्यार्थिनी पुणे विद्यापीठातर्फे, ८ विद्यार्थिनी महाराष्ट्र राज्यातर्फे, ४ विद्यार्थिनी अखिल भारतीय स्पर्धांसाठी व एक आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारतातर्फे निवडल्या गेल्या आहेत; अशा एकूण ५५ जागा आपल्या महाविद्यालयातील या खेळाडू विद्यार्थिनींनी निरनिराळ्या ठिकाणी भूषविल्या आहेत. ही कामगिरी आपल्या महाविद्यालयाला भूषणास्पद आहे.

**विद्यार्थिविभाग**

**क्रिकेट :** आंतर–महाविद्यालयीन क्रिकेटचा अंतिम सामना नेहरू स्टेडियमवर होऊन लागोपाठ दुसऱ्या वर्षी आपल्या संघाने विजेतेपद पटकावले. अंतिम सामना वाडियाबरोबर झाला. या सामन्यात गोडबोले व राव यांनी स. प. तर्फे उत्कृष्ट फलंदाजी केली. रमेश बोर्डे व राजू भालेकर यांच्या माऱ्यामुळे वाडियाचा दुसरा डाव कोसळला. त्यामुळे पहिल्या डावात वाढावा मिळूनही वाडियाला स. प. च्या जिद्दी संघापुढे हार खावी लागली. स. प. च्या यशस्वी वीरांचे अभिनंदन.

**हॉकी :** हॉकीचा पहिला सामना आपण जिंकला. दुसरा सामना ए. एफ्. एम्. सी. विरुद्ध झाला. त्यात मात्र आपल्या संघाला अपयश स्वीकारावे लागले.

**भारतीय खेळ :** या विभागामध्ये पहिल्याच सामन्यात आपल्या संघाचा पराभव झाला.

**व्यायामशाळा : मुष्टियुद्ध –** १०५ पौंडाच्या गटात

आपल्या महाविद्यालयाचा अशोक भोई याने उपविजेते-पद पटकावले. हेमंत फडके १३३ पौंड गटात विजयी झाला.अशोक भोई याने वेस्टर्न इंडियाच्या सामन्यात भाग घेऊन उपविजेतेपद मिळवले.

**वजन उचलणे** : या स्पर्धेमध्ये आपल्या महाविद्यालयाच्या प्रकाश कुन्हाडे १६५ पौंडाखालील गटात विजयी झाला. याच स्पर्धांमध्ये थापटे १२३´ पौंडाखाली तिसरा क्रमांक मिळवून यशस्वी झाला. वजन उचलण्याच्या स्पर्धांमध्ये एकूण १० विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. विशेष म्हणजे हे सर्व खेळाडू नवोदित होते. त्यांच्याकडून भविष्य-काळात भरीव कामगिरी होईल अशी अपेक्षा आहे.

**सॉफ्टबॉल** : वादपद्धतीच्या सामन्यात पहिल्या दोन फेऱ्यांत आपल्या संघाने विजय मिळवला. पण तिसऱ्या फेरीत गरवारे कॉलेजकडून आपला पराभव झाला.

**व्हॉलिबॉल** : या वर्षी आपल्या सघाला उपविजतेपद मिळाले. विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे या यशातील प्रमुख वाटेकरी रवींद्र गुर्जर याची आंतरविद्यापीठ सामन्यासाठी पुणे विद्यापीठ संघाचा कप्तान व आंतर-राज्य स्पर्धेत महाराष्ट्र राज्य संघाचा कप्तान म्हणून निवड झाली.

७. एकूण ६ खेळांमध्ये आपले ११ खेळाडू विभागीय सामन्यासाठी, ४ खेळाडू विद्यापीठीय सामन्यासाठी, २ खेळाडू राज्य पातळीवर व ५ खेळाडू राष्ट्रीय पातळी-वर निवडले गेले.

आपल्या कॉलेजचे माजी विद्यार्थी श्री. बाळ दाणी यांची भारतीय क्रिकेट निवड समितीवर निवड झाली आहे. भालेकर यांची विझी ट्रॉफी पश्चिम विभागीय व विद्या-पीठ संघाचा कर्णधार म्हणून निवड झाली. विश्वास देशमुख व रमेश बोर्डे यांचीही या संघांत निवड झाली. नुकत्याच बारामती येथे झालेल्या राष्ट्रीय सामन्यात महाराष्ट्राच्या विजयी प्रातिनिधिक खोखोसंघात आपले महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी सर्वश्री प्रकाश शेठ व गोवंडे यांचा समावेश झाला होता. श्री. गोवंडे व शेठ यांचा खेळ उत्कृष्ट झाला. श्री. प्रकाश शेठ यांस या वर्षाचा उत्कृष्ट खेळाडू म्हणून, एकलव्य ' पारितोषिक ' मिळाले. तसेच आपले महाविद्यालयाचे दुसरे माजी विद्यार्थी श्री. डॉ. मधुसूदन झंवर यांना अखिल भारतीय खोखो-मंडळाचे अधिकृत पंच म्हणून मान्यता मिळाली. श्री. विजय अधिकारी यांनी सिमल्यात नुकत्याच झालेल्या भारतीय, अ गट बुद्धिबळ सामन्यात नैपुण्य दाखविले.

## आपल्या महाविद्यालयातील खेळाडू विद्यार्थी–विद्यार्थिनींनी विविध पातळीवरील सामन्यांत घेतलेला भाग

| खेळ विद्यार्थिनी | विभागीय सामने | विद्यापीठ सामने | राज्यपातळीवरील सामने | राष्ट्रीय पातळीवरील सामने |
|---|---|---|---|---|
| १. बॅडमिंटन | अलका नातू | अलका नातू | — | — |
| २. सॉफ्ट बॉल | — | — | रमा शर्मा<br>कल्पना परोपकारी<br>सुलभा गोडबोले | — |
| ३. बास्केट-बॉल | — | सुमती जेजुरीकर | — | — |
| ४. व्हॉलि-बॉल | सुनंदा तेलंग<br>सरोज परांजपे<br>सुलभा गोडबोले | सुनंदा तेलंग<br>सरोज परांजपे | — | — |
| ५. हॉकी | — | संजीवनी कापशीकर<br>नीलिमा खासनीस | — | — |
| ६. बॉल-बॅडमिंटन | — | शैला खिवसरा<br>अरुणा दीक्षित | — | — |

| खेळ विद्यार्थिनी | विभागीय सामने | विद्यापीठ सामने | राज्यपातळीवरील सामने | राष्ट्रीय पातळीवरील सामने |
|---|---|---|---|---|
| ७. कबड्डी | सुप्रभा सावंत<br>साधना धारिया<br>मंजिरी कुलकर्णी<br>अलका जोशी<br>शालिनी आफळे | सुप्रभा सावंत<br>साधना धारिया<br>मंजिरी कुलकर्णी<br>सुनंदा पळशीकर | साधना धारिया | साधना धारिया<br>मंजिरी कुलकर्णी |
| ८. खो-खो | आशा नगरकर<br>नीला जोशी<br>शोभा देसाई<br>शीला काळे<br>लीना गोसावी<br>आशा कुलकर्णी | आशा नगरकर<br>नीला जोशी<br>शोभा देसाई<br>लीना गोसावी<br>आशा कुलकर्णी | -- | -- |
| ९. जलतरण | मेघा जोगळेकर<br>अरुणा जोशी<br>रंजना सोमण | मेघा जोगळेकर<br>अरुणा जोशी<br>रंजना सोमण | मेघा जोगळेकर<br>अरुणा जोशी | मेघा जोगळेकर<br>अरुणा जोशी |
| १०. मैदानी स्पर्धा<br>गोळा-थाळीफेक | सुषमा जोशी<br>शालिनी आफळे | -- | -- | -- |

(याशिवाय कु. मेघा जोगळेकर हिची भारत-सिलोन जलतरण सामन्यात निवड)

**विद्यार्थी**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. क्रिकेट | राजू भालेकर<br>विश्वास देशमुख<br>रमेश बोर्डे<br>हेमंत तळवलकर<br>दीपक सावंत<br>अनिल गोडबोले | राजू भालेकर<br>विश्वास देशमुख<br>रमेश बोर्डे<br>हेमंत तळवलकर | राजू भालेकर<br>(रणजी करंडक) | -- |
| २. हॉकी | सुरेश रेणुसे | -- | -- | -- |
| ३. मुष्टियुद्ध | अशोक भोई<br>हेमंत फडके | -- | -- | -- |
| ४. सॉफ्टबॉल | -- | -- | -- | योगेन अशर,<br>अनिल गोडबोले |
| ५. व्हॉलिबॉल | -- | -- | रवींद्र गुर्जर | -- |
| ६. वजन उचलणे | प्रकाश कुऱ्हाडे | -- | -- | -- |

## छात्रसेनाविभाग

**३६ महाराष्ट्र एन. सी. सी. बटालियन कंपनी १ व २**
**एन्. सी. सी. इन चार्ज : कॅप्टन भ. रा. जोशी**
**पहिल्या शैक्षणिक सत्रातील वृत्तांत ऑक्टोबर १९७२ मध्ये दिला आहे.**

### दुसऱ्या शैक्षणिक सत्रातील वृत्तांत

यंदा ३६ महाराष्ट्र एन. सी. सी. बटालियनचे वार्षिक शिबिर मंचर येथे २४ ऑक्टोबर ते ४ नोव्हेंबर १९७२ ला व्यवस्थित पार पडले. आपल्या महाविद्यालयातून एकूण ९९ कॅडेटस उपस्थित होते. कॅम्प ॲडजुटंट म्हणून

कॅप्टन बी. आर. जोशी यांनी काम पाहिले. आपल्या महाविद्यालयातील कॅडेटसनी संगीन युद्धाचे (बायोनेट फायटिंग) उत्कृष्ट प्रात्यक्षिक करून दाखविले. ज्यूनिअर अंडर ऑफिसर श्री. इंदलकर व श्री. देशमुख विशेष उल्लेखनीय ठरले. या वर्षी शिबिरातील बेस्ट कॅडेट म्हणून कंपनी २ मधील ज्यूनिअर अंडर ऑफिसर श्री. इंदलकर यांची निवड झाली. मा. प्राचार्य के. पं. मंगळवेढेकर व उपप्राचार्य दि. ब. केरूर यांनी मंचर येथील शिबिरास भेट दिली. त्यामुळे छात्रसैनिकांना आनंद झाला.

कामटी (नागपूर) येथे २१ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर दरम्यान होणाऱ्या कंबाइंड ॲडव्हान्स-लीडरशिप कॅम्प-साठी पुणे विभाग प्रमुख सेकंड लेफ्टनंट श्री. ए. एस. जानवे यांची निवड झाली. सीनियर ज्यूनिअर विद्यार्थी-विद्यार्थिनींचे त्यांनी नेतृत्व करून पुणे विभागाला व्हॉलि-बॉल चॅपियनशिप आणि शूटिंग कॉम्पिटिशनचा कप मिळवून दिला. व्हॉलिबॉलचे अजिंक्यपद मिळविण्यात आमच्या ३६ महाराष्ट्र एन. सी. सी. बटालियनचा सिंहाचा वाटा आहे. १५ नोव्हेंबर ७२ रोजी एन. सी. सी. चे मेजर रं. ना. गायधनी यांचा सेवानिवृत्तीबद्दल निरोप समारंभ साजरा केला.

२६ नोव्हेंबर, १९७२ रोजी एन. सी. सी. दिन शिवाजी-नगर पोलीस ग्राउंडवर साजरा झाला. त्यातली ३६ महाराष्ट्र एन. सी. सी. बटालियनच्या आपल्या महा-विद्यालयातील कॅडेट्सनी संगीन युद्धाचे उत्कृष्ट प्रात्य-क्षिक करून दाखविले. या तुकडीचे नेतृत्व कॅप्टन बी. आर. जोशी यांनी केले. त्याचा विशेष उल्लेख करावासा वाटतो.

२६ जानेवारीला साजऱ्या झालेल्या प्रजासत्ताकदिनी प्राचार्य श्री. के. पं. मंगळवेढेकर यांच्या अध्यक्षतेखाली आपल्या महाविद्यालयातील कॅडेटसनी प्रात्यक्षिके करून दाखवली. त्याच दिवशी संध्याकाळी ३६ महाराष्ट्र एन. सी. सी. बटालियनचे कमांडिंग ऑफिसर लेफ्टनंट कर्नल एन. जे. कापडिया यांच्या अध्यक्षतेखाली कंपनी डे साजरा झाला.

(नेमबाजीतील वैयक्तिक कप सीनियर अंडर ऑफिसर, श्रीकांत बोकील यांस मिळाला.)

**महाराष्ट्र सिग्नल कंपनी एन. सी. सी.**

कंपनी ऑफिसर : प्रा. पां. ना. कुलकर्णी

महाविद्यालयातील जवळजवळ ७० विद्यार्थ्यांना त्यांची 'शारीरिक क्षमता परीक्षा' घेऊन प्रवेश देण्यात आला. यंदाची पहिली परेड २८ जून १९७२ ला झाली. L/Cpl ए. जे. भागवत, L/Cpl एन. ए. कुलकर्णी व JrU/O बी. एस. केळकर हे उन्हाळी शिबिरासाठी मारवे येथे जाऊन आले. या वर्षी युनिटमध्ये त्रैमासिक शारीरिक क्षमता चाचण्या घेण्यात आल्या. त्यात L/Cpl लेले हा सर्व प्रथम आला. या वर्षी कॅंपमध्ये ड्रिलचे पारितोषिक आपण मिळविले याचे श्रेय L/Cpl कानिटकर याला आहे. बेस्ट लाइन ड्रेसिंगचे पहिले पारितोषिक व अन्य काही पारितोषिके कंपनीला मिळाली. विद्यार्थी Cpl उर्सेकर यांस 'बेस्ट शॉट' चे बक्षीस मिळाले.

**मेजर गायधनी यांची एन. सी. सी. तून सेवानिवृत्ती**

मेजर रं. ना. गायधनी एन. सी. सी. मधून १।४।७२ ला सेवानिवृत्त झाले. मेजर गायधनी ६ ऑगस्ट १९४९ ते १।४।७२ या काळात म्हणजे जवळजवळ २३ वर्षे एन. सी. सी. मध्ये ऑफिसर म्हणून काम पाहत होते. त्यांचे प्री-कमिशन शिक्षण बेळगाव येथे १९४९ मध्ये झाले व 2 nd Maharastra एन. सी. सी. मध्ये ते दाखल झाले. सेकंड लेफ्टनंट ते मेजर या सर्वांत मोठ्या अशा मानाच्या जागेवर ते ६।८।६८ ते १।४।७२ पर्यंत होते. त्यांनी एकंदर ३ रिफ्रेशर कोर्स केले. ते खालीलप्रमाणे १. बेळगांव येथे ६ आठवडे, २. १९६४ मध्ये कामटी (मे ते जून), ३. १९६८ मध्ये पुरंदर.

३६ महाराष्ट्र बटालियनचे ते टु. आय. सी. म्हणूनही काम पहात होते. Camp Adjutant, Coy, Comman-der Trainig ऑफिसर अशी विविध कामे त्यांनी शिबिरात केली आहेत.

ते निवृत्त झाल्याने आपल्या महाविद्यालयातील एन. सी. सी. विभाग त्यांच्या नेतृत्वास मुकला आहे. परंतु अजूनही ते वारंवार सल्ला देण्याचे कार्य करीत असतात.


**'गिर्यारोहण'**

आपल्या महाविद्यालयातील काही विद्यार्थी-विद्यार्थिनींनी यंदा गिर्यारोहणाच्या विविध अभ्यासक्रमांत खूपच आस्था-

पूर्वक भाग घेतला. आपल्या महाविद्यालयातील श्री. हेरंब अनगळ आणि कु. नीना वझे यांची मे १९७२ मध्ये हिमाचल प्रदेशात 'मनाली' येथे Mountaineering च्या बेसिक कोर्ससाठी निवड झाली होती. त्यांनी आपला हा गिर्यारोहणाचा अभ्यासक्रम यशस्वी रीत्या पुरा केला. श्री. हेमंत फडके यांचीही मे १९७३ मध्ये वरील कोर्स-साठी निवड झाली आहे. तसेच श्री. हेरंब अनगळ याची पुन्हा ॲडव्हान्स कोर्ससाठी निवड झाली आहे.

पुणे विद्यापीठाने डिसेंबर ७२ मध्ये 'सिंहगड' येथे आयोजित केलेल्या गिर्यारोहणाच्या शिबिरात श्री. हेरंब अनगळ व श्री. हेमंत फडके यांनी 'इंस्ट्रक्टर' म्हणून काम पाहिले. ह्या शिबिरात कु. मंदाकिनी पटवर्धन, श्री. प्रदीप पानसे व मुकेश महाडीक यांनी भाग घेतला होता.

●



## डॉ. नानासाहेब परुळेकर



डॉ. ना. भि. ऊर्फ नानासाहेब परुळेकर यांचे दिनांक ८ जानेवारी १९७३ रोजी दुःखद निधन झाले. ते आपल्या महाविद्यालयाचे १९१६ ते १९२० या काळातील विद्यार्थी होते. १९२० साली तत्त्वज्ञान हा विशेष विषय घेऊन ते आपल्या महाविद्यालयातून पदवीधर विद्यार्थ्यांच्या पहिल्या तुकडीबरोबर बाहेर पडले. डॉ. ग. श्री. खैर, श्री. शं. रा. दाते हे त्यांचे समकालीन विद्यार्थी. या तिन्ही विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातून बाहेर पडल्यावर गेल्या ५० वर्षांत महाराष्ट्राच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनात विशेष कर्तबगारी करून मोलाची भर घातली.

डॉ. नानासाहेब परुळेकर हे प्रा. सोनोपंत दांडेकर आणि प्रा. नारळकर यांचे विद्यार्थी होत. या दोन्ही गुरुजनां बद्दल त्यांनी अखेरपर्यंत आदरभाव आणि कृतज्ञतावृत्ती दाखवली. प्रा. दांडेकर यांचा डॉ. नानासाहेब कित्येक अडचणींच्या प्रसंगी सल्ला घेत असत. "आयुष्यातील अत्यंत कठीण अशा नैतिक संघर्षाच्या प्रसंगी प्रा. दांडेकर यांचा मला मोठाच आधार वाटत असे" असे त्यांनी अनेक वेळा उद्‌गार काढले आहेत. या गुरुजनांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वामुळे डॉ. नानासाहेबांचे आपल्या महाविद्यालयाशी सतत जिव्हाळ्याचे संबंध राहिले आणि ते अधिक दृढ होण्यासाठी प्रा. दांडेकर यांच्यानंतर प्रा. हुल्याळकर व प्रा. मालेगावकर यांनीही विशेष कार्य केले.

डॉ. परुळेकर आपल्या महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष होते. माजी विद्यार्थी संघ ही महाविद्यालयाची मोठी शक्ती आहे आणि त्या दृष्टीने मंडळाचे काम चालू राहावे यासाठी त्यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले. माजी विद्यार्थ्यांचा संस्थेच्या शैक्षणिक विस्तारासाठी व विकासासाठी विविध प्रकारांनी किती उपयोग होऊ शकतो याचा देशी व परदेशी विद्यापीठांचा प्रत्यक्ष अनुभव असल्याने त्यांनी या कामी विशेष पुढाकार घेतला व आपल्या कार्यबाहुल्यात शक्य तेव्हा सवड काढून माजी विद्यार्थी मंडळाच्या कार्याला चालना दिली. डॉ. नानासाहेब अध्यक्ष व डॉ. ग. श्री. खैर कार्याध्यक्ष असा योगायोग जुळून आल्याने माजी विद्यार्थी मंडळाच्या कार्याला एक चांगली बैठक मिळाली.

१९६६-६७ या वर्षी महाविद्यालयाने आपल्या वाटचालीची ५० वर्षे पूर्ण केली. त्यानिमित्त १९६७ च्या जानेवारीत डॉ. चिंतामणराव देशमुख यांच्या अध्यक्षते-

खाली महाविद्यालयाने भव्य प्रमाणात सुवर्णमहोत्सव साजरा केला. या सुवर्णमहोत्सवाच्या सल्लागार समितीवर काम करून डॉ. नानासाहेबांनी आपले बहुमोल मार्गदर्शन महाविद्यालयाला उपलब्ध करून दिले. सुवर्णमहोत्सवनिधीच्या संकलनासाठी त्यांनी आपल्या सार्वजनिक जीवनातील ओळखीचा व प्रतिष्ठेचा महाविद्यालयाला चांगल्या रीतीने उपयोग करून दिला. याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट अशी की स. प. महाविद्यालयासारख्या खाजगी शिक्षणसंस्थांचे प्रश्न व अडचणी समजावून घेऊन त्यांची सार्वजनिक स्वरूपात मांडणी करण्यासाठी ते जागरूकतेने लक्ष घालीत. आपल्या अग्रलेखांतून त्यांनी या विचाराला वेळोवेळी चालना दिली आणि शासनाचा व समाजाचा शि. प्र. मंडळी आणि त्यासारख्या महाराष्ट्रातील शैक्षणिक संस्थांबद्दल योग्य तो दृष्टिकोन होण्यास मदत केली.

विद्यार्थ्यांच्या पुस्तकी शिक्षणाबरोबरच त्यांना चांगले विचार द्यावेत, त्यांचे चारित्र्य, नीतिमत्ता सुधारावी, व समाजाचे उत्तम नागरिक म्हणून त्यांनी आपले कर्तृत्व फुलवावे ही त्यांची मुख्य भूमिका होती. सर्वसामान्य जनतेविषयीही त्यांची हीच दृष्टी होती आणि त्यानुसार ते आपल्या पत्राच्या रूपाने लोकशिक्षणाचे मोठेच काम करीत होते. विद्यार्थ्यांनाही या दृष्टिकोनातून त्यांनी सतत उत्तेजन दिले. स. प. महाविद्यालयाच्या या बाबतीतील सर्व उपक्रमांना त्यांनी प्रसिद्धी दिली, उत्तेजन दिले आणि योग्य तेथे गौरवही केला.

आपल्या आयुष्यातील ५० वर्षे डॉ. परुळेकरांनी समाजाची जी सेवा केली त्याबद्दल पुणे विद्यापीठाने सन्माननीय डी. लिट्. ही पदवी देऊन त्यांचा नुकताच गौरव केला. त्यानंतर शि. प्र. मंडळीने त्यांना एका अनौपचारिक समारंभात त्यांचा गौरव करण्यासाठी त्यांना निमंत्रण दिले होते. परंतु त्यांची प्रकृती बिघडत चालली होती. त्यामुळे या समारंभाला ते उपस्थित राहू शकले नाहीत. म्हणून मंडळीच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष श्री. मोहनराव गवंडी, प्रा. मालेगावकर, प्राचार्य मंगळवेढेकर इ. मंडळी आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी त्यांच्या घरी मुद्दाम गेली होती. त्या वेळी डॉ. नानासाहेबांनी आपल्या महाविद्यालयाबद्दलचा अभिमान आणि वाटणारी आस्था पुन्हा एकदा प्रकट केली. महाविद्यालयाच्या सर्वांगीण संवर्धनासाठी ' परशुरामीय प्रतिष्ठानाची ' योजना त्यांच्यापुढे मांडताच त्यांनी तिचे मनापासून स्वागत केले आणि या योजनेला गती लाभण्यासाठी रु. ३००० ची देणगी देण्याचेही आश्वासन दिले. या घटनेतून डॉ. नानासाहेबांच्या मनातील आपल्या महाविद्यालयाविषयीचा जिव्हाळा व्तक्त होतो.

अशा रीतीने एक कष्टाळू व हुशार विद्यार्थी कर्तबगारीची आणि सार्वजनिक सेवेची सर्व क्षेत्रे शोधून आपल्या समाजाच्या प्रगतीसाठी चिकाटीने, निर्भयपणे आणि जिद्दीने स्वतःच्या प्रयत्नांतून कार्याचे केवढे विश्व उभे करू शकतो याचा एक वस्तुपाठच त्यांनी आपल्यापुढे ठेवला आहे. स. प. महाविद्यालय त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी होत आहे.

ईश्वर त्यांना सद्‌गती देवो !

**प्राचार्य श्री. गो. हुल्याळकर षष्टयब्दिपूर्ति सत्कार**

प्राचार्य श्रीकृष्ण गोपाळ हुल्याळकर हे स. प. महाविद्यालयातील तर्कशास्त्र, तत्त्वज्ञान व मानसशास्त्र या विषयांचे सुप्रसिद्ध प्राध्यापक. त्यांनी १९६० ते १९६३ या कालावधीत महाविद्यालयाचे प्राचार्यपद भूषविले. पुणे विद्यापीठाच्या अनेक महत्त्वाच्या जागांवर त्यांनी पदाधिकारी म्हणून काम पाहिले व विशेषतः पुणे विद्यापीठाच्या कार्यकारिणीचे सभासद या नात्याने महाराष्ट्रात भरीव शैक्षणिक कार्य केले.

२ डिसेंबर १९७२ रोजी ' प्राचार्य श्री. गो. हुल्याळकर समिती 'ने प्राचार्य हुल्याळकरांचा सन्मानपूर्वक सत्कार केला व त्यांना मानचिन्ह व सत्कारनिधी अर्पण केले. हा समारंभ महाविद्यालयाच्या देवी रमाबाई सभागृहात म. म. द. वा. पोतदार यांच्या अध्यक्षतेखाली साजरा झाला. या समारंभाचे प्रमुख अतिथिपद मा. मोहन धारिया यांनी भूषविले होते. या समारंभात म. म. द. वा. पोतदार, डॉ. ग. स. महाजनी, श्री. चिं. वि. जोग, श्री. स. के. नेऊरगावकर, प्राचार्य रा. रा. मालेगावकर, प्रा. श्री. वा. काळे, प्रा. जी. के. गाडगीळ व प्रा. मा. पं. मंगुडकर यांनी प्राचार्य हुल्याळकरांबद्दल गुणवर्णनपर

भाषणे केली. मा. मोहन धारियांनी आपल्या भाषणात आधुनिक महाराष्ट्रातील विचारवंत व शिक्षणतज्ज्ञांत प्राचार्य हुल्याळकरांचे महत्त्वाचे स्थान आहे असे प्रतिपादन केले व त्यांचे अभीष्टचिंतन केले. प्राचार्य हुल्याळकरांनी सत्काराला उत्तर देताना आपल्या गुरुजनांचा ऋणनिर्देश केला व जीवनात अनेक संकटांना तोंड देत असता स्वतःतील तत्त्वचिंतकाचा विकास कसा होत गेला त्याचे चित्रण केले.

आभारप्रदर्शनानंतर हा संस्मरणीय कार्यक्रम संपला.

**महाराष्ट्र शासन – पुरस्कृत माजी विद्यार्थी**

प्रजासत्ताकदिनी स. प. महाविद्यालयाच्या खालील माजी विद्यार्थ्यांचा महाराष्ट्र शासनातर्फे शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल राज्यपुरस्कार म्हणून ५०० रु. रोख व प्रशस्तिपत्रक देऊन गौरव करण्यात आला.

डॉ. श्रीमंती मधुमालती आपटे. (गणिताच्या प्राध्यापिका, फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे)

डॉ. ना. वि. भिडे (रसायनचे प्राध्यापक व निवृत्त प्राचार्य, रूपारेल महाविद्यालय, मुंबई)

डॉ. वि. म. कुलकर्णी (मराठीचे प्राध्यापक, डी. जी. एफ. दयानंद महाविद्यालय सोलापूर)

'परशुरामीय'कडन या सर्व प्राध्यापकांचे सादर अभिनंदन.

**प्रा. डॉ. रा. शं. वाळिंबे यांचे अभिनंदन**

स. प. महाविद्यालयाचे भूतपूर्व मराठीचे प्राध्यापक व विभागप्रमुख व पुणे विद्यापीठाचे पदव्युत्तर मराठी विभागप्रमुख डॉ. रा. शं वाळिंबे यांची पाच वर्षासाठी 'साहित्य अकादमी'चे सन्माननीय सभासद म्हणून नेमणूक झाली आहे. हार्दिक अभिनंदन !

**प्रा. त्र्यं वि. सरदेशमुख**

प्रा. सरदेशमुख आपल्या महाविद्यालयाचे १९३६ते१९४० या कालखंडातील मराठीचे विद्यार्थी. डॉ. वि. म. कुलकर्णी, प्राचार्य के. पं. मंगळवेढेकर यांचे ते समकालीन. ते सध्या सोलापूरच्या दयानंद महाविद्यालयात मराठीचे प्राध्यापक आहेत. प्राध्यापक, कवी, टीकाकार व कादंबरीकार म्हणून त्यांनी चांगले नाव मिळविले आहे. "बखर – एका राजाची" ही त्यांची ऐतिहासिक कादंबरी नुकतीच प्रसिद्ध झाली आहे. ●

# विविध शिष्यवृत्त्या वा पारितोषिके मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे

## १९७१–७२

| शिष्यवृत्ती अथवा पारितोषिकाचे नाव | विद्यार्थ्याचे नाव | रक्कम रु. |
|---|---|---|
| १. पार्वतीबाई प्रतिनिधी विशाळगड. | साने सुलभा हणमंत. | ३०–०० |
| २. प्राचार्य विनायकराव आपटे पर्सफंड. | सदावर्ते अलका त्रिंबक. | १००–०० |
| ३. राजवाडे. | साने सुलभा हणमंत. | ३०–०० |
| ४. प्राचार्य व्ही. जी. आपटे, संस्कृत. | पात्र विद्यार्थ्याअभावी दिले गेले नाही. | ५०–०० |
| ५. तेजोमणी पाठक. | प्रसादे रजनी दत्तात्रय. | २०–०० |
| ६. आनंदीबाई मराठे पारितोषिक. | जेरे पद्माकर बळवंत. | ४०–०० |
| ७. अनंत फंड. | खळदकर जयश्री वसंत. | ३०–०० |
| ८. मनोरमा पोफळे. | भट हणमंत रामकृष्ण. | ३०–०० |
| ९. विष्णु मोरेश्वर लोणकर. | लगड रत्नप्रभा गोविंदराव. | २१–०० |
| १०. चितळे–जोशी. | वाकनीस मुकुंद सदाशिव. | २१–०० |
| ११. हरि पांडुरंग देशमुख. | साने सुलभा हणमंत. | ३०–०० |
| १२. कै. विसुभाऊ साळवेकर तत्त्वज्ञान. | १. लिमये वासंती लक्ष्मण.<br>२. मराठे सुलभा वामन. | ४०–०० |
| १३. केशव महादेव खेर, संस्कृत. | साने सुलभा हणमंत. | ४०–०० |
| १४. नारायण श्रीधर रानडे. | साने सुलभा हणमंत. | ४०–०० |
| १५. रा. ब. बापू हरि गोडबोले, सुदृढ शरीर. | भारद्वाज दिनेश रामप्रताप. | २०–०० |
| १६. एन. के. गोंधळेकर, भगवद्‌गीता. | साने सुलभा हणमंत. | २०–०० |
| १७. नरहर बापूजी जोशी. | १. तोटे जयश्री बालमुकुंद.<br>२. सोमण वंदना माधव. | ५३–५० |
| १८. गो. ज. विंझे. | रायरीकर शीला विश्वनाथ. | ५०–०० |
| १९. देशस्थ ऋग्वेदीय पांडुरंग. | अंबिके उर्मिला अश्विनीकुमार. | १६–६२ |
| २०. कै. सौ. यमुनाबाई मराठे. | पुरोहित दिलीप रामचंद्र | ८–५० |
| २१. श्रीमती यमुनाबाई पाळधीकर, फिजिक्स. | सोनावणे रामदास दत्तात्रय. | ३०–०० |
| २२. एस. के. गोडबोले. | समुद्र मोहिनी माधव. | २५–०० |
| २३. सौ. सीताबाई दांडेकर. | भट मंदाकिनी गोपाळ. | ३३–२५ |
| २४. महाराष्ट्रीय कलोपासक दिवाकर. | विद्या वसंत लिमये. | १७–०० |
| २५. कै. हरि गणेश गोडबोले. | लगड रत्नप्रभा गोविंदराव. | २०–०० |
| २६. हुतात्मा नारायण ऊर्फ वसंत बाळकृष्ण दाते. | १. शेलार वामन माधवराव.<br>२. परदेशी सुनिल चंदुलाल.<br>३. आपटे ललिता वसंत. | १६०–०० |
| २७. कै. ब. य. गोडबोले. | सदावर्ते अलका त्रिंबक. | २८–५० |
| २८. रमाबाई आत्माराम जोगळेकर. | गायधनी संध्या रंगनाथ. | ६०–०० |
| २९. सौ. सरस्वतीबाई मोरेश्वर जोशी. | रावेतकर दिलीप दिगंबर. | २०–०० |
| ३०. प्राचार्य शं. वा. दांडेकर. | साने सुलभा हणमंत. | २५–०० |
| ३१. दुर्गाबाई साठे गिफ्ट. | घाणेकर मोहन गोपाळ. | १९–०० |

| शिष्यवृत्ती अथवा पारितोषिकाचे नाव | विद्यार्थ्याचे नाव | रक्कम रु. |
|---|---|---|
| ३२. मेजर दबडघाव. | शिंदे सुभाष मुगुटराव. | ११–५० |
| ३३. कै. मधुसूदन दत्तात्रय पानवलकर. | रुद्राके मंगला शिवमूर्ती. | २५–०० |
| ३४. कै. काशिनाथ वासुदेव जोशी. | साठे शरयू विश्वनाथ. | ८–०० |
| ३५. गणपुले. | बावडेकर प्रमोदिनी विश्वनाथ. | १८०–०० |
| ३६. कै. प्राचार्य विनायकराव आपटे स्मारक. | पात्र विद्यार्थ्यांअभावी दिले गेले नाही. | २०–०० |
| ३७. कै. डॉ. महादेव यशवंत बोरकर. | देशपांडे जयंत मधुसूदन. | १२५–०० |
| ३८. प्राचार्य कॅप्टन श्री. गो. हुल्याळकर. | शेळके अमृत आनंद. | १९–०० |
| ३९. कै. वि. अ. नाईक शिरोडकर स्मृती | पाटील घनश्याम भगवंत. | ८–०० |
| ४०. श्रीमती पुष्पा गोविंद पुरोहित. | काळे विजया शांताराम. | ४७–१५ |
| ४१. कै. वा. मा. दबडघाव. | दातार अनिल मधुकर. | १३३–०० |
| ४२. मेजर वा. मा. दबडघाव मेमोरियल. | दंडे शरद शारंगधर. | २५–०० |
| ४३. कॅप्टन र. ना. चापेकर. | परदेशी सुनील चंदूलाल. | २०–०० |
| ४४. डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे, निबंधस्पर्धा. | लिमये प्रकाश प्रभाकर. | ६०–०० |
| ४५. डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे, अभिरूप लोकसभा. | गोखले प्रदीप प्रभाकर<br>भेलके सुभाषचंद्र एकनाथ. | ८०–०० |
| ४६. कै. रवींद्र जोशी. | ढुमके सुरेश महादेव. | ९५–०० |
| ४७. कै. ग. नी. चाफेकर. | पटवर्धन दिलीप गोपाळ. | ६०–०० |
| ४८. कै. प्राचार्य र. दा. करमरकर. | पर्वते मीरा रामचंद्र. | ७६–०० |
| ४९. कै. श्यामराव लिमये स्मृती. | या पारितोषिकाची रक्कम<br>नू. म. वि. प्रशालेतून दिली जाते. | |
| ५०. कै. शामराव लिमये स्मृती. | समुद्र मोहिनी माधव. | ६०–०० |
| ५१. शहा–हर्डीकर. | पटवर्धन दिलीप गोपाळ. | २००–०० |
| ५२. डॉ. बाक्रे गुरुवर्य नारळीकर. | घाणेकर रंजन यादव. | ३८–०० |
| ५३. स. प. महाविद्यालय सुवर्ण महोत्सव. | गोऱ्हे मोहन गजानन. | ४०–०० |
| ५४. कु. ज्ञानेश्वर जोगळेकर. | सदावर्ते अलका त्रिंबक. | ४०–०० |
| ५५. कै. श्रीपाद भीमराव आपटे. | पुरोहित दिलीप रामचंद्र. | ३८–०० |
| ५६. कै. विश्वनाथ नरहर लाटकर. | भिशीकर लता चंद्रशेखर. | ४९–५० |
| ५७. स. प. महाविद्यालय रसायन विभाग सेवक. | समुद्र मोहिनी माधव. | ६२–१० |
| ५८. मालती–माधव. | पटवर्धन अनील रघुनाथ. | ४०–५० |
| ५९. कै. एन. एल. फळणीकर. | पात्र विद्यार्थ्यांअभावी दिले गेले नाही. | ५०–०० |
| ६०. कै. श्रीमती शांताबाई जोगळेकर. | पात्र विद्यार्थ्यांअभावी दिले गेले नाही. | ४५–०० |
| ६१. वैकुंठवासी ह. भ. प. शं. वा. ऊर्फ सोनोपंत दांडेकर. | बावडेकर प्रमोदिनी विश्वनाथ. | ९९–०० |
| ६२. कै. उमाबाई नीळकंठ दांडेकर. | पात्र विद्यार्थ्यांअभावी दिले गेले नाही. | ९९–०० |
| ६३. श्रीपाद शंकर गोळे. | साने सुरेश सदाशिव. | ३०–०० |
| ६४. न. चिं. केळकर. | लिमये विद्या वसंत. | २५–०० |
| ६५. एन. एस. गोखले. | वाकनीस मुकुंद सदाशिव. | २५·०० |
| ६६. हुतात्मा वसंत दाते. | जोगळेकर मेधा वसंत. | २४–५० |
| | गोखले केदार रामचंद्र | २५–०० |

| शिष्यवृत्ती अथवा पारितोषिकाचे नाव | विद्यार्थ्याचे नाव | रक्कम रु. |
| --- | --- | --- |
| ६७. वै. गुरुवर्य प्राचार्य शं वा. दांडेकर पुण्यस्मरणार्थ देणगी. | समारंभ साजरा केला. | २५–०० |
| ६८. यशवंत. | बापट विद्या प्रभाकर. | ६०–०० |
| ६९. भट नीळकंठ नारायण. | भट मंदाकिनी गोपाळ. | २५०–०० |
| ७०. गोपाळ मोरेश्वर शेंबेकर. | कात्रे शशिकांत अनंत. | १८०–०० |
| ७१. दत्तात्रय बळवंत मराठे, संस्कृत शिष्यवृत्ती. | जेरे पद्माकर बळवंत. | १२०–०० |
| ७२. गणेश हरी डोंगरे. | राजवाडे वसंत कमलाकर. | २५८–०० |
| ७३. दिवाण बहादूर गोडबोले. | वैद्य सुहास वसंत. | १८०–०० |
| ७४. नरहर रावजी बिडकर, संस्कृत शिष्यवृत्ती. | भालेराव सुरेखा बाळकृष्ण. | २४०–०० |
| ७५. रामचंद्र नारायण आदमाणे. | भालेराव रमेश शंकर. | ८४–०० |
| ७६. विनायक बाबाजी घाणेकर. | गोडबोले रोहिणी मधुसूदन. | २४०–०० |
| ७७. सौ. राधाबाई फाटक फ्री मॅटर्निटी वर्क मेमोरियल. | दिवाण वासंती कृष्णाजी. | ६०–०० |
| ७८. श्रीधर बळवंत पाटणकर. | साने सुलभा हणमंत. | ६०–०० |
| ७९. सरस्वती. | बर्वे अनिल सदाशिव. | १५०–०० |
| ८०. रावबहाद्दूर गौतमचंद मोतीचंद शहा. | १. दोशी ललिता रूपचंद. | २४०–०० |
| | २. कांबूज ज्योति माणिकचंद. | २१६ ०० |
| | ३. पारेख कामिनी बुधालाल. | १५६–०० |
| ८१. मोरो रामकृष्ण पेंडसे. | बापट विद्या रामचंद्र. | ७५–०० |
| ८२. नारायण धोंडो साठे. | जेरे पद्माकर बळवंत. | ९६–०० |
| ८३. रामकृष्ण भिकाजी जोशी. | तुंगतकर सुहास पंढरीनाथ. | १२०–०० |
| ८४. सीताबाई रामकृष्ण जोशी. | काटे अलकनंदा दिगंबर. | १२०–०० |
| ८५. नारायण पांडुरंग साठे. | १. साने सुलभा हणमंत. | १२०–०० |
| | २. जेरे पद्माकर बळवंत. | १२०–०० |
| ८६. हरी अनंत गोगटे. | भट मंदाकिनी गोपाळ. | १५०–०० |
| ८७. केदारेश्वर केशव गोखले. | रोटे जयश्री सदाशिव. | १२०–०० |
| ८८. मार्तंड केशव गोखले. | देव विवेकानंद राजाराम. | ९६–०० |
| ८९. सौ. पार्वतीबाई देसाई – (रावसाहेब व्ही. ए. पटवर्धन यांच्या भगिनी). | दंडगे कुंदा दत्तात्रय. | १२०–०० |
| ९०. राजकुमार रामचंद्रराव पटवर्धन. | चिंचणीकर शोभा व्यंकटेश. | १२०–०० |
| ९१. वामन विनायक उर्फ अप्पासाहेब गडकरी. | १. ताम्हणे जयश्री वसंत. | ६०–०० |
| | २. पोतनीस प्रदीप चंद्रकांत. | ६०–०० |
| ९२. अनंत नारायण जकाते व गोदूताई जकाते. | १. जोशी रामदास विनायक.<br>२. इनामदार सतीशचंद्र बळवंत. | १८०–०० |
| ९३. शशिभूषण कृष्णराव नातू. | १. सदावर्ते अलका त्र्यंबक. | १५०–०० |
| | २. पात्र विद्यार्थ्याअभावी दिले गेले नाही. | १५०–०० |
| ९४. ग. रा. बापट फ्री स्टूडंटशिप. | एरंडे उमाकांत गोविंद. | ५२–५० |
| ९५. इचलकरंजी स्टेट फ्री स्टूडंटशिप. | पात्र विद्यार्थ्याअभावी दिली गेली नाही. | २००–०० |
| ९६. जवाहर स्टेट फ्री स्टूडंटशिप. | लोखंडे प्रकाश गंगाधर. | १००–०० |

| शिष्यवृत्ती अथवा पारितोषिकाचे नाव | विद्यार्थ्याचे नाव | रक्कम रु. |
|---|---|---|
| ९७. कै. रखमाबाई ढमढेरे फ्री स्टूडंटशिप. | देशपांडे विजय पुरुषोत्तम. | २२४–०० |
| ९८. मोरो रामकृष्ण पेंडसे. | पेंडसे रोहिणी मोरेश्वर. | ६०–०० |
| ९९. कै. रामचंद्र चिंतामण नगरकर. | नेने मालती यशवंत. | ११४–०० |
| १००. कै. नीळकंठ त्र्यंबक मेहेंदळे. | १. लागू रंजना. | १००–०० |
| | २. डोंगरे विजय गंगाधर. | १००–०० |
| १०१. रमाबाई पांडुरंग फळणीकर. | १. इनामदार विद्या केशव. | ९६–०० |
| | २. पुरोहित दिलीप रामचंद्र. | १०८–०० |
| १०२. कृष्णाबाई अनंत तांबे. | भिसे लता मधुकर. | ९६–०० |
| १०३. श्रीमती माईसाहेब वारे. | खांडेकर कैलास रघुनाथ. | १८०–०० |
| १०४. रावबहादुर सीताराम गणेश परांजपे. | जोशी मेधा यशवंत. | २४०–०० |
| १०५. कै. गो. ज्ञ. विझे. | साठे संजीवनी माधव. | ८४–०० |
| १०६. वा. त्रि. देसाई. | इनामदार विद्या केशव. | ६०–०० |
| १०७. गणेश बापूजी बापट. | १. पर्वते मीरा रामचंद्र. | १५०–०० |
| | २. पात्र विद्यार्थ्याअभावी दिले गेले नाही. | १५०–०० |
| १०८. श्रीमती लक्ष्मीबाई कंचेश्वर बापट. | पात्र विद्यार्थ्याअभावी दिले गेले नाही. | १५०–०० |
| १०९. गुरुनाथ मुद्दापूर. | भट मंदाकिनी गोपाळ. | ३००–०० |
| ११०. नारायण गणेश डोंगरे. | १. कानडे विद्याधर कृष्णाजी. | ३००–०० |
| | २. सहस्रबुद्धे नरेंद्र हरी. | ३००–०० |
| १११. श्रीमती इंदिराबाई खरे. | जाहीर केले परंतु विद्यार्थ्याने नेले नाही. | |
| ११२. श्रीमती कमल गोखले. | अ. क्र. ६६ बघणे. | |

# श्रीधर आणि कंपनी

## मुंबई – २.

* नागपूर,
* अहमदनगर,
* सोलापूर,
* इचलकरंजी,
* शहापूर

**पातळांचे ठोकबंद व्यापारी.**

पत्ता :–

**१००, फणसवाडी,**

**रुंगठा भुवन,**

**मुंबई – २.**

ट. फो. नं. ३१५२८४.

## ' राष्ट्रीय सेवा योजने 'चे आवाहन

महाराष्ट्रातील दुष्काळाची भीषणता दिवसें-दिवस वाढतच जाणार आहे. विशेषत: मार्च ते जून हे महिने पाण्याच्या तीव्र टंचाईमुळे नगर जिल्ह्यासारख्या काही भागात अतिशय कष्टाचे जातील. या परिसरातील दुष्काळग्रस्त कुटुंबांची सोय शिबिरे उघडून ठिकठिकाणी करावी लागेल. अशा प्रकारच्या शिबिरांतून विविध प्रकारची जबाबदारीची कामे करण्यासाठी सुशिक्षित तरुणांची गरज भासेल.

विद्यार्थ्यांनी आपल्या सुट्टीचा सदुपयोग या शिबिरांच्या कार्यात भाग घेऊन करावा. या संदर्भात प्राचार्य व उपप्राचार्य माहिती देतील व मार्गदर्शन करतील. या समाजोपयोगी कार्यात भाग घेण्यासाठी विद्यार्थी बहुसंख्येने महाविद्यालयाच्या कार्यालयात नावे नोंदवतील असा विश्वास वाटतो.

# शिक्षण प्रसारक मंडळीच्या विविध संस्था

१. नूतन मराठी विद्यालय मराठी शाळा, पुणे.
महामात्र : प्रा. मनोहर रामचंद्र राईलकर.

२. नूतन मराठी विद्यालय प्रशाला, पुणे.
मुख्याध्यापक : प्रा. गणेश यज्ञेश्वर दीक्षित.

३. सर परशुरामभाऊ महाविद्यालय, पुणे.
प्राचार्य : प्रा. केशव पंढरिनाथ मंगळवेढेकर.

४. हरिभाई देवकरण प्रशाला, सोलापूर.
मुख्याध्यापक : प्रा. प्रभाकर वासुदेव बोधनी.

५. मीमांसा विद्यालय, पुणे.
सर्वाधिकारी : प्रा. डॉ. दिनेश बळवंत केरूर.

६. रामनारायण रुइया महाविद्यालय, माटुंगा, मुंबई.
प्राचार्य : प्रा. डॉ. रामचंद्र अण्णाजी कुलकर्णी.

७. रामनिरंजन आनंदीलाल पोदार महाविद्यालय, माटुंगा, मुंबई.
प्राचार्य : प्रा. गोपाळ पुरुषोत्तम पालेकर.

८. टिळक शिक्षण महाविद्यालय, पुणे.
प्राचार्य : प्रा. सौ. गीता लक्ष्मण गद्रे.

९. विनयकुमार रामनिवास रुइया मूक-बधिर विद्यालय पुणे.
महामात्र : प्रा. श्रीधर अनंत पाटणकर.

१०. नूतन मराठी विद्यालय शिशुशाळा, पुणे.
महामात्र : प्रा. मनोहर रामचंद्र राईलकर.

११. नूतन मराठी विद्यालय, मराठी शाळा, सोलापूर.
महामात्र : प्रा. प्रभाकर वासुदेव बोधनी.

१२. नूतन मराठी विद्यालय, मुलींची प्रशाला, पुणे.
मुख्याध्यापक : प्रा. महादेव वामन जोशी.

१३. चंद्रशेखर विद्यालय प्रशाला, श्रीपूर.
मुख्याध्यापक : प्रा. अरुण लक्ष्मण जोगळेकर.

१४. श्री. चंद्रशेखर विद्यालय प्राथमिक शाळा, श्रीपूर.
महामात्र : प्रा. अरुण लक्ष्मण जोगळेकर.

१५. इन्स्टिटयूट ऑफ कॉमर्स, मुंबई.
प्राचार्य : प्रा. गोपाळ पुरुषोत्तम पालेकर.

१६. नूतन मराठी विद्यालय शिशुशाळा, सोलापूर.
महामात्र : प्रा. प्रभाकर वासुदेव बोधनी.